काव्य १४८

REFBK-0002818

REFBK-0002818

स्थळप्रत
म. मं. ग्रं. वाशी.

किरण झरोक्यांतून पडे। अणूंसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें। सोडुनिया अवघीं काजें

—केशवसुत

किरण

५

# शलाका

स्थलांतर
प्र. ग्रं. ठाणे.

REFBK-0002818
REFBK-0002818

लेखक

**रविकिरणमंडळ**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८१८
ग्रं. क्र.

पुणें, ९ सप्टेंबर १९२५

**किंमत १ रुपया**

प्रकाशक
यशवंत दिनकर पेंढरकर
‘वीणामंडळ’, ४६१ शनवार, पुणें.

## ‘रविकिरणमंडळा’चीं पुस्तकें

| | |
|---|---|
| किरण | ०४ |
| काव्यविचार | १ |
| उषा | ०१२ |
| मधुमाधव | ०१२ |
| शलाका | १ |

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
‘विजय’ प्रेस, ५७० शनवार,

सं. काव्य ८८०

कै० गुरुवर्य

**वासुदेव बळवंत पटवर्धन**

यांस सादर समर्पण

# रविकिरणमंडळ

गजानन त्र्यंबक माडखोलकर

विठ्ठल दत्तात्रय घाटे, एम्. ए.

माधव त्रिम्बक पटवर्धन, एम्. ए.

यशवंत दिनकर पेंढरकर

शंकर केशव कानेटकर, बी. ए.

सौ० मनोरमा रानडे, बी. ए.

श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी. ए., एम्. एस्सी.

दत्तात्रय लक्ष्मण गोखले, एम्. ए.

# आत्मकथन

आज बरोबर दोन वर्षें झालीं. एवढ्या अवधींत चार पुस्तकें प्रकाशित करून आज तिसऱ्या वर्षाचे आरंभीं हें पांचवें पुस्तक महाराष्ट्र-रसिकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे. मंडळाचे सभासद जरी सांप्रत पांगलेले असले, तरी ध्येयाच्या एकात्मतेवर वाङ्मयसेवेंत अंतर पडूं न देण्याचा मंडळाचा प्रयत्न चालू आहे, आणि त्याचें द्योतक म्हणजेच ही शलाका होय.

विविध स्वरूपाचें निर्दोष वाङ्मय वाचकांस सादर करणें हा मंडळाचा हेतु आहे. यास अनुसरून आजपर्यंतच्या चार पुस्तकांच्या द्वारें मंडळानें काव्यक्षेत्रांत नवीन वृत्तें व सुनीत, गज्जल, इत्यादि अभिनव वृत्तप्रकार आणि काव्यप्रकार यांचें शास्त्रीय विवेचन करण्याचा प्रयत्न काव्यविचार पुस्तकांत करून, किरण, उषा व मधुमाधव या तीन पुस्तकांत तशा कविता संकलित केल्या आहेत. काव्यांत ध्येय व कल्पना यांचा परिपोष करतांना, सदभिरुचीचें उल्लंघन आणि वस्तुस्थितीचा अतिक्रम न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेतली आहे.

प्रस्तुत पुस्तकांत नेहमींप्रमाणें विषय व रस यांची विविधता कायम ठेवून, विडंबन काव्य आणि लघुकथा या दोन वाङ्मयोपांगांचा नवीन उपक्रम केला आहे. कोणाच्याही खाजगी चारित्र्याची विडंबना न करितां, विशिष्ट स्वभाव अगर विशिष्ट वाङ्मयप्रकार यांची शुद्ध भावानें विनोदात्मक विकृति करणें हेंच विडंबन काव्याचें लक्षण आहे, असें आम्ही समजतों. या दृष्टीनें प्रस्तुत पुस्तकांतील 'संशयरत्नमाला' रसिकांना आवडेल. त्याचप्रमाणें शलाकेंतील दुसरा नवीन उपक्रम म्हणजे गोष्टी. कलात्मक वाङ्मयांत लघुकथांना बरेंच महत्त्व असून, त्यांची निर्मिति व जोपासना जबाबदारीनें व्हावयास पाहिजे; आणि याच दृष्टीनें या पुस्तकांत विविध स्वरूपाच्या चार गोष्टी संग्रहित केल्या आहेत. पूर्वींप्रमाणें ह्याही पुस्तकाचा महाराष्ट्ररसिक प्रेमपूर्वक स्वीकार करून मंडळास अधिक कार्यक्षम करतील अशी आशा आहे.

विजय छापखान्याचे उत्साही व सौंदर्यसमीक्षक मालक रा० अनंत सखाराम गोखले यांनीं पूर्वीच्या पुस्तकांप्रमाणें या पुस्तकाचीही सजावट तत्परतेनें केली याबद्दल मंडळ त्यांचें आभारी आहे.

पुणें,
ता. ९ सप्टेंबर १९२५

रविकिरणमंडळ

# अनुक्रमणिका


| पद्य | पृष्ठ |
|---|---|
| ग. त्र्यं. माडखोलकर ... ... ... | |
| शिवराज्याभिषेक ... ... ... | १ |
| विठ्ठलराव घाटे ... ... ... | |
| आळंदीची पालखी ... ... ... | ८ |
| माधव जूलियन् ... ... ... | |
| रसिकास ... ... ... | १० |
| भाविक हुर्हूर ... ... ... | ११ |
| कञ्चनी ... ... ... | ११ |
| बेगमेचें विरहगीत ... ... ... | १३ |
| अज्ञात नाथास ... ... ... | १३ |
| कलावन्तिणीची तुळशीपूजा ... ... ... | १४ |
| प्रीतीची कविता कां ... ... ... | १५ |
| दूरस्थ मातेस ... ... ... | १६ |
| दूरस्थ मित्रास ... ... ... | १६ |
| तेथें चल राणी ... ... ... | १७ |
| यशवंत ... ... ... | |
| माझा महाराष्ट्र ... ... ... | १९ |
| मांडवी ... ... ... | २० |
| नट ... ... ... | २२ |
| मारवाडी तगादा ... ... ... | २३ |
| आत्मार्पण ... ... ... | २४ |
| सुखाच्या पेल्यांतून ... ... ... | २५ |
| पत्रिकाहवन ... ... ... | २५ |
| मनमोहिनी ... ... ... | २६ |
| भग्नहृदयेचा शेवटचा निरोप ... ... | २८ |
| रूपसम्राज्ञीस ... ... ... | २९ |
| सारंगीवाला ... ... ... | ३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गिरीश | ... | ... | ... | पृष्ठ |
| ध्यान | ... | ... | ... | ३३ |
| घाटांतील धुक्यांत | ... | ... | ... | ३३ |
| तळमळ | ... | ... | ... | ३४ |
| निजलेल्या वसंतास | ... | ... | ... | ३५ |
| दोन पातकी | ... | ... | ... | ३६ |
| सारंगीवाला | ... | ... | ... | ३८ |
| संशयरत्नमाला | ... | ... | ... | ३९ |
| सौ० मनोरमा रानडे | ... | ... | ... | |
| विनवणी | ... | ... | ... | ४४ |
| निदानीचे बोल | ... | ... | ... | ४४ |
| दुरून | ... | ... | ... | ४६ |
| याचना | ... | ... | ... | ४६ |
| मोहना | ... | ... | ... | ४७ |
| स्मृति | ... | ... | ... | ४८ |
| मुरलिस्वन | ... | ... | ... | ४९ |
| श्री० बा. रानडे | ... | ... | ... | |
| मुग्ध बालिकेस | ... | ... | ... | ५० |
| संजीवन | ... | ... | ... | ५१ |
| द. ल. गोखले | ... | ... | ... | |
| दोन चाहुली | ... | ... | ... | ५२ |


## गोष्टी


| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री० बादल | ... | ... | ... | |
| अश्रुकण | ... | ... | ... | ५५ |
| कालिंदी | ... | ... | ... | ७० |
| विठ्ठलराव घाटे | ... | ... | ... | |
| स्त्री आणि पुरुष | ... | ... | ... | ९१ |
| एक कारकून | ... | ... | ... | ९४ |

# श ला का

## ग. त्र्यं. माडखोलकर

### शिवराज्याभिषेक

[ वृत्त–चंद्रकांत ]

सह्यगिरीच्या स्वर्गंगाजलधौत शिरःप्रांतीं
उसळतात या आज कुणाच्या उज्ज्वल जयगीती ?
सुधामधुर निश्वसितें उधळुनि निद्रित जगताला
जागृत करिते अवेळींच कां आज उषाबाला ?
नक्षत्रांना निजवुनि रजनी जातांना मागें
उत्सुकतेनें वळुनि काय ही बघते अनुरागें ?
आवरीत ही अमृतरसाची मोहन बरसात
अस्तगिरीवर आरोहुनि हा रजनीचा कांत—
दयितालिंगित आश्चर्यानें काय पाहताहे ?
गगनीं विजयध्वज कोणाचा हा फडकत आहे ?
वातावरणीं झुलतिं कुणाचीं हीं मंगल गीतें,
त्या गीतांच्या स्पर्शें स्थिरचर कां पुलकित होतें ?
सह्याद्रीचे कडे आज हे कंपित कां होती,
अचेतनांना स्फुरवि कोणती चैतन्यज्योती ?
विक्रमशाली यवननृपाचे निस्तुळ दळभार
दक्षिणेकडे आले होउनि ते रेवापार;

महाराष्ट्रनृपमंडलाधिपति रामचंद्रदेव
विद्वत्संस्तुत दीनजनांचा नाथ एकमेव—
यदुकुलभूषण रणांगणीं तो पराभूत झाला
यवनांनीं मग महाराष्ट्र हा दास्याहत केला !

विंध्याचलपर्यंत थडकलें यशस्तेज ज्यांचें
अतुलबाहुबलवैभव त्या यदुवंशविलासांचें—
पाहुनि भुलली, अशेष भारतभाग्यश्री आली,
देवगिरीच्या दुर्गमदुर्गप्रासादीं ठेली !

देवगिरीची दौलत ती दुर्मद दुस्मानांनीं
अपहरिली अनुकूल करुनि धनलोलुप बेमानी,
परधर्मांचे, परराष्ट्राचे ते दावेदार
विजयी झाले करुनि फितुरिनें यदुकुलसंहार !

स्वातंत्र्याला अपघाताचें आलें हें मरण
तेव्हांपासुनि महाराष्ट्र हा झाला निष्प्राण !
आज उठविलें, पुनरपि कोणीं या निष्प्राणाला,
निर्जीवाला जीवंतपणा फिरुनि कसा आला ?

यदुवंशाचें विगतवैभव प्राप्त पुन्हा व्हावें,
महाराष्ट्र हा स्वतंत्र होउनि दास्य लया जावें—
मातृभूमिचें, स्वातंत्र्यानें करावया त्राण
अंगिकारिलें म्हणुनि सुखानें फकिरीचें वाण;
पूर्वार्जितधनवैभव सांडुनि कडे आणि रानें
सह्यगिरीचीं स्वैर घुमविलीं राष्ट्रस्फूर्तीनें;
चैतन्याचें तेज उधळुनी दिङ्मंडल झुलवी
नव आशेचे अंकुर जनताहृदयांतुनि फुलवी;

स्वातंत्र्यरणीं सहज तळपतां ज्याची समशेर
मृत्युभयानें दळ गनिमांचें धांवे चौफेर;
दास्यमुक्त हा महाराष्ट्र त्या नरशार्दूलानें
शिवस्वरूपी शिवप्रभूनें, स्वराज्यदेवानें—
पुनरपि केला !—आज तयाचें अभिषेकविधान
दऱ्यादऱ्यांतुनि म्हणुनि घुमतसे हा पटहध्वान !
मंगलगीतें म्हणुनि आज या पुररमणी गाती
वनें उपवनें त्या गीतांनीं निनदित हीं होतीं;

तीं अभिनव जयगीतें ऐकुनि या मंगल कालीं
चराचराला, जडाजडाला जीवकला आली !
गीतसुरांच्या स्पर्शानें त्या रानें टवटवलीं
रायगडाची विपिनश्री ही नवतीनें नटली;

ही हर्षाची, ही तेजाची भुलावणी भलती
सह्याद्रीचे कडेहि गुंगुनि हे डुलती झुलती !
आदिपीठ हें महेश्वराचें मायभवानीचें !
अधिष्ठान हें स्वातंत्र्याचें, धर्मस्फूर्तीचें !

ब्रह्मरसाची, भक्तिरसाची पुण्यमयी गंगा
पावन करिते अविरत याच्या विमल अंतरंगा !
विश्वकुटुंबी वागीशांची विश्वात्मक वाणी
आनंदानें गाते याच्या कीर्तीचीं गाणीं !

अगस्तितेजें निष्प्रभ होउनि अंकित हा झाला
पश्चिमसागर सदैव न्हाणी याच्या चरणांला !
कड्याकड्यावर उभी राहुनी रात्रंदिन याला
रक्षितसे ही गगनस्पर्धिनि तुंग दुर्गमाला !

प्राण वाहुनी समरीं याच्या स्वातंत्र्यासाठीं
धारातीर्थी पावन झाल्या वीरांच्या कोटी !
वश होउनि त्या वीरनरांना विजयश्री आली,
महाराष्ट्रभू स्वतंत्र पुनरपि पाहुनि ही झाली—

आनंदानें पुलकित होउनि डोलतसे आज
पुण्यसरित्संगततनुमंडल तो हा गिरिराज !
आज उदेलें स्वातंत्र्याचें हें मंगल पर्व
म्हणुनि डोलतो आनंदानें ब्रह्मगोल सर्व !

अत्यद्भुत अभिषेकमंगल श्रीशिवदेवाचें
परमदिव्य पुण्याहवाचन स्वातंत्र्यक्रतुचें—
सह्यगिरीच्या उत्तुंग शिरःसौधावरि आहे
गाजवीत हें जगताला हा ध्वज फडकत राहे !

स्थलदेवींनों ! जलदेवींनों ! आज चला जाऊं
रायगडावर, शिवप्रभूला जयगीतें गाऊं !
किर्र रान हें; दऱ्यादऱ्यांतुनि जंगल घनदाट
निर्झरिणींचे नित्य यांतुनी झुळझुळती पाट;

हे झुळझुळ त्या निर्झरिणींचे मंजुळ रसरंग
यांतच मिसळा ते तुमचे हळुवार हृत्तरंग !
त्या गीतांनीं या गीतांनीं एकरूप व्हावें
शिवदेवाच्या जयघोषानें वन हें निनदावें !

मधुरमाधवस्पर्शानें या फुलल्या फुलवेली
मरंदलोलुप भृंगसंघ हा झुलतो भंवतालीं ;

वाऱ्यांनीं हीं वृक्षवरांचीं सळसळती पानें
सृष्टिसतीचीं हेलावति जणुं मुग्धतरल गानें!
शिवरायाचें वैभव पाहुनि हृष्ट फार झाली
अश्रुबिंदु हे निशादेविचे टपटपले खालीं;
दवबिंदूंनीं खुलली विपिनश्री गाते गीतें
मंदवायुच्या हिंदोळ्यावर आंदोलन घेते!
निशादेविचा उषादेविचा सरुनि लपंडाव
स्थिरचर उजळित पुढें येतसे पहा सूर्यदेव,
परमेशाचे पढियंते हे भाट गाति यातें
नितांतमंजुळ नवलपरीचीं दिव्य उषःसूक्तें!
त्या नादांतुनि मिसळुनि अपुले रम्य गीतनाद
जडाजडांतुनि आनंदाचे खुलवा पडसाद!
वनराजीला आनंदानें, प्रेमानें डुलवा!
शिवदेवाचीं वैभवगीतें वाऱ्यावर फुलवा!
जगन्मंगले! भवानिमाते! आज तुवां यावें
आनंदानें या राज्याला अभयदान द्यावें!
तीर्थक्षेत्रें, धर्मक्षेत्रें होउनि उध्वस्त
स्वातंत्र्यासह झाला धर्मस्फूर्तीचा अस्त;
दास्यतमिस्रग्रस्त राष्ट्र या प्रतिपच्चंद्रानें
पुनरुज्जीवित केलें पसरुनि आशेचीं किरणें!
वैभव या प्रतिपच्चंद्राचें पूर्णत्वा गेलें
यशःप्रकर्षें याच्या उज्ज्वल राष्ट्रतेज झालें!
तुझ्या कृपेनें आज तपस्या सफल सर्व झाली
महाराष्ट्रभू स्वातंत्र्याचें हें लेणें ल्याली,

तुझ्या प्रसादें स्वातंत्र्योदय आज पुन्हा झाला
धर्मोद्धारक, राष्ट्रोद्धारक नृप हा अवतरला !

तुझा तूंच हा वाढवि राजा प्रेमानें आई !
अभयदान या तव राज्याला तूंच आज देई !
तुझ्या कृपेनें पावो अक्षय पुण्याची बढती
ही सत्याची, स्वातंत्र्याची चंद्रकला चढती !

मानधन महाराष्ट्रा ! जीवित धन्य तुझें झालें
शिवदेवानें आज तुझें यश दिगंत हें केलें;
भावि पिढ्यांना तवदिव्ययशःस्नात दिशा दाही
तुझिया अद्‌भुत उत्कर्षाची देतिल या ग्वाही !

"स्वातंत्र्यप्रिय नरवरपूजित महाराष्ट्रदेश
लीलेनें हा झुगारितो परसत्तेचे पाश !
धर्मद्रोही, राष्ट्रद्रोही जुलमी जे त्यांना
खुशाल होवो वश हा भारत सांडुनि अभिमाना !

नष्ट जाहलें क्षात्रतेज जरि अखिल भारताचें,
भ्रष्ट जाहलें धर्मजीवन प्रसुप्त जनतेचें,
महाराष्ट्र तरि परसत्तेला कधीं न वांकेल
स्वातंत्र्यरणीं झगडायातें पुढता ठाकेल !

दासांचें हें राष्ट्र न,-तेजस्तत्त्वाचा श्वास
प्रतापशाली रणसिंहांचा स्वतंत्र हा देश !
काळालाही तें अत्युग्र क्षात्रतेज याचें
दुःसह झालें !"-गभीरगर्जित हें इतिहासाचें-

संकलन ७८०

ब्रह्मकटाहापर्यंत महाराष्ट्रा ! धडकेल
आणि तुझ्या दुर्मद जेत्यांचें काळिज तडकेल !
तुझा जयध्वनि ऐकुनि हा ब्रह्मांड थरारेल
अचेतनांतहि पुनरपि तेजःस्फूर्ति भरारेल !
प्रतिपच्चंद्रा ! त्रिभुवन तुझिया तेजें धवळावें,
जगाकडे या पुनरपि दास्यध्वांतें न वळावें !
तुझ्या कृपेनें स्वतंत्र हतबल राष्ट्रांनीं व्हावें !
ऊर्जस्वल जयगीत तुझें हें जगतानें गावें !

# विठ्ठलराव घाटे

## आळंदीची पालखी

[ अभंग ]

राया रुक्माईच्या वरा आतां करा बापा ! त्वरा
'ज्ञानदेव तुकाराम !' 'ज्ञानदेव तुकाराम !'
चोहोंकडे एक घोष तेणें कोंदलें आकाश
टाळा झांजा व मृदंग भजनाचा एकच रंग
झाली पताकांची दाटी जाया विठ्ठलाच्या भेटी
सोडा, सोडा काम–काजां आळंदीच्या आल्या फौजा
ज्ञानोबाचा आला घोडा आतां या रे दारें उघडा
घ्या रे फूल आणि पान करा संतांना अर्पण
खुली पेठ वैकुंठीची तुम्हां आम्हां दैना कैची
झाली मिरास पंढरी तुम्ही आम्ही वारकरी
तुम्ही आम्ही भाऊ भाऊ चला पंढरीला जाऊं

२

विसरलों तुझ्या पायां, आम्ही पंढरीच्या राया
ज्ञानोबाची, तुकोबाची, नामयाची, चोखोबाची
शिकवण या संतांची देवा विसरलों साची
कळाकुसरी पांडित्याची परि आमचीं मडकीं कच्चीं
वाघिणीचें दूध प्यालों भोळ्या भावा दुणावलों
जात झाली अमुचा देव पक्ष झाला अमुचा देव
यांच्यासाठीं संघटणें, यांच्यासाठीं हीं भांडणें
वृथा कर्म, वृथा ज्ञान नाहीं तुमचें अधिष्ठान

नाना यातींचा गलबला वाळवंटीं शांतविला
आज वेळ तीच आली, ये ग विठाई माउली

३

नका राहूं राउळांत या हो देवा महाराष्ट्रांत
सोडा पंढरीनगरी करा महाराष्ट्राची वारी
वाळवंटींचा सोहळा, महाराष्ट्रीं देवा खेळा
एका पुंडलिकासाठीं येणें केलें जगजेठी
एका जनाईकारणें केलें दळणें, कांडणें
उद्धरिला अजामिळ नाहीं केला देवा वेळ
महाराष्ट्राचा कळवळा कां न आला हो दयाळा
ज्ञानोबाची जन्मभूमी नामयाची गानभूमी
तुकोबाची भावभूमी शिवबाची कर्मभूमी
पुण्यभूमी पुण्यभूमी करा पुन्हा धर्मभूमी

४

अगा पंढरीच्या देवा जरा ऐका माझा धावा
जें जें मनाला वाटलें तें तें वाचे उच्चारिलें
शेवटची एक अर्जी आतां ऐका हो देवाजी
नाम तुमचें घ्याया मुखा लाज वाटूं देऊं नका
व्याप नित्याचे सोडावे सुखदुःखातीत व्हावें
आणि एकांतांत जावें सुंदर तें ध्यान ध्यावें
नित्य होऊनीया दंग गावे नाम्याचे अभंग
नाना फुलें जीवनाचीं गुंफा तुमच्या सूत्रीं साची
हेंचि दान आतां द्यावें आळवीतों जीवेंभावें
आण तुम्हा तुकोबाची, बूज करा विठ्ठलाची

# माधवजूलियन्

## रसिकास

[ वृत्त–मुद्रिका ]

हें साधें भोळें गीत आवडे तुला;
सङ्कोच भीति नच येथें घे पुरवुन तव हेतुला. १
ये आंत, बैसुनी जवळ हृदय कर खुलें;
नच उपचाराची बाधा, सर्व हें समज आपुलें. २
ही गड्या न माझी मुळीं काव्यसम्पदा;
ही कृपा तिची स्मरुनी तूं म्हणः धन्य धन्य शारदा ! ३
कुतुकलास रसिका, नको परि करूं स्तुती;
मज पुरे मुखीं तव येती अव्याज सुखाची द्युती. ४
सहकम्प पावतां तुझें हृदय पारखीं;
मज जोड पावली सारी न सुखास अतां पार कीं ! ५
अनुभूति, कल्पना क्षणिक तरल वायवी
गुङ्गवून तिजला नादीं अडकवून ठेवी कवी. ६
शब्दाच्या अवगुण्ठनीं हसे सुन्दरी,
ती छबीच त्या देवीची जी वसे तुझ्या अन्तरीं. ७
म्हणुनीच ऐकशी गान गुङ्ग होउनी,
ठेविशी उलट करुनी तूं मज तुझाच सुहृदा ऋणी. ८
हें तन्मयतेचें मौन असें डोलतां
स्तुतिपाठ कशाला वांया हृदयास हृदय बोलतां ! ९
चञ्चला आजची स्तुति न कीर्ति निश्चला !
कीर्तिचा स्वर्ग कोणाला रे मेल्याविण लाभला ! १०

नं. ८१०५ ८८
२८/५/५४

माधवजूलियन

मी माझ्यास्तव गायनें जरी गुंफिलीं,
भेटतां रसिक तुजऐसा स्नेहाळ तुला वाहिलीं. ११

## भाविक दुर्दूर

[गज्जल]

असो देव किंवा नसो कां बरें तयावांचुनी चित्त हो घाबरें ? १
जसें मूल गर्दीमधें साण्डलें बघे चौंकडे कावरें बावरें, २
तसें कां मला होइ येथें जरी न थोडे मला सोयरे धायरे ! ३
प्रभूची जरूरी मनीं उद्भवे, मला बोलवीः ईश्वरा, धाव रे ! ४
हवा कापती पङ्ख मारीत ती कशीं गोड निष्काळजी पांखरें ! ५
कसे कृष्णपाषाणभेगांतुनी खळाळून येती रुप्याचे झरे ! ६
नभाहून, तारे जिथें कोंदले, कसा लोचनानन्द हा पाझरे ! ७
फुलें गोजिरीं दों दिसांचीं खरीं सभोंतीं सुखी गन्ध त्यांचा भरे ! ८
फुलें, पक्षि, तारे, झरे यांजला तुझें वाटतें प्रेम केंव्हां बरें ! ९
नराला तुझ्यावीण नाहीं गती— असें कोणतें पाप केलें नरें ! १०

## कञ्चनी

[वृत्त—अभिसारिका]

कञ्चनी रसरङ्गाची खाणी शेंकडों हृदयांची ही राणी
लागली गावया सहज पांखरावाणी. १

लावणी—अस्सल गीत मराठी— डफावर निनादली वरघाटीं,
पडसाद अजूनी गोदाप्रवराकांठीं. २

आधिच गोड जनानी गळा कोंवळा, खुले चढे मोकळा,
त्यांतून वश हिला सङ्गीताच्या कळा. ३

# माधवजूलियन्

## रसिकास

[ वृत्त–मुद्रिका ]

हें साधें भोळें गीत आवडे तुला;
सङ्कोच भीति नच येथें घे पुरवुन तव हेतुला. १
ये आंत, बैसुनी जवळ हृदय कर खुलें;
नच उपचाराची बाधा, सर्व हें समज आपुलें. २
ही गड्या न माझी मुळीं काव्यसम्पदा;
ही कृपा तिची स्मरुनी तूं म्हणः धन्य धन्य शारदा ! ३
कुतुकलास रसिका, नको परि करूं स्तुती;
मज पुरे मुखीं तव येती अव्याज सुखाची द्युती. ४
सहकम्प पावतां तुझें हृदय पारखी;
मज जोड पावली सारी न सुखास अतां पार कीं ! ५
अनुभूति, कल्पना क्षणिक तरल वायवी
गुङ्गवून तिजला नादीं अडकवून ठेवी कवी. ६
शब्दाच्या अवगुण्ठनीं हसे सुन्दरी,
ती छबीच त्या देवीची जी वसे तुझ्या अन्तरीं. ७
म्हणुनीच ऐकशी गान गुङ्ग होउनी,
ठेविशी उलट करुनी तूं मज तुझाच सुहृदा ऋणी. ८
हें तन्मयतेचें मौन असें डोलतां
स्तुतिपाठ कशाला वांया हृदयास हृदय बोलतां ! ९
चञ्चला आजची स्तुति न कीर्ति निश्चला !
कीर्तिचा स्वर्ग कोणाला रे मेल्याविण लाभला ! १०

क्र. ८०७५ ८०८५
ता. १५/२५

मी माझ्यास्तव गायनें जरी गुंफिलीं,
भेटतां रसिक तुजऐसा स्नेहाळ तुला वाहिलीं. ११

## भाविक हुर्हूर

[गज्जल]

असो देव किंवा नसो कां बरें तयावांचुनी चित्त हो घावरें ! १
जसें मूल गर्दीमधें साण्डलें बघे चौंकडे कावरें बावरें, २
तसें कां मला होइ येथें जरी न थोडे मला सोयरे घायरे ! ३
प्रभूची जरूरी मनीं उद्भवे, मला बोलवीः ईश्वरा, धाव रे ! ४
हवा कापती पङ्ख मारीत ती कशीं गोड निष्काळजी पांखरें ! ५
कसे कृष्णपाषाणभेगांतुनी खळाळून येती रुप्याचे झरे ! ६
नभाहून, तारे जिथें कोंदले, कसा लोचनानन्द हा पाझरे ! ७
फुलें गोजिरीं दों दिसांचीं खरीं सभोंतीं सुखी गन्ध त्यांचा भरे ! ८
फुलें, पक्षि, तारे, झरे यांजला तुझें वाटतें प्रेम केव्हां बरें ? ९
नराला तुझ्यावीण नाहीं गती– असें कोणतें पाप केलें नरें ? १०

## कञ्चनी

[वृत्त–अभिसारिका]

कञ्चनी रसरङ्गाची खाणी शेंकडों हृदयांची ही राणी
लागली गावया सहज पांखरावाणी. १

लावणी–अस्सल गीत मराठी– डफावर निनादली वरघाटीं,
पडसाद अजूनी गोदाप्रवराकांठीं. २

आधिच गोड जनानी गळा कोंवळा, खुले चढे मोकळा,
त्यांतून वश हिला सङ्गीताच्या कळा. ३

समजुनी म्हणे गीत दिलरङ्गी, साथ करि चुरशीनें सारङ्गी;
घे तान भिङ्गरीपरी झरे तन्वङ्गी ! ४

पायीं पैंजण रुम्झुम्झुमती, पाउलें तालावर थकथयती,
काव्यार्थ अभिनयीं विशद करी ही सुदती. ५

तनू ही सडपातळ गुल्छडी; धवधवे सुरत पाक फांकडी;
नादांत तरङ्गे जशी नभीं वावडी. ६

दाखवी नृत्यांतील चलाखी, झगमग खेळे मग पोशाखीं,
गिर्कीस विस्तरे घोळ, चमकती वाकी. ७

कान्ति तर सोनें बावनकशी, कञ्चुकी नील, साज गुल्बशी,
—उल्काच अवतरे ही किंवा उर्वशी. ८

धीट ही, परि नखरा, म्रूलीला प्रिय न या ललितकलावेलीला,
या टपोर नयनीं रसज्ञताच सुशीला. ९

दिव्याची मण्डपांत रोशनी, हवेमधिं गीतगन्धमोहनी,
रङ्गेल सभेची हिच्याकडे ओढणी. १०

सभेचा जीव हले वरखाली, शान्तता गाढ काय भवतालीं !
तों समेवर पडे शाबाशीची टाळी. ११

वाहवा ऐकुन किञ्चित लाजे, गालीं स्मित मधु पुसट विराजे,
किति उजू कुरङ्गी नजरफेंक ही साजे ! १२

मुखावर अनघ भावना राही थारा नीचतेस इथ नाहीं
भाबडी साबडी सरळ पोरसवदा ही. १३

निरागस अविट सुखाची झरी, गुणी तूं सुगररूप सुन्दरी,
कञ्चनी खचित तूं श्रेष्ठ काव्यमञ्जरी ! १४

लोटला शान्तरसाचा मजा, चन्द्रिका गमशी कीं सारजा !
झुलवीत फुलविशी कोळपल्या काळजा. १५

वन्द्य तूं खचित सदा मजलागी —किति तुझी जात जगांत अभागी !
घे कृतज्ञतेची अमोल तूज बिदागी. १६

## बेगमेचें विरहगीत

[ गजल ]

जमल्यास आज तारा अथवा खुशाल मारा !
तुमच्याशिवाय थारा मजला कुठें उदारा ? १

सुल्तान या जिवाचे, स्वामी शिवाऽशिवाचे,
हृदयीं अखण्ड वाजे तुमचा छुपा नगारा. २

विभवीं तुम्ही लपावें, अपुल्यामधें रमावें,
तुमच्या परन्तु नांवें जगिं कारभार सारा. ३

वनभूमिभाग सारा मयुरी जणूं पिसारा,
परि नाथ दिल्बहारा ! हृदयीं पहा सहारा ! ४

त्याही रणांत हल्लीं धरि जीव आसवल्ली,
कीं प्रेम एककल्ली उडवी जिता फवारा. ५

शयनीं फुलें दमिश्की, न परी सुगन्ध इश्की,
बगिच्यांतुनी विखारी जणुं ये समूम–वारा. ६

रुसलां जहाऽपन्हा का ? मारूं कितीक हांका ?
शशिवीण दीन राका पडली तिला विचारा. ७

चुकल्यास एक वेळां सदया ! करा क्षमेला,
दिल्नूर बेगमेला विरहांत द्या निवारा. ८

## अज्ञात नाथास

[ गजल ]

आहेस तूं जगीं हें खोटें खरें न ठावें,
नाथा, तथापि तूंतें मी वाहतें स्वभावें. १

स्वर्गातुनी मनाच्या घे झोत भावगङ्गा,
कोणा सदाशिवाच्या शीर्षीं हिनें स्थिरावें ! २
प्रीतीच ज्योत ज्याची तो दीप जन्म माझा,
गाभारियांत तुझ्या नन्दादिपें जळावें. ३
भाण्डार लूटवाया केले प्रयास वांया
हा प्रीतिचा खजीना वाढे तुझ्या प्रभावें. ४
काळीज धुग्धुगे तों कर्तव्य हें टळेना,
या हातुनी घडावें नाथा, तुझ्याच नांवें. ५
येवो अथाङ्ग पाणी, वारा असो तुफानी,
जावो पुढेंच तारूं हें खात हेलकावे. ६
आकाशिंच्या कुऱ्हाडी माथां खुशाल पाडी,
आघात सोसण्याचें सामर्थ्य मात्र द्यावें. ७
कोठें घरीं, वनीं वा, दर्यावरी, रणीं वा,
सान्निध्य गाढ तूझें जीवास या पटावें. ८
जात्याच दुर्बला मी, मग्दूर काय माझा !
स्वामी, धरून हातीं वेडीस चालवावें. ९

## कलावन्तिणीची तुळशीपूजा

[सुनीत]

" मित्रा, ही बघ सुन्दरी तुळशिला घाली मुळाशीं जळ,
प्रार्थी जोडुन हात, नेत्र मिटुनी राहे उभी निश्चळ,
भक्तीनें शिर नम्र, ओठ हलती, श्रद्धा मुखीं मोहक ! "
आलें उत्तर; " हीस धर्म कुठला ? वेश्या करी नाटक
चोळी आखुड, ऊर अर्ध उघडा, गोरा गळा मोकळा,
दावी पातळ शुभ्र गोण्डस हिचा बान्धा उभा कोंवळा;

काळे केस पहा फुगीर, न जरा भाङ्गास त्या वक्रता,
भाळीं मङ्गळ ये नभांतुन जणूं ! ये अन्तरीं व्यग्रता."
छे छे ! दर्दुरघोष हीस नलगे, शास्त्रीय तें भाण्डणें
ब्रह्मज्ञान घटापटांतिल शिळें लोकांपुढें माण्डणें,
न्हावें, नेसून धूत वस्त्र तुळशी भावें पुजावी स्वतां,
ओंव्या प्राकृत दोन चार म्हणुनी पूजेस ये साङ्गता.
स्वार्थी भोन्दु समाज हा खितपवो रत्नास या सुन्दर,
भक्तीचा प्रभु चाहता, हिज कसा देईल तो अन्तर !

## प्रीतीची कविता कां ?

[सुनीत]

तो काव्यात्म खुळा कवी तरि पहा, ऐसें कुणी बोलतो,
आली पाहुन मासिकांत कविता हेवाहि वाटे कुणा,
एकान्तांत कुणी रसज्ञ विरळा आनन्दुनी डोलतो,
टीकाकार कुणी दुरून मिळवी सङ्ग्राह्य खाणाखुणा
मी 'काव्यमूयशसे' म्हणून धरिली नाहीं करीं लेखणी,
किंवा 'अर्थकृते' म्हणून नकली स्तोत्रें न मीं गाइलीं,
साङ्गावा उपदेश ही न मजला इच्छा, न अङ्गेजणी;—
प्रीतीची कविता कशास लिहिली ? कोणास ती वाहिली ?
सारें हृद्गत गोड मी तुजपुढें काव्यामध्यें ठेविलें,
नज्राण्यावर वस्त्र टाकुन जसा थोरापुढें ठेविती,
गे कोठून उपायनें तुज कमी ? श्रीमंत तूं दुर्मिळे.
बन्दे नौकर कोंपऱ्यामधि तया राशीवरी फेंकिती.
"बोला काय असेल अर्ज," म्हणशी. बोलूं तरी काय गे ?
आशेचे तुकडे धरून हृदयीं जातों नमस्कार घे.

## दूरस्थ मातेस

[ सुनीत ]

प्रातःकालिं उठून रोज न घडे आतां तुझें दर्शन
कीं ज्याच्या शकुनें समस्त मग तो जावा सुखानें दिन;
लाभेना तुज-हातचें गरिबिचें सुग्रास तें जेवण
कीं जेणें मुठमूठ मांस चढुनी यावें मला मी-पण
वेडा आग्रह, जागरूक ममता, आस्था निगा – आज न !
तो पाठीवर हात जीर्ण फिरणें, एकेरि सम्बोधन,
बाहेरील विचारपूस करणें, गप्पा मनोरञ्जन,
पोथीवाचन–सर्व आठवुन हें ओलावती लोचन.
आई गे, हृदयास घट्ट करुनी येऊं दिलें तूं मला,
सेवेला तव अन्तरून जिव हा पैक्यास लालूचला.
रात्रींच्या भजनीं मनांत करिशी माझाच तूं आठव,
डोकें टेंकुन या उशीवर करीं मीही तुझाच स्तव.
यावी झोंप तुला म्हणून कवनें गाऊन नानाविध
चेपाया तव पूज्य पाय जननी, मी कां नसें सन्निध ?

## दूरस्थ मित्रास

[ सुनीत ]

दृष्टीआड न होय वस्तु न कदा जाई मनाआड जीः
माझ्या स्वानुभवास हें न उतरें, वाटे परी काळजीः—
कीं 'माझ्या प्रिय माधवा' वर, तसें खालीं, 'तुझा प्रेमळ'–
पत्रीं शब्द असे मला न दिसले, गेलीं दिनें पुष्कळ,
माझा माधव मित्र रोज दिवसां हो गर्क अध्यापनीं
रात्रीं तो शयनीं मला न चुकतां सप्रेम चिन्ती मनीं,

केव्हांही असला विचार तुझिया चित्ता शिवे काय रे ?
मित्रा, जीव तुझा तदा गतसुखस्वप्नीं निवे काय रे ?
का गट्टी जुळली तशी निखळली विद्यार्थिकाळांतली ?
शङ्का ही शिवतांच हीं बघ जळें डोळ्यांमधें दाटलीं !
मैत्री शक्य नसे नवीन जडणें आतां सुखी शैशव
मी कञ्जूष अतां उरीं दडवुनी ठेवी जुनें वैभव.
डोळ्यांदेखत हाय माय-कलिजा जाणें - नको दृश्य तें !
हा हृद्भङ्ग नको, तयाहुन बरें निष्प्रेम आयुष्य तें !

## तेथें चल राणी

[गज़ल]

कोठें तरि जाऊं बसुनी शीघ्र विमानीं — अज्ञात ठिकाणीं,
स्वातन्त्र्य जिथें शान्ति जिथें प्रेम इमानी — तेथें चल राणी ! १
सामाजिक सम्बन्ध जुने हे न टिकाऊ, — हे सर्व विकाऊ !
मी तूज मला तूं, प्रभु दोघांस निदानीं — तेथें चल राणी ! २
भाळे न इथें प्रीति धनावीण कुणाला, — ना मोल गुणाला;
रामा अभिरामा न जिथें हो अभिमानी — तेथें चल राणी ! ३
डोळ्यांत इथें लाडिक जादू परि खोटी, — अन् संशय पोटीं;
सर्पाविण कोणी न वदे दोन जिभांनीं — तेथें चल राणी ! ४
कांहींहि करा ही जनता मारिल नाङ्गी — हांसून अपाङ्गीं;
ध्येयास पुरा वाव मिळे, होय न हानी — तेथें चल राणी ! ५
नातें पुरुषस्त्रीमधिं तें एकच वाटे — ऐसें उफराटें
ज्यांचें मत त्यांचें वच यावें नच कानीं — तेथें चल राणी ! ६
स्वातन्त्र्य न सत्तेविण, दम्भाविण येथें — शुद्धत्व न येतें;
होईल तुझें कौतुक अव्याज हिमानी — तेथें चल राणी ! ७

हा नागर लौकीक बडेजाव दिखाऊ        टाकूनच जाऊं;
माणूसकिची जानपदालाच शिराणी,        तेथें चल राणी !  ८

हे शौक किती कृत्रिम ! या घातुक चैना,        हो मागुन दैना;
कैफांत झुकेना दुनिया धुन्द दिवाणी        तेथें चल राणी !  ९

पुण्य श्रम झाले कळवी एक कसोटी—        ये अमृत ओठीं;
ताजें जळ, ताजें फळ—खाशी गुज़राणी !        तेथें चल राणी !  १०

काव्यें नकली नीरस वाचून जिवाला        वाटे न जिव्हाळा;
फेंसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं        तेथें चल राणी !  ११

कोठून गरीबी असतां रानफुलांहीं        शृङ्गारित राई ?
बेमोल जवाहीर खुले रात्रवितानीं        तेथें चल राणी !  १२

कोठें तरि रानांत वसूं या नि हंसूं या;        ना हांव असूया;
सन्तोष पडूं दे न जरा न्यून निधानीं        तेथें चल राणी !  १३

बान्धूं चिमणें खोपट कीं ऊब जयाची        दैवी प्रणयाची,
आल्या अनिकेतास खुलें स्वागत रानीं        तेथें चल राणी !  १४

अङ्कावर खेळून शिकूं सृष्टिसतीच्या        आत्मप्रगतीच्या
त्या गूढ कथा ज्या न कुराणीं न पुराणीं,        तेथें चल राणी !  १५

संग्रहालय ८८०

# यशवंत

## माझा महाराष्ट्र

[ सुमंदारमाला ]

नकाशा पुढें पाहतां भारताचा महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं.
असे हीच माझी अहा मायभूमी असे येति उद्गार तोंडांतुनी.
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी पडे प्रश्न आयास केले किती
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ही तदा हाय पस्तावते मन्मति.
महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा ! मुखानें वृथा चालते घोषणा,
परंतू न संसारभाराविना या दुजा कामधंदा सुचेना मना.
परीघांत एकाच आंखीव जैसा फिरे बैल घाण्यास जो जुंपिला,
स्वताचे सदा गाळुनी घर्मबिंदू दुजांचा मळा मात्र मीं शिंपिला.
जिरू लागल्या पार आतां उमेदी, सरू लागलें पारतंत्र्यीं जिणें,
झुरू लागुनी जीव खालीवरी हो, जसें पांखरू होय पंखाविणें.
कुणाचा धरू हात हातांत आतां ? सुचेना वरू मार्ग मी कोणते ?
न सेवा तुझी हातुनी जाहली या सदा शल्य हें मानसीं टोचतें.
अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यांमधी देश पुंजाळले,
महाराष्ट्रभूचें परी त्यांत माझ्या दिसे संप्रती तेज मंदावलें
मना ध्यास–तत्तुल्यतेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हां पुन्हा ?
महाराष्ट्रमाते ! जना बुद्धि दे या तुझ्या वैभवोत्कर्षसंवर्धना.
सदा गव्हरांतून सह्याद्रिच्या जे इथें स्रोत येतात देशावरी,
पवाडेच गाती जणूं पूर्वजांचे स्फुरायास चैतन्य लोकान्तरीं,
निमाल्या महा पूर्वजांच्याच किंवा मनीषा मरुद्वैखरी बोलती
तयांनीं जित्या होउनी भावना या घडो हातुनी मायसेवा-कृती.

'महाराष्ट्र माझा' असें आज आम्ही जरी जन्मलाभामुळें बोलणें,
'महाराष्ट्र माझा' असें घातलेल्या कधीं भूषणांच्यामुळें बोलणें !

येरवडा, १५-८-१९२५

## मांडवी

[ समर्थकालीं 'मांडवी' या नांवानें विख्यात असलेली ही चाफळ-खोऱ्यांतील नदी आज भूगोलाच्या पुस्तकांत फक्त 'मांड' या नांवानेंच ओळखली जात आहे. सौंदर्याला विकृती येणें हा काळाचा प्रभावच आहे.]

[वृत्त—श्यामाराणी]

सांग तुझा संदेश मांडवी सांग तुझा संदेश !
कालचक्र हें गरगर फिरवी
किती दिसांनीं दर्शन घडवी
हृदय उमलतें आज मांडवी
तव आचमनीं क्षणीं हरपले कितीक माझे क्लेश.

समर्थगुरुची कर्मभूमि ही
पिढ्यापिढ्यांची जन्मभूमि ही
दर्शनदुर्लभ परि मज होई
पोटासाठीं पेहरता हा गुलामगिरिचा वेश.

पात्रीं तुझिया खेळ मांडिले,
किल्ले रचिले, झरे खोदिले,
वाद तयास्तव तुंबळ केले,
उमेदिच्या परि वठे न पात्रीं कृतिचा त्या लवलेश.
कुठें तुझें जळ गिरक्या घेतें,
कुठें शिळेच्या कवेंत घुसतें,
खडकासंगें धडका देतें,
शक्ति-योग तो आजहि पढवी बळी व्हावया देश.

कहर गुदरला देशावरती
तैं घेउनि शिर हातावरती
देह ठेविले धारातीर्थीं
वीर कुठें ?—खळभारमुक्त तो ज्यांनीं केला शेष.

आज मावळे योद्धे गेले
धुळीस वैभवशिखर मिळालें
काळोखीचा सिंधु उफाळे
देशभक्तिच्या अनन्यतेचा पिकवि पुन्हा आवेश.

संचरतांना तीरावरती
अर्घ्य कितीदां समर्थहातीं
पडले असतिल तुझिया पात्रीं
समर्थदूती तूंच होउनी फिरवियला आदेश.

खनाळांतुनी वाहे खळखळ
पूर्वीपरि हें तव जळ झुळझुळ
मुक्या मनाची दारुण तळमळ
तुझिया गानीं मला ऐकुं दे दासांचा उपदेश.

आनंदाचें या वनभुवनीं
स्वधर्ममंदिर भव्य उभवुनी
प्राण वेंचिले ज्यांनीं ज्यांनीं
अंतकाळच्या आशा त्यांच्या ठाउक तुजला क्लेश.

आज घोकतों इतिहासाचीं
पानें, पोकळ पोपटपंची;
मिरास झालों उपहासाची
नसानसांतुन पुन्हा सळसळो त्या शौर्याचा त्वेष.



२१०

चीड अंतरीं सदा भडकते
जिव्हेवरि परि वाणी अडते
लगाम कांटेरी ही नडते
या दंष्ट्रांना पाणि पाज तव, तुटेल ती निःशेष.
हताश मृतवीरांची वाणी
खणखणते या तुझिया गानीं
अखंड घुमुनी राहो कानीं
तरीच कांहीं हातुन अमुच्या घुवुन निघेल अपेश.

येरवडा, १७-११-२४

## नट

[सुनीत]

ज्यांनीं केवळ अंगच्या अभिनयोत्कर्षामुळें आघुल्या
आनंदोर्मि तशाच अश्रुसरिता वाहावया लाविल्या
आम्हां आदरणीय आप्तसम ते सर्वत्र नारीनर
देती धीर भयाणतेंत, करिती नैराश्य चेतोहर.
तच्चारित्र्य न खाजगी विदितही, धंद्यांतलें तेवढें;–
त्यायोगें सहजों परी घडतसे सत्कार्य हें केवढें.
यासाठीं लटकावुनी निशिदिनीं डोळ्यांपुढें तस्बिरा
आम्ही पाहत राहतों, परिसतों तद्भावगुप्ता गिरा.
त्यांच्या कायिक संपदेस भुलणें ती कामुकांची मति,
सौंदर्यांतिल फक्त पार्थिवपणा दे पापियांना रति;
आम्ही पार्थिवतेंतुनी पलिकडे नेऊन दृष्टी तिथें
सौंदर्यावरणीं प्रभूत भरल्या न्याहाळितों दिव्यते.
सौंदर्याभिनयें जयीं वठविल्या आदर्शवत् भूमिका
व्हावी तत्स्मृतिसिंचनें न सुफला अस्मन्मनोभूमि कां ?

येरवडा, १०-१०-२४

# मारवाडी तगादा

[ दिंडी ]

खुले ऐन्याची किती कुंचि याला
वदे आई अंकिंच्या बघुन बाळा
'टाक बाई आजच्या आज पैसे'
तोंच कानीं थडकले शब्द ऐसे.

मूल पदराखालती स्तनीं पीत
अश्रु बाईच्या उभे लोचनांत.

वक्त झाला शेतास निघायाचा
मोलमजुरीनें पोट भरायाचा;

तोंच दारीं येऊन मारवाडी
शब्द घाकाचे असे खडे काढी.

भयें स्तनिंचा गोठला क्षणीं पान्हा
बघे पदराबाहेर मुका कान्हा.

बीज कडकडली पुन्हां तगाद्याची
वृष्टि आईच्या होइ आसवांची.

जया ठिगळें जोडिलीं ठिकठिकाणीं
चिंब झाला तो पदर आसवांनीं.

रुद्ध कंठांतुनि शब्द तुटक आला—
" खास पैसे देईन सांजच्याला.

करा गरिबावर दया एवढीच.
लांब नाहीं, वायदा आजचाच."

शेट आले करकरित तिन्हीसांजा
मूल घेउनि बैसली होति गोजा;
सोडुं लागे ती पदरगांठ बाई
बघत उघड्या तान्हुल्याकडे राही.

पुसे मध्यंतरिं शेटजी "मुलाची
कुठें ऐन्याची अम्हांकडिल कुंची ?"
तिनें बाकी–वदतां न–पुढें केली;
शेट वळले, अंधार भोंवताली !

येरवडा, २६-४-२४

## आत्मार्पण

[ सुनीत ]

अस्ताद्रीवरि ठेपला दिनमणी, दृष्टी वळे त्याकडे
झालें धस्स उरांत तत्क्षणिं, जसे कांचेस जाती तडे.
गाण्याच्या सरत्या सुरावरुन या दृष्टी उद्यांच्या वरी
लागे आणि गमे गळा धरितसे दाबून कोणी तरी.
सुट्टीचे दिन संपले, फिरुन तो घाणा उद्यां ओढणें;
सौख्याचे दिन संपले, फिरुन त्या दुःखामध्यें डुंबणें;
स्वेच्छेचे दिन संपले, फिरुन त्या आज्ञेमध्यें राबणें;
प्राणाचे दिन संपले, पुनरपि प्रेतापरी राहणें.
आतां पाखडसी किमर्थ अपुले हे प्राण रे दुर्बळा ?
टांचा घासुनि केवि येइल दुरी लाथाडतां मृत्युला ?
लोहस्तंभ समोर तप्त, झणिं दे त्यातें दृढालिंगन
उत्कर्षास्तव बंधुच्या कर झणीं अग्नींत आत्मार्पण

काल ७८८

त्वद्देहज्वलनींच बंधुजन हे स्वातंत्र्यदेवीप्रती
न्याहाळून, उद्यां प्रसन्न करुनी घेतील ती निश्चितीं.

येरवडा, २-१-२५

... ग्रंथ संग्रहा ... नं. ... ना. ... ठाणे.

## सुखाच्या पेल्यांतून—

[ सुनीत ]

संसारीं सुखसाधनार्थ झटतां कांहीं सुखाचे क्षण
दुःखांनीं भरल्या दिनांतुनि मला येतात भेटावया.
माझें दैव जधीं कधीं सुखसुधाप्याला मुखाशीं धरी
हर्षोत्फुल्लमनें तया घटघटा मी प्यावया लागतों
'आलें खाद्य' म्हणून जेविं वदनीं मासा गळाला धरी.
घ्यावें जों घुटके रुची प्रथमता लागे जिभेला बरी,
मागाहून परंतु येइ कटुता त्या कोयनेलापरी.
सौख्याच्या चषकांतुनी मजकडे येतात दुःखें अशीं,
स्वीकारून सुखास अंतिं पडतो हा जीव ऐसा फशी
अन् बोले 'फसव्या सुखापरिस तीं निर्भेळ दुःखें बरीं'.
माझा संतत जीव वंचित असा वार्ता सुखाची जरी
कानीं आदळली तरी हुरळुनी जातो न अभ्यंतरीं.

येरवडा, २७-११-२४

## पत्रिकाहवन

[ सुनीत ]

गेहीं निर्जनता, भयाण रजनीसाम्राज्य विश्वावरी,
भालू भीषण साद देति मधुनी रानांत शेजारच्या;
अग्नी पेटवुनी तदा पसरलें त्याच्यापुढें आसन,
घालूं नाचहि लागल्या उसळुनी ज्वाळा वरी हावऱ्या.

वक्षीं ठेवुन वाम हस्त, उजव्या हातांतली आहुती
मंत्रोच्चार करून ऋत्विज जसा अग्नीमधें अर्पितो,
माझें वक्ष धडाधडा उडत तें डाव्या करीं दाबुन
देतों आहुति एक एक तिचिया या प्रेमपत्रांतली.
हा थंडावत चालला अनल जा जा अग्निनारायणा !
झालें, पार जळून राख बनलीं हीं स्मारकें प्रीतिचीं !
राखेच्या परि कागदावर दिसे सुस्पष्ट तीची सही,
वायूनें उडवून तीहि दिघली; –हें संपलें नाटक !
खेळाची सुरवात आणि बघतां हा आजचा शेवट,
पेटे अंतरिं अग्निकुंड, जळतो त्याच्यामधें हृत्पट.

येरवडा, २६-११-२३

## मनमोहिनी

[ वृत्त–मोहिनी ]

सदाकदा जातां येतां तुला पाहियेलें
परी आज माझें मन तूं गडे मोहवीलें.
देवघेव झाली पूर्वी क्षेमकुशलतेची
परी औपचारिकतेची आणि सभ्यतेची;
खुल्या दिलाची नच किंवा खऱ्या जिव्हाळ्याची

स्मरणनिधीमधुनी दिन ते पाझरून गेले
परी आज माझें मन तूं गडे मोहवीलें.
जिथें प्रभा सौंदर्याची असे फांकलेली
तिथें रसिकतेची दृष्टी सदा गुंतलेली.
रूपमती लीलावति तूं असूनी मराली

कधींही न नजरेनें त्या तुला देखियेलें
परी आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

आज नाहिं कारण पडलें प्रश्नउत्तरांचें
भव्य लोकसंमर्दामधि कोण गे कुणाचें
आपआपुल्या इतमामीं मग्न असायाचें

सहज तुझ्या परि नयनांला नयन हे मिळाले
आणि आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

क्षणोक्षणीं वाढत होती वाहवा गुणांची
जणूं उधाणाची वेगें लाट सागराची
जणूं कला चढती राहे शुक्लसुधांशूची

तुझ्या बाजुला तों नकळत नेत्र मम पळाले
आणि आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

मिळे तुझ्या तन्मयतेमाधिं साक्ष कौतुकाची
तदा आरती तूं धरिली प्रेमलोचनांची
तुषा पुष्पवृष्टी केली अरुणकपोलांची

अशा हावभावांनीं तूं मला गौरवीलें
आणि आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

तुझ्या वाचिली मी भाळीं सनद या यशाची
तुझ्या हालणाऱ्या ओठीं माझिया स्तुतीची
गोड मूक कवनें स्फुरलीं प्रीतिच्या उषेचीं

अशा हावभावांनीं तूं मला गौरवीलें
आणि आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

आणि पुन्हां जातां जातां वळुन पाहिलेंस
आणि पुन्हां दारामधुनी नजर टाकलीस
आणि असे वरचेवर तूं बघुन जिंकिलेंस

दार भविष्याचें परि तूं कां न खुलें केलें ?
आणि आज माझें मन तूं गडे मोहवीलें.

येरवडा, १५-१२-२३

## भग्नहृदयेचा शेवटचा निरोप

[ गजल ]

सुखानें जाउं द्या मातें कशाला घालतां मोहीं ?
कशाला आणुनी अश्रू मला या लोटितां डोहीं ?
मनाला झोपुं दे माझ्या मुक्यानें या निरोपातें
कशाला जाग दुःखाची वदोनी आणितां त्यातें ?

कितीदां पातली पूर्वीं घडी ऐशी निरोपाची
परंतू तीव्र ही आजीं वियोगीं धार दुःखाची.
तुटाया लागतां तीनें तणावे संयमाचे या
कुठोनी धीर व्हायाचा पुढें पाऊल टाकाया ?

नका हो दृष्टिला दृष्टी वियोगव्याकुला लावूं
तियेनें शोकसिंधू या उरीं लागेल हेलावूं.
अशानें दुर्बलेच्या या न आणा भंग निर्धारा;
फिरा जा ! जीविताचा या मनोरा ढासळे सारा.

जहाले पाठमोरे ते !... अतां निष्प्रेमसंसारीं...!!
खरी मी आत्महत्यारा !!...किती काळोख कांतारीं...!!!

येरवडा, २१-६-२५

# रूपसम्राज्ञीस—

[ गजल ]

त्रिलोका तूंच सम्राज्ञी अनन्या रूपसंपन्ना
'मनीषा आपुली बोला' जरी या बोलसी दीना

नको उत्तुंग सोनेरी मला प्रासाद राजांचे
न साहे तेज नेत्रांना विजेच्या रोषनाईचें
दरिद्री दासदासींची रुक्यार्थी ती नको सेवा,
जयाचा वीट ये ऐसा नको तो साखरी मेवा

स्वतांच्या हुकूमतीखालीं नमावें सानथोरांनीं
कशाला पाहिजे ऐसें!- नको स्वामित्व सैतानी
तुझ्या शब्दांस सामर्थ्यें मिळालीं कल्पवल्लीचीं
तरीही वैभवें सारीं नको मातें कुबेराचीं

रहाया तारकामेळीं मिळो तें भाग्य चंद्राला
भुलोनी मी न जायाचा कधीं त्या सौख्यलोभाला

करूं दे राज्य सूर्याला जगन्माथां दिमाखानें
वितानाच्या कपाटाचे सुरांना आवडो खाने
निजूं दे शेषशायीला सदा रत्नाकरापोटीं
पडावी मोहिनी यांची मला कां ?—सर्व हीं खोटीं !
जरी तूं पाहिजे तें तें जना या द्यावया शक्त
तरी हा भक्त तुझा गे म्हणे दे एवढें फक्त—

ललाटीं चंद्रकोरीला शिवानें ठेविलें आहे
अरेरे, भाग्य दोघांचें वदा हे क्षुद्र कां नोहे ?

तुझ्या भाळीं नभोगंगा तिथें मी होउनी कोर
रहाया वांछितों, देणें तरी दे भाग्य हें थोर

जरी मी पात्र ना याला, न आशा ठेवितों याची
तुझ्या भ्रूनर्तनीं देई स्वरूपें स्वेदबिंदूंचीं

तुला वेणींत गुंफाया हवें ना केतकीपान ?
करोनी कांचनीकाया मला दे तेंच कीं स्थान

परागाला मिळे जागा गुलाबाच्या कळीमाजी
कपोलीं तीळ होवोनी रहाया मी सदा राजी

फुलांचें पारिजाताच्या सुरांना मोल वाटावें
तुझे रत्नोष्ठ हे कां मी न सेव्य श्रेष्ठ मानावे ?

तुझी संजीवनी प्रीती, मला तूं देवयानीच
कचाचा मान दे मातें, नसे मी घातकी नीच

अहाहा, भाससी लक्ष्मी, तुझ्या त्या पावलाखालीं
मिळो दे जन्म पद्माचा, लिही हा लेख या भाळीं.

क्षणीं तों शारदेऐसी मला तूं भासमान् होसी
सतारीचें मयूराचें तरी कां रूप ना देसी ?

विरूनी जाउं दे किंवा तनू ही अंतराळांत
सुमांगी ! वास लाभाया तुझीया अंतरात्म्यांत.

येरवडा, २३-४-२४

# सारंगीवाला

सारंगि सारखी तव वाजवुनी टाकी जन गुंगवुनी
घोर रजनी विकट हांसे
वस्तुठायीं भूत भासे
परि सूर ऐकतां दूर जातसे काहुर मनिंचें पळुनी

किरकिरे ही रात्र काळी
कीं ग्रहांच्या ताळमेळीं
वाचते जगाच्या लेख कपाळीं ठेवियले जे लिहुनी

कटु निराशा माजलेली
नजर पुरती अंध झाली
अंधार हराया दीपराग कीं बघसी तूं आळवुनी.

लागले हे दीप गगनीं
वादनाच्या मंजु गानीं
अंधारसिंधु मंथुनी फेंकिसी उडुरत्नें कीं गगनीं

तीव्र समरीं जीविताच्या
फुटति छाती ज्या जनांच्या
तूं धन्वंतरि, तीं हृदयें देसी संगीतीं सांधवुनी

प्रेम सरलें, शरिर कसलें—
प्रेत बनलें, त्यास अपुलें—
परि आयु सार्थकीं लावाया पथ देसी कीं दाखवुनी.

हें उपाशी मूल उठलें
माउलीचे अश्रु प्यालें
अंगाइ गावया तया हिंडसी सारंगी वाजवुनी

धूळ जीतें शेज झाली
येथ निजली ही हमाली
चैतन्य द्यावया तिला उद्यांस्तव अवतरसी दिव्य मुनी
उदरभरणीं चोर उठले
देह गणिकांचेहि नटले
परि दिव्य भाव अंतरीं त्यांचिया पालवसी कीं फिरुनी
भंगलेच्या आत्महृदया
रोज फिरसी शांतवाया
परि भग्नहृदय जीवांस मिळतसे विरंगुळा या गानीं
कर कसेंही कर्म दिवसा
सूर रात्रीं घुमवि ऐसा
नेतील विमानांतुनी देव तुज आनंदें निजभुवनीं

येरवडा, १८-१-२४

# गिरीश

## ध्यान

संसार-तापानें जीव जधीं पोळे,
कृपामेघ वोळे तेव्हां तूझा
त्रासूनिया कोठें ओढ्याकाठीं जावें,
ध्यान एक ध्यावें तेथ तूझें
जळाची खळ्खळ, झाडांची पालवी,
जिवाचा घालवी ताप दूर
ध्वनी गोड तुझा ऐकूं येई त्यांत,
रूप फुलोऱ्यांत दिसे तुझें
गायक तूं थोर, सौंदर्याचा ठेवा
नाहीं शांती जीवा तुझ्यावीण
शांतवाया मन एक तुझ्या पायीं,
जीव धाव घेई म्हणुनीया

रहिमतपूर, २९-५-२४

## घाटांतील धुक्यांत—

रानें, डोंगर, भोंवतीं हिरवळी, ओहोळ उंचावरी,
झाडी दाट, कडे भयाण, मधुनी रेखीव रस्ता असे
काळे मेघ नभीं, दऱ्यामधिं धुकें, येतां वरोनी सरी
गेलें अंग भिजून; पूर हृदयानंदास तों येतसे
आल्या तोंच चळा-सरीवर सरी; वाफा तयांच्या किती
कंगोऱ्यावरुनी सुसाट पळती वाऱ्यासवें सुंदर

पायीं छुम्छुम्वीत नूपुर, वरी कीं अप्सरा धांवती ?
दाटे शुभ्र धुकें; क्षणांत उरलों मी अन् पयःसागर !
वृत्ती तों स्थिरल्या, गभीर बघुनी खालीं, वरी शुभ्रता
" खेळे कोण असें ? कुणास्तव बरें तें विश्व चेतोहर ?
येथें कोण घनी ? कुणास्तव असे गंभीर ही दिव्यता ?"
बोलें, आणिक दृष्टि आंत वळवीं शोधावया अंतर
माझें तेज मला विराट दिसलें ! सृष्टी पुन्हा हांसली;
चैतन्येंच नसानसांतुन तिच्या माझीं मला भासलीं

पुणें, ३०-७-२३

## तळमळ

उन्मन व्हावें। व्याकळून त्यांतच जावें
काय जिवाला हवें, कळेना
आशेला आपुलें मिळेना
कृतीस कांहींच आकळेना
आंत जळावें। व्याकळून त्यांतच जावें
एकाएकीं ढग हे येती
तळमळ अंतरिंची वाढविती
सरी अश्रुच्या मग कोसळती
त्यांत भिजावें। व्याकळून त्यांतच जावें
धुकें दाटलें चहुंबाजूला
लाटांनीं सागर फेसळला
पैलथडीची आस कशाला ?
हाकारावें। व्याकळून त्यांतच जावें

भयाणता भंवतीं वावरते
सारंगीवर बोट न फिरतें
काळिज आंत असें चरचरतें!
कोमेजावें। व्याकळून त्यांतच जावें.

या ताऱ्यांतुन, त्या ताऱ्यांतुन
पुष्पांच्या नाजुक सृष्टींतुन
उगिच फिरावें कढुनी आंतुन
शांत न व्हावें। व्याकळून त्यांतच जावें

बोल फोल कां मग बोलावे ?
अनुभूतीविण कां डोलावें ?
किति दिन ऐसें आंदोलावें ?
कुणा सांगावें। व्याकळून त्यांतच जावें !

पुणें, १३-२-२५

## निजलेल्या वसंतास

[ पृथ्वी ]

मुखावरि तुझ्या अशी अचल दृष्टि मी लावुनी
मनांत रमतों सख्या! हृदय जातसें लोभुनी
तरंग उठती किती वदनचंद्र हा पाहुनी,
असेल सुख कोणतें अतुल राजसा! याहुनी ?

विशाळ तव भाळ हें, रुळति त्यावरी कुंतल—
मनोहर कसेतरी; मधुनि शोभतें काजळ
कमान भुंवया तुझ्या गरुडपंख कीं दाविती ?
गुलाबकळिका टपोर तव लोचनें भासतीं

तुझी सरळ नासिका मदनबाणपुष्पापरी;
उषा मधुर विंबली जणुं तवाधरीं लाजरी;
तयांत लपल्या जणों धवल तारकांच्या कळ्या;
मधेंच हंसतां किती खुलति गोड गालीं खळ्या!

लहान जिवणी तुझी, हनुवटी तयाखालती
सुरम्य मघली वळी खुलविते मुखाला किती;
सतेज सुषमा मुखावर तुझ्या किती शोभते!
प्रसन्न मुखशांति ही मजसि मारुनी टाकिते

पुणें, २९-३-२४

## दोन पातकी

१

तशीच होती सुंदर त्याची तारुण्याची कांती
त्यांत संपदा स्वच्छंदानें खेळत होती हातीं
शीलमंदिरा आग लावि तो मोहुनिया रंगेला
मोहरलेला पूर्ण चंद्रमा क्षणीं कलंकित झाला!

" दिवस चार हे अशा मजेचे! असेंच चालायाचें,
अंगांगांतुन मुस्मुसलेलें यौवन जेव्हां नाचें!"—
बोलुनि ऐसें त्याच गांवचे करुनि करुनि शिणलेले
करीत होते कौतुक त्याचें सभ्य कुणी पिकलेले

× × ×

आणि एकदिन अन्नाला तो पुरा पारखा झाला
धुंदी जाउनि कृतकर्माचा डोंगर दिसला त्याला

---

१ E. W. Wilcox च्या Two Sinners चें हें रूपांतर आहे.

पश्चात्तापें जळूं लागलें अंतर आणिक पाप
मिळूं लागली हळूहळू मग हृदया शांति अपाप
मुखीं शारदा नाचे; लक्ष्मी लोळण घेई पायीं
शास्त्रीपंडित वदती ऐसा थोर महात्मा नाहीं
धनवंतानें कुणी सुशीला अर्पुनि अपुली बाला,
आणि जनांनीं फुलें उधळुनी, गौरविलें ही त्याला

२

कुलशीलवती अशीच दुसरी कोणी बाला होती
तारुण्याची कांती म्हणजे केवळ शुक्री मोंती !
पावित्र्याची, प्रेमळतेची, सहृदयतेची देवी
तिला जगाची वरची माया ठाऊक असणें केवी !
विनोदशीला, रूपमोहना, अल्लड, भोळी बाला
प्रेमाभासें अवचित फसली शब्द-शृंगाराला
एकजिवानें, एक मनानें प्रेमें वरिलें ज्याला
तोच महात्मा कुमारिकेचा गळा कापुनी गेला !

× × ×

पश्चात्तापें जळलें अंतर ! गळल्या अश्रूधारा !
मातापितरीं केला तिजवर दुर्वचनांचा मारा
शास्त्रीपंडित थकले चाळुनि धर्मसिंधुचीं पानें
धिक्काराविण धर्म न दिसला ! जनता तर अवमाने !
प्रकाश दिसला तिला न; कैसें विदुषीपण लाभावें !
मागणीस ही यावें त्यानें जनवचनीं परतावें !
असाच कोणी एक सुधारक आला, आणिक गेला !
आणि तिनें मग हळूच रात्रीं आड आपुला केला !

२०-१२-२४

## सारंगीवाला

मनमोहन ! वाजवुनी सारंगी काढी मंजुळ सूर
विश्व निजलें, शांत झालें !
एक धरणी मात्र डोले !
गंभीरपणानें अंधारांतुन छेडित जाई सूर
कंप वाऱ्यांतून कानीं
तरल येती गोड गानीं
समरसती हृदयीं भाव; लागते गोड मना हुरहूर
नाचती हे वरति तारे
गात डुलती मंद वारे
बघ तालावरती नाचुं लागलें हृदय वाहुनी पूर
अंगुलीची रागदारी
आंत उठते गुंजणारी
मग एकतान होऊन ऐकिते आंतून कुणि आतूर
जीव डोले दिव्यतेनें
रोमरंध्रीं भरुनि गाणें
मन तन्मय होउनि मधुर माधुरी सेवित झालें चूर
रस, कला या एकवटुनी
बोलती कीं झंकृतींनीं
सौंदर्य नाचतें थय्थय्, वाजति शब्दांचे नूपूर
काय कसलें गान गावें !
शांत चित्तें व्याकुळावें
तळमळुनी त्यांतच शोधित जावें, वाटें, पुढती दूर
म्हणुनि वरुनी येथ येसीं
देव कीं गंधर्व गासीं
शांतवी लकेरी दग्ध जिवा—तरि, छेड छेड ते सूर

पुणें, १३-१-२४

# संशयरत्नमाला

[ संपादकाकडे पाठविलेलें लिखाण 'साभार परत' आलें म्हणजे काय होतें, हें अनुभवानेंच कळतें. त्यांतून संपादक मित्र असल्यास व त्यानें फार दिवस कृपापत्र न पाठविल्यास तर लेखकाच्या भक्तीस उमाळा आल्यावांचून रहात नाहीं. अशाच एका अफाट तळमळींत हें काव्य उमळलें आहे. मोरोपंतभक्तांनीं मात्र क्षमा करावी.]

[ आर्या ]

१

लिहितां बहु त्वरेनें, 'लिहितां कोणास' हें तुम्हां देवी
पुसती झाली जाणों; पुसतां, ओढील ओळ कवि केवी ?
कीं कवि-नारदं[1] आला, आलापीत स्वकीय सच्चरितें;
आत्मस्तुति कुणाला हरि ना ? हरिणापरीस वश करि ते
कीं होतकरू कवींनीं खेंचुनि नेलें तुम्हां चहापाना,
आणि गळीं उतरविल्या कविता आपुल्या, लेकरींनीं नाना ?
कीं हळुवार, प्रेमळ कविपरि मन रंगलें चिदानंदीं,
आणि कुणा रसिकाला पाजितसां काव्य आपुलें, बंदी[2] ?
कीं भीता, मज एका लिहितां, दुसरेहि लागतील झटे ?
परि टीकाकार तुम्ही पोलिस; कवि पाहुनी तुम्हास, हटे
किंवा तुम्हास कवींनीं स्वग्रंथाची न भेट पाठिविली,
तरि रामभटा दुखणें, शामभटा औषधेंच पाजिवलीं ?
कीं बहुकाळ विसरला, फारच संकोचला, सखा लाजे ?
कवि असुनि लाज उरली ? कर्णी तुमचा न थोडका गाजे ?

---

१ नारदी दीक्षा मिळालेला कवि. २ अहो शाहीर !

कीं "झेंडुचीं फुलें" कुणि भेट तुम्हां पाठवी कवी थोर,
स्तुति-कौमुदि-वर्षावीं काय विरमलां तुम्ही कविचकोर ?
किंवा लिहुनि 'सुनीतें' ठेवियली लेखणी तुम्हीं खालीं ?
वाद करायासाठीं काठी किंवा करामधें आली ?
परि जाहले 'सुनीत-स्वनितक'–वादांत लोक हैराण;
या गाजवा हुशारी, करुनी वाङ्मय पुरेंच वैराण
होउनि रणसंग्रामें, आली विद्वन्मुखावरी लाली;
तरि जग उद्धाराया वेळ असे सर्वथैव ही आली

× × ×

संपादकीय खुर्ची किंवा क्षणभरि हि ये न सोडाया
न चुकावी कीं सेवा ? कीं मीं यावें असें न मोडाया ?
कीं संपादक तुम्ही—लेखक मार्गांत आडवे झाले !
नाकारिलेत ज्यांचे लेख तयांच्या पुढें कसें चाले ?
किंवा चुकलें कांहीं स्तवनीं तेणेंचि हात आखडिला ?
परि अल्पबुद्धि मी; कीं भरणें भरपूर माप या घडिला ?
कीं कर बांधुनि दोन्ही संपादक-मंदिरा कसें जावें,
हें ठाउकें न लेखक असुनि मला; तरिच कीं न बोलावें ?
कीं लिहुनि जाहिराती, आणि तपासूनिया प्रुफें, वाटे
दौतीमधली तुमच्या अथांग शाई खरोखरी आटे !
किंवा लिखाणपुरुषा ! संप्रति बहु भागलांत या कामीं,
निजलां दमून नुकते, फोडितसें तोंच काय हाका मी ?
किंवा गचाळ लिहितों आणि असा मी गळ्यामधें पडतों
संकट पडें तुम्हां हें ? वशिल्याविण मार्ग सर्व परि अडतो

कीं 'वशिला न जुमाना' त्यासाठीं प्रथम वाहिल्या आणा
सदया धुरे प्रतिज्ञा; वर्षद्वय येथलें मनीं आणा।

कीं अंक दैनिकाचा मोफत मागेन ही मनीं भीती?
परि खेळाचे दिवशीं नट–मैत्रीला न काय ये भरती?
किंवा शतपत्रांचा केला संकल्प एक मासांत,
तो संपला, अडकला दुर्दैवें दीन मित्र फासांत?

किंवा कार्यबहुत्वें फावेना एक ओळ ओढाया?
किंवा गप्पा सोडुनि, वेळ न दवडाल मित्र जोडाया?
किंवा शंभर पानें लेखक शिवराळ लिहुनिया पत्र,
प्रेमें तुम्हा शिणविती? परि नाहीं घातलेंच कां सत्र?

सोडा पाहुणचारा, विश्वाचें काम घ्या जरा हातीं,
संपादकाविणें नच लेखक-कविंना कुणीही दे माती!

× × ×

कीं नाटक लिहिण्याचा कांहीं सुविचार मानसीं आला,
तुकडे जमवायाला प्रतिनिशिं नव नाट्यमंदिरीं गेला?
कीं ग्रंथकार सत्कवि कादंबरिकार मागले वाचूं,
अन् गोघडी विणूनी, चिंतितसां कीं हवेंतसें नाचूं?

कीं झाला प्र[1]. प्र. तुम्ही, म्हणुनि सदाचेंच लागलें दार?
मोठेपण मिळवाया हें, झालां काय केसरीकार?
कीं 'मल्लिनाथ[2] मूल्टन झालों, अवतार–कार्य आवरलें,'
हें वाटतां जगाशीं अपुले संबंध काय हो सरले?

---

१ प्रसिद्ध प्रस्तावनाकार. २ सुप्रसिद्ध टीकाकार

थांबे लेखण तुमची, आतां प्रस्तावना लिही कोण ?
कविच्या पाठीवरली आतां उतरील कोण हो गोण !
किंवा मजहुनि दुसरा कोणी रंगेल मित्र आढळला,
तच्छुभ–दैव–समीरें त्यावरि करुणाघना ! तुम्ही वळला ?

कीं डाकेच्या मार्गीं माझें दुर्दैव आडवें पडलें ?
अपघात रेलवेला होउनि, येणें न पत्र कीं घडलें ?
कीं नोकर जाईना टाकाया पत्र, वागतो स्वैर,
न पुसे, न भी, न ऐके यास्तव दोघांत लागलें वैर ?

डाकेंत पत्र कीं कुणि टाकाया धाडिलांत शेजारी,
घोटाळुनिया तुमची फिरवी धांदल तयास माघारी ?
प्रायः सुमुहूर्तांचा शोध करायासि लागला वेळ ?
कार्य न करणाराचे रिकामपणचे असेच वा खेळ ?

कीं ग्रेस, रूथ अथवा पॅथेची पर्ल मोहवी नयनां,
संस्कृतिचें हें भूषण मिळवितसां; आणि राहिली सय ना ?
कीं म्हणतसां समर्थोऽइं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं !
परि भोंवतालचे ध्रुव देतिल कैसें तुम्हां असें नर्तु !

कीं दुसऱ्या मित्राचें नाचत होतें मनापुढें चित्र,
पत्ता लिहून त्याचा घोटाळा उडविलांत सर्वत्र !
किंवा पुरूरव्यापरि लिहण्याचें पत्र मानसीं ठसलें,
प्रतिमित्र प्रियजनसा भासुनि, कीं शब्द अश्रुनीं पुसले ?
कीं रोड 'श्री' दिसली ! आले नयनीं तयामुळें बिंदू;
पदरामधें तयांचा कीं तुम्ही सांठवीतसां सिंधू !

---

१ 'श्री रोड कशानें झाली' ही जांवईबुवांची गोष्ट सुप्रसिद्धच आहे.

कीं भय बहु दिवसांनीं भेटाया दीन बंधुला वाटे;
पाहोनि सावकारा ऋणकोचें हृदय तें जसें फाटे !
किंवा 'दिवाकरापरि, आपण उजळावयास जग आलों'
वाटुनि, निराशला कीं 'अंधारीं तेंच ठेवुनी गेलों !'

× × ×

अथवा कोठें झाला सुंदर पथिकाश्रमामधें दंग,
मोहुनि मोहकतेला उडवितसां मित्रसंगतीं रंग ?
किंवा जेवायाचें दिधलें कोणी निमंत्रण प्रेमें,
सुचवितसां उपदेशें पक्वानांचीं तुम्ही तया नामें ?

मी दीन, परी माझें आहे औदार्य थोर, हें जाणा,
देईन मेजवानी काढुनि ऋण ही तुम्हां, मनीं आणा।
'न बरीन लेखणीतें' कां हा धरितां उगाच अभिमान !
'शरणागती' लिहाया धरितां तिजला; किती तिचा मान !

तरि विनवितों उदारा ! उचला अपुलें अमोघ तें शस्त्र;
पत्रें छापिन तुमचीं 'संशोधन–मंडळांत' एकत्र !

पुणें, ३०-९-२४

# सौ० मनोरमा रानडे

## विनवणी

[ अभंग ]

किती करूं विनवणी, याहो राया या धांवुनी।
देव भावाचा भुकेला सत्य करा वैखरीला
घांवण्याची माळ केली गळां आपल्या गुंफिली
हृदयाची भक्तिज्योती आरती ती ओंवाळली
पंचप्राणांचा नैवेद्य समर्पिला तुम्हां वंद्य
अवघें शरीर वाहिलें सेवेलागीं झिजविलें
भक्तालागीं आशा व्हावी प्रेमकसोटी पाहावी
तुम्हासाठीं जन्म माझा लावा आतां योग्य काजा !
गडे ! उगा कां उशीर भेट द्या हो वेळेवर
अंत नका पाहूं आतां तुम्हांवीण कोण त्राता
जनीं वसुनीही झाली तुम्हांवीण ही एकली
जिव झाला हा हैराण नुरें देवा ! देहीं त्राण !

## निदानीचे बोल

खुशीनें लागलें नादीं तसा ये डाव रंगांत
अहंता सर्व लोपोनी सळाळें प्रेम अंगांत
दुजें कांहीं नुरे चित्तीं तुझ्या नेत्रीं खिळे दृष्टी
अकस्मात् शांति जीवाला सुधेची लाभली वृष्टी
शरच्चंद्रप्रभा विश्वा जणों कीं व्यापुनी राही
प्रभातीं गंध प्राजक्तीं मला भूला मिळे कांहीं

असें वेडीच मी नाथा !
उदारा! मात्र त्वचित्तीं
तुझी जोडी मिळायातें
गुणांच्या अंतराची कां
जशी आली तशी गेली
तुझा हा खेळ थट्टेचा
उभारा आटला माझा
कढ्याचा मार्ग चिंचोळा
तुझ्या एकेक शब्दाचें
धुन्दां तें प्रेम जोडाया
घनव्यासा निशा भारी
फुलें हीं सोनटक्क्याचीं
उभी मी प्रीतिच्या दारीं
सख्या रे ! जीवघेणी हा
कसा दुष्प्राप्य सोन्याचा
पुराची वाटते भीती;
नको हा खेळ थट्टेचा
परीक्षा नित्य घेवोनी
स्मृती मागील प्रेमाची
पहा अक्षय्य हृत्प्रांतीं
तुझी सत्संगती लाभे
परी टोंचे मनाला कीं
निमू दे उत्कटा वृत्ती
निदानीचेच हे बोल

कलेचा दिव्य तूं तारा
तिरस्कारा नसे थारा
जहाले फार सायास
नुरे जाणीव प्रेमास !
तुझी राजापुरी गंगा
करी मद्भावनाभंगा
मनीषा जाहल्या फोल
कशी मी सावरूं तोल
जगीं ना आढळे मोल
करूं मी काय रे ! बोल
चढे डोळ्यांस अंधारी
सुकोनी चाललीं सारीं
कशी राहूं, किती वेळ !
सरायाचा कधीं खेळ ?
फुका हा चालला काळ
कडेला सांचला गाळ !
थडीला पैल ने प्रीत
सुवर्णा झीज ये मात्र
दिलेल्या तूं प्रसूनांची
जपूनी ठेविली साची
जहालें त्यांत मी चूर
तुझा कां पालटे नूर
बळें दवा न प्रेमाला !
मिळूं दे मोक्ष शंकेला !

## दुरून—

आनंदी फुलपाखरूं झुकतसे निर्बंध बागेमध्यें
धांवे बागडतां सलील चिमणी गुंगे मनाशीं जशी
तैशी बागडशी मुली ! बहुपरी पर्वा जगाची नसे
सौंदर्यें भरल्या जगांतहि गडे ! नाविन्य, वाटे, तुझें
जेंजें निर्मल सच्चरित्र जगिं, तें कां आचराया भय ?
'कोणी देतिल दूषणें' नच शिवे चिंता तुझ्या मानसां
दृष्टी कौतुक-पूर्ण चौकस तुझी बुद्धि स्थिरावें जिथें
जेथें कोमल सुंदरत्व दिसतें सद्भाव पावे जय !
मूर्ती मोहक गोजिरी चिमुकली उल्हासवीते जडा
नादें गुंगत भिंगरी रिझविते आबालवृद्धां जशी
पाहोनी तव गोड बालसरलस्वाभाविक क्रीडन
होते उत्सुकता अनावर तुझें गे ! घ्यावया चुंबन
निश्वासें करपून टाकशिल ना ? हे पापणी ! स्पर्शनीं—
घेत्यें त्वत्तनु सांठवून दुरुनी चित्तांत, नेत्रांतुनी.

## याचना

[चाल—एकच शांतिस्थान]

द्या आतां वरदान प्रेमला ! द्या आतां वरदान
रविसहवासीं प्रभा रंगली
अरुणासंगें उषा हर्षली
प्रेमनिर्भरा हसूं लागली
हृदय बघोनी भाज हरपतें, मन होई बेभान

भूमी जलदागमिं टवटवली
फुलें मनोहर नाचुं लागलीं,
प्रीतिरसीं ती निमग्न झाली
सुखीं असुनि तीं, मींच करावें जीवाचें का रान !
लता डोलते तरुसंगमनें,
ल्याली पुष्पांचीं आभरणें
उधळित विश्वीं प्रेमगायनें
मोह पाडुनी जीवाला तीं, टाकिति भारुनि कान !
तरुशाखेवर पक्षी रमती
गुंग दंगले प्रेमकूजितीं
विरहाचें भय शिवे न चित्तीं,
तोलुनि त्यांचीं स्थिति बघतां मम, व्याकुल होती प्राण
सुखी असूं दे विश्व विचारें,
शिवो न दुःखाचें त्या वारें
येउनि पडुं दे मजवर सारें
सहन कराया शक्ति असावी एकच इच्छा जाण
प्रिय विरहानें दुर्बल झालें
हतदैवानें जर्जर केलें
आधिव्याधी पीडित झालें
तरी करूं फिर्याद कुणावर, दैव असें बलवान्

## मोहना

[ चाल–एक मेहमा० ]

मोहना ! राजीवनयना ! देई आतां दर्शना
तापलें विरहानलानें पुरे झाल्या यातना ! मोहना०

प्रेम अपुलें सांधलें दृढ     हेतु आला जीवना
लपुनि बसली दूर देशीं     काय तव मनिं योजना! मोहना०
दीर्घसूत्री रात्र जाचे     व्याकुला मम भावना
दर्शवी चित्तीं तुझ्या ही     मत्समा संवेदना! मोहना०
'पीडलों तव विरह-तापें' गोड वच हें बोल ना!
'त्यजुनि नाहीं जात' स्वप्नीं येउनी तर सांगना? मोहना०

## स्मृति

हातीं घेउनि चार पांच गजरे आलांत जेव्हां घरीं
चोहोंबाजुंस पाहिलें, हुडकुनी, ठेवोनि मेजावरी

दृष्टीच्या तुमच्या असे विषय मी कीं अन्य कोणी तरी
शंका वाटुनि यावयास पुढतीं संकोचलें अंतरीं!

भाग्याची इतकी असेल रमणी कोणी जरी राजसा
हेवा कां करुं मी तिचा, सुखवुं दे प्रेमा तिच्या मानसा

माझें प्रेम तुम्हावरी जडतसें, हें भाग्य कां थोडकें
हा संतोष हिरावण्यास जगतीं कोणी न केव्हां शके!

राहोनी क्षण हा विचार विरला, मागोनि येवोनिया
वेणी भूषविली तुम्हींच गजरा सप्रेम घालोनिया

आनंदास उणें गमें जग मला, दुग्धीं पडे साखर
कीं त्वत्प्रेमनिधान मीच बनलें, तूं सर्व जीवेश्वर

पूर्वीं तूं क्षण संशयें द्विगुणिता झालीस सौख्यप्रदा
प्रीती! तूं स्थिर आज मात्र विरहीं झालीस ना तापदा!

सौ॰ मनोरमा रानडे

## मुरलीस्वन

[चाल–घनराशी॰]

मन होई वेडें, ऐकुनि कानीं, मुरलीस्वना तव मोहना !
तार मनाची जुळतां गानीं
झरझर अश्रू वाहोनी
अंतःकरणा पिळवटुनी
मी तर देवा ! चुकली मुकली, छळती मना मृदुभावना १

दंगल चाले देशोदेशीं
पटल धुराचें आकाशीं
भूवर खचल्या शवराशी
प्रशांत चित्तें ऐके एकच मुरलीस्वना तव मोहना ! २

मर्त्य देह हा, नरक भोंवती
पशू खेंचती आशा खालति
प्रेमकर तुझा बाहे वरती
रज्जू धरुनी चढण्या बघतें मुरलीस्वना तव मोहना ! ३



मराठी ग्रंथ संग्रहालय ... क्र. ... ता. ... ठाणे

# श्रीधर बाळकृष्ण रानडे

## मुग्ध बालिकेस—

[वृत्त–चंद्रकान्त]

सुखस्वप्निंचीं अभ्रें नयनीं तरंगती बाले
अर्धोन्मीलित मनोवृत्तिची तन्मयता डोले
यौवननवलावण्यरसाच्या लहरीवर कुरळे
निर्झरणीतटतृणांकुरासम मृदु कुंतल रुळले
बाल्यसरलता, यौवनमाधुरि, भावी वत्सलता
अल्लड चेष्टा, सहज रसिकता संमीलित होतां
अस्फुटवर्णी दिव्य, मनोहर अंधुक सुरचाप
बघतां भुलते मती विसरते तीव्र मनस्ताप
पावित्र्याची प्रतिमा केंद्रित ठसलेली वदनीं
उल्हसती जनमनोभावना दिव्य दृश्य बघुनी
कीटक-कंटक–दुःख-पूर्ण जग अजुनी अज्ञात
तोंवर राही मग्न स्वप्नमय गुंगत खेळांत
स्वास्थ्यस्थितिही दुर्मिळ पुनरपि ! कशास ग फुलसी ?
प्रफुल्ल आशाशून्य दिसें जग ! थांबवितों तुजसी.

श्रीधर बाळकृष्ण रानडे

## संजीवन

[ वृत्त—बालानंद ]

फुटे पालवी प्रीतीला
मोद मानसीं कोंदटला
पुलकित जल खगगण गाई
रंग नवे आशा लेई !
ऊन कोवळें दवबिंदू
पेंगत चाले वर इंदू ! १

कशामुळें तें नच कळलें
विषण्णतेनें नभ भरलें
इंदू कोसळला खालीं,
पिसाट वारा किंचाळी
मान गळे लाजाळूची
दिसे अवकळा आशेची ! २

मोद मनींचा हारपला
झुरणी लागे प्रीतीला
निर्झर मेले कृश सरिता
दाहज्वरपीडित सविता
टपटप गळलीं शोकानें
गुलमोहर पिंपळपानें ! ३

पांडुरता गालीं भालीं
दिव्याची मूर्ती गमली
स्मित, भीषण मृदु वच अधरीं
भासें यांत्रिक देह परी
विरहदेवता अवतरली
वसुंधरा कुढकें हंसली ४

धरणी हंसतां पालटलें
सर्व जुनें जन विस्मरलें
हिरवळ कुरवाळित जाई
लपत छपत निर्झर भाई
वीचिनखाग्रें वाळुवर
सुचवित सरिता प्रेमभर ! ५

गुलमोहर भारें लवला
परागमय वायू झाला
रवितेजाचे कण लपले
पुष्पमिषें हांसत आले
धन्वंतरि मृत सृष्टीचा
वसंत नृपती सकलांचा ! ६

आला रे आला श्रवतां
भुरळ पडे प्रीतीचित्तां
पटल हरपलें विरहाचें
अनुसरलें वच सृष्टीचें
यौवनभारें लवलवली
मधु—नृपति—स्पर्शें फुलली ! ७

फुलें बहरलीं प्रीतीला
घोस डंवरले द्राक्षीला
निसर्गनियमच असा असे
कुणा न हें विपरीत दिसे
मोद एकदां हारपला
तो न पुन्हा अजुनी दिसला ! ८

मुंबई, २३-८-२५

दा. क्र. २८१८

# दत्तात्रय लक्ष्मण गोखले

## दोन चाहुली

[ सुनीत ]

होती अंथरुणीं खिळून जननी, झालीं खुलीं हृद्गतें-
घेतां जीर्ण करा करांत, उकले स्नेहें तिथें अंतर.
" केव्हां मी सुनमूख पाहिन, असें झालें मला. पाहतें-
तों तूं पूर्ण उदास ! " " आइ, दिसली स्वर्गच्छटा एकदां-"
" कांहीं खूळ मनांत घेउनि,—तसें किंवा म्हणोनी सदा,-'
आम्हा कांहिं कळे न, शब्द वदसी 'स्वर्गच्छटा' ! काय तें-
पक्कें सांग. मनूस मीं कळविलें, आलीच आतां तर ? "
" आई, अंतरिंची क्षुधा जरि शमे, आहे मला मान्य तें."
" आण्णा ही कसली क्षुधा तव मनीं ? पोरी किती चांगल्या.!
सांगूं कां तवही मनांत भरली आहे कुणी चंचला.
ऐकूं दे मजला कशी तरि असे " ( कैसे करावें इथें ? )
" आई ती ललिताच सून तुज-" " हें थोडें न, चालेल ती."
होत्या चाहुलि दोन येत सहजे निष्कंप लीलागति,-
ऐकोनी वळल्या परंतु परत्या, गेल्या स्खलत्पद्धति.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# गोष्टी

# श्री० बादल

## अश्रुकण

होय ! अजून मला ती रात्र आठवते. बरोबर पंधरा वर्षांपूर्वीची कोजागिरी पौर्णिमा. त्या रात्रीं चंद्रपूरच्या जंगलांत गोंड व भिल्ल रानकाढ्यांबरोबर शेकोटीजवळ शेकत, गोठविलेल्या दुधाचा चहा पीत, दूरवर वाघाच्या डरकाळीनें थरारणाऱ्या हृदयाला कसा बसा धीर देत, गोंडवणाच्या नामशेष झालेल्या प्राचीन संस्कृतीचा, राज्याचा इतिहास ऐकून 'कालाला मानसिक नमस्कार' करीत मी व माझे दोस्त 'जवान मर्द ब्राह्मणभाई' मामासाहेब गोखले मोठ्या बंदोबस्तानें बसलों होतों. गोखल्यांचे दूरचे नातलग चंद्रपूर जंगलांतील बडे अम्मलदार आणि मामासाहेब स्वतः वनश्रीचे—'नेचर'चे मोठे भोक्ते ! मी त्यांचा वनस्पतीशास्त्रापुरता सहाध्यायी. झालें ! त्यांनीं मला विचारतांच मी वनवासोपयोगी खाकीं वल्कलें घेऊन लक्ष्मण बनलों. दुर्दैवी सीतामाई हुजूरपागेंत पायबंद झालेल्या होत्या. आमच्या रामानें स्वतःच वाल्मीकी बनून वनवासवर्णन तेरा सर्गांत लिहून काढावयाचें ठरविलें होतें. विरहावस्थेंत 'पल घडी घडी दिन भासतसे' या चरणाचें रूपांतर 'दिन मास मास ऋतु वर्ष जसे' असें होऊन, आमचा तेरा दिवसांचा सुटीचा दौरा काव्यप्रांतांत मोठी खळबळ उडवून देणार होता. भारतरामायणाशीं स्पर्धा करणारें हें महाकाव्य अजून जगांत न आल्याकारणानें शौनकादिकांस पुराण सांगणाऱ्या शुक मुनींशीं उशीरां जन्मण्यांत स्पर्धा करणार खास. गोखल्यांनीं मला बरोबर कां घेतलें हें गूढ अजून मला उलगडलें नाहीं. मैत्रेय भटजीबरोबर असले तर गोंडवणांत शकुंतला भेटण्याचा संभव होता कीं काय ? कवितेच्या निशाणबाजीचें अरसिक तारकीट किंवा वाघाचा वास येतांच उंच आम्रवृक्षावरून रम्य सृष्टीचें निरीक्षण करण्याची सूचना देणारें अलार्म घड्याळ किंवा विरहगीतिका ऐकणारा 'गड्या मित्रा !' यांपैकीं माझी या प्रवासांतील कोणती भूमिका होती, देव जाणे !

मोंदिया–जबलपूर–रेल्वेनें डुलडुल हलणाऱ्या लहान डब्यांतून आम्ही चंद्रपूर जवळ करूं लागलों. सातपुड्याची किर्र् झाडी दोन्ही बाजूंनीं जवळ येत येत, इंजनाचा गळा आवळूं लागली. सुधारलेलें जग मागें टाकून, आपण कालाचा उलट प्रवास करीत तमोयुगांत जात आहोंत कीं काय असा भास होऊं लागला. वृक्षमय भिंतींतून व दरींतून जातांना टळटळीत दुपारीं अंधार पडूं लागला. सपाट मैदानावर प्राचीन डोंगराचा अवशिष्ट गाभा अशा प्रचंड काळ्याकभिन्न गोल शिला, हत्तीच्या प्रेताप्रमाणें पडल्या होत्या. रामाच्या दुःखानें व्यथित झालेल्या पर्वतांचे, भवभूतीनें वर्णिलेले ग्रावारोदनाचे हे अश्रू कीं काय असा क्षणभर भास झाला. अशा एका शिलेवर 'दृश्यसृष्टीचा बादशहा' एक कोल्हा निर्भयपणानें उभा राहून गाडीची मजा पहात होता. आम्हांस नेण्यास आलेल्या मुसलमान रेंजरानें त्यावर गोळी झाडली. मामासाहेबांनीं मला घट्ट कवटाळून धरून दंतव्यंजनात्मक काव्य गाण्यास सुरवात केली. समेवर 'स्स–हाऽ' असें ते ओरडल्यामुळें रेंजराचा नेम चुकला. त्यानें वळून पाहिल्यावर गोखलेभट म्हणतात, "मित्रा! तुला हलवून मी आतां जो वेदमंत्र म्हणून दाखविला त्याची स्फूर्ति आर्यऋषींना याच ठिकाणीं झाली. दंडकारण्यांत रामानें याच वाटेनें प्रवेश केला. 'प्राचीन स्वेन हेडिन' अगस्ती ऋषींनीं सूर्यमंडळ भेदणाऱ्या दुर्गम दक्षिणातटाचा दक्षिणापथ शोधून काढून पर्वतांना विनम्र करून, 'नमवी पहा भूमि हा चालतांना' असे उद्गार कविमुखांतून काढविलेलें हेंच स्थान. अहाहा! काय हे हत्तीसारखे पर्वत! काय माझी काव्यकल्पना! रेंजरसाहेब, तुम्हांला हे दगड हत्तीसारखे वाटतात कां?" दुसरें काडतूस भरीत रेंजर म्हणाले, "छट्! हत्ती तो फत्तर सरीके मैं समजता हूं. वो पहिला जमाना गया, केसे हत्ती थे! साहेब, ही गाडी नुकती सुरू झाली. मार्कर इंजनेराबरोबर मैं चांदा गयेथे. इथेंच या दरींत बघा एक (गजगामिनी!) हत्तिणींचा कळप आडवा लायनीवरून चालला होता. गाडी थोपवलीच. दहा विसा हत्ती मोजले. डायवरानें शीट मारली; तसा तो म्होरक्या खवळला अन् मागें सरून धांवत येऊन अशी इंजनाला टक्कर मारली, कीं गाडी सहा

साखळ्या मागें सरली. आपल्या नबाबानें जिंकली म्हणून सगळ्या हत्तिणींनीं सोंडा उचलून आरोळ्या मारल्या.'' मामासाहेबांनीं जाकिटाचा वरचा खिसा घट्ट आंवळून विचारलें, "मग अजून जंगली हत्ती आहेत?" रेंजर सुस्कारा टाकून म्हणाला, "असेल एखादा दुसरा, ढाण्या वाघापुढें कुठले हो राहणार? पण कॅंपांतल्या तीन हत्तीवरून तर आम्ही पावसाळ्यांत जंगलांतून हिंडतों!'' प्रत्येक वाक्याबरोबर लांब सुस्कारे सोडून दोस्त जिवानिशी परत जाण्याची तयारी करूं लागले. इतक्यांत स्टेशन आलें. आम्ही निरुपायानें पुढील प्रवासास सज्ज होऊन रिंगीवर बसलों. या गोंडयुद्ध-रथावर दोन हात लांबीच्या बाकासारख्या बैठकीवर सारथ्याच्या कमरेस दोन्ही हातांनीं विळखा घालून मागें बसावयाचें व भिरभिरणाऱ्या चाकाजवळ कण्यावर पाय ठेवावयाचे. अशा थाटांत हपीसापर्यंत वीस मैलांचा प्रवास केला; पण साहेब चाळीस मैल आंत जंगलांत तळ मारून आहेत असें कळलें. पुढील हत्तीवरील जलद प्रवासानें मणके खिळखिळे केले. वाटेनें उंच वृक्षांवर लोंबकाळणाऱ्या वेणींचे हस्तप्राप्य गुच्छ आम्ही कवळावे तर कधीं गुलाबवेलीच्या काट्यांनींच आमचे कपोल आरक्त करावेत. कधीं शिककाईच्या काट्यांनीं गोखल्यांच्या फेट्याची दशान्दशा करावी, तर कधीं विस्तीर्ण पानांनीं डोक्यावर अबदागिरी धरावी. कधीं शेपटांनीं लोंबकाळणाऱ्या हनुमानदूतांनीं आमच्या तोंडाच्या पातळींत येऊन दांत विचकावेत आणि दोस्तांना झुलत्या आरशांत स्वरूप प्रतिबिंबित झाल्याचा भास व्हावा. कधीं गोड कूजित करणाऱ्या त्रस्त पक्षांच्या पंखांचा फडफडाट ऐकून, धुणीं झाडतांना व्यंकटेशस्तोत्र म्हणणाऱ्या पत्नीचा भास व्हावा. अखेर आम्ही छावणींत दाखल झालों. दोन दिवसांनीं चरबी हाडावर 'यथास्थित' बसली. साहेबांच्या पत्नीनें पाळलेल्या, दिवसभर मोकाट हिंडणाऱ्या, वाघाच्या बच्चाची भीति बसली होती; म्हणून कीं काय, बरोबर एक गोंड पोऱ्या घेऊन आम्ही पक्ष्यांची शिकार करण्याच्या निमित्तानें दररोज जंगलांत हिंडूं लागलों. पोऱ्याच्या गळ्यांत वनस्पतींच्या नमुन्यांची पिशवी, खाण्याची पोतडी व हातांत रस्ता साफ करण्याची कुऱ्हाड असे. मजजवळ जंगलरस्त्यांचा नकाशा, दुर्बीण, क्यामेरा व हातांत फाऊल गन

असून, मी मधून मधून उंच झाडांचीं पानें, फुलें, फळें पाडतांना, एकादा आळशी झोपाळू पक्षी चुकून मेल्यास गोंड पोरास देई. मामासाहेब एका हातांत प्रत्येक पानावर चौदा ओळी आंखलेली सुट्या पानांची गड्डी घेत व दुसऱ्या हातानें लहान वेताची छडी फिरवीत असत. तिनें करून दिलेली कानावरची पेन्सिल सहसा खालीं न उतरतां त्यांच्याशीं कान-गोष्टी करीतच राही. भीतीनें पोटांत उठलेल्या गोळ्यांत गुरफटलेली कविता, समोर दिसणाऱ्या भव्य देखाव्यानें दिपून चारी चरण आंखडून बसली. कल्पनेचा व बुद्धीचा लगाम आंखुड पडला; तेव्हां घरीं गेल्यावर शौर्यकथा पत्नीस सांगतांना जेवढें आठवेल तेवढें लघुलिपींत लिहा-वयाचें ठरवून कविराज काव्याच्या अंतराळांत न राहतां जमिनीवरच चालू लागले. अशा रीतीनें आमचे बारा दिवस संपले ! कृष्ण प्रतिपदेला कूच करून शनवारवाड्याच्या फुटक्या बुरुजाजवळ डेरे दाखल व्हावयाचें ठरवून दोस्तांनीं साहेबांस तसें कळविलें. कोजागिरी दिवशीं सकाळीं फराळावर हात मारून आम्हीं जामानिमा चढविल्यावर साहेबांनीं नकाशा-वर फुली करून सांगितलें, "या ठिकाणीं जा. तुम्हांला गम्मत पाहण्यास सांपडेल नानासाहेब. आपण अझटेक इंका इत्यादि पुरातन पाताळ-संस्कृतीबद्दल बोलत असतां. आमची राक्षससंस्कृति तर पहा; आणि मामासाहेब जरा लवकर या ! तुम्हांला जागरण होईल म्हणून मीं कळविलें नाहीं. काल रात्रीं दहा वाजतां बहिर्दिशेस गेलों होतों. बाहेर हिरवे-निळे डोळे चमकत असल्यामुळें मी चार तट्टयांच्या आडोशांत अडकलों. पण तुमच्या काकूनें वायबार केल्यामुळेंच लवकर सुटका झाली. छे ! छे ! आतांच नको ! संध्याकाळीं लवकर परत फिरा म्हणजे झालें !"

वाटेनें झाडी गर्द. दोन दोन पुरुष वाढलेल्या गवतांत पाऊलवाट मोठ्या मुष्कीलीनें सांपडे. पुढचा मनुष्य दिसत नसे. करवंदीच्या जाळ्या, कांटेरी झुडपें, शिताफीनें कांपत तो बालगोंड चालला होता. इष्ट स्थळीं पोहोंचण्यास भर मध्यान झाली. उंच उंच वृक्षांच्या सांवल्या पायथ्या-जवळच पडल्या होत्या. एका मोठ्या मोकळ्या पटांगणांत चाळीस चाळीस फूट लांबीचे विशालदेही प्रस्तरराक्षस पडले होते. प्राचीन गोंडकलेचा

हा अवशेष असावा अशी माझी एकदम समजूत झाली. कविराज म्हणाले, "अर्जुनाप्रमाणें राम सव्यसाची होता कीं काय? पादस्पर्शानें शिलेची अहिल्या केली. तसेंच रामबाणानें विद्ध केलेले राक्षस पाषाणमय केले कीं काय? गोंडवणांत प्राचीन भूस्तर व फॉसिल सांपडतात असें म्हणतात. मग हा रामराज्यांत राम म्हटलेल्या राक्षसांचा फॉसिल कीं काय? कोरीव लेणीं बौद्धांनीं डोंगरांतच खोदलीं; पण इतक्या लांबवर एवढ्या शिला कोणत्या यंत्रांनीं आणिल्या!" ते पुढें इंग्रजींत म्हणतात, "हा गोंड पोर पहा. पक्का अनार्य. याचा तोंडावळा पाहिला कीं जगांतील सर्व रानटी लोकांचा हा भाऊबंद किंवा राक्षस-वानराचा मिश्र वंशज असावा असा मला भास होतो. हेच आपले वेदकालीन दस्यू!" मी त्या पोराच्या तोंडाकडे कुतूहलानें पाहिलें. त्याचा काळा कुळकुळीत थापट चेहरा गंभीर झाला होता. मिन्याएवढा पोर पण त्याच्या डोळ्यांत गतवैभवाचें स्मृतितेज हल्लींच्या दुःस्थितीच्या खेदाभ्राखालून तळपत होतें. आम्ही विचारण्याच्या अगोदरच कुऱ्हाडीच्या दांड्यानें त्या प्रस्तर मूर्ति दाखवून तो सांगूं लागला, "साहेब, आम्ही या कुऱ्हाडीच्या दांड्यासारखे! या ठिकाणीं आम्ही राजे होतों, आतां तुमचे नोकर झालों. हें आमचं गोंडांचं राज! पाताळांतून रावण लंकेंत आले. वानरानं लंका जाळली. घरभेद्या बिभीखणामुळें रावणमहाराजांचा नायनाट झाला. रामाला राज्यावर बसविला. बिभीखण पापाचें राज्य लंकेंत भोगायला गेला. आमचं आतां लंकेंत काय! निलगिरीचे भाऊबंद तथं, आम्ही गोंडांनीं गोंडवण सोडून कोठें नाहीं जावं. राव, मागल्या कथा कायला सांगू? अवो! तो भाकऱ्या सांगे कीं, रामायण सगळं खोटं. रामाला लंकेंत मारून त्याचें रूप घेऊन रावणानें अयोध्येंत राज्य केलें. परटाला त्याचं रूप कळलं म्हणून रामानं सीतेला टाकलं आणि सीतेला जव्हां समजलं तसं तिनं दरींत जीव दिला नव्ह का! साहेब, तुम्हीच सांगा, लोकांसाठीं बिचाऱ्या सीतामाईला वनवास दिला, जाळली, टाकली आणि घुरली असा कसा राक्षसी राम! आणि मंदोदरीराणीला फुलासारखा जपणारा रावण पहा माझा! रावणानं उचलली तशी सीतामाई काळीज फुटून नाहीं मेली. पण सुलोचना-जाऊंद्या गा! तुमचाच वारुळां-

तला वाल्या कोळी खरं बोलतो. सगळं गेलं आणि हे दगडाच रावण, राम, मारोती, इंद्रजित, घटोत्कच, उरलं. जव्हां कां तो सोम्या, भादव्या तंब्या, सोविंदा आवेशानं नाचत गातात तव्हां असा चेव येतोय मला आणि भाकऱ्याला—" इतक्यांत त्याची दृष्टि रावणाच्या पुतळ्याजवळ गेली. त्या ठिकाणीं एक वृद्ध गोंड पाहरीनें पुतळ्याखालीं भुयार खणीत होता. आम्हांला पाहतांच त्यानें कुऱ्हाड खालीं ठेविली आणि मालका-प्रमाणें आमचें स्वागत केलें. याचेंच नांव भाकऱ्या. हा तीस वर्षें पेन्शन खाणारा जुना जंगलांतला राखणदार. खानदानीचा मनुष्य. आतां किंचित् श्रमिष्ट झाल्यामुळें सर्व दिवस हें पटांगण स्वच्छ करण्यांत घालवी. त्यानें ते पुतळे आम्हांला दाखविले. पंधरा फूट रुंद, तीस फूट उंच आणि चाळीस फूट लांब असे हे पुतळे कधीं, कुठें, कोणी, कसे केले, आणिले; त्यांनीं जगांतील कोणत्या घडामोडी पाहिल्या, या विचारांनीं माझें भान हरपलें. पोर मला विचारून भाकऱ्याबरोबर केव्हां निघून गेला तें कळलें नाहीं. 'आल्या रस्त्यानें आम्ही परत येऊं' असें सांगून कविराजांनीं त्याची रवानगी केली आणि ते एका पुतळ्याच्या तळहातावर बसून, नखावर कागद ठेवून एकामागून एक कागद खरडून फेंकून देऊं लागले. 'तुझ्या नखाची सर ग्रीसच्या अपोलोला नाहीं. डोक्यावर वाढलेल्या गवतामुळें तूं खरोखर जटाधारी झालास. हृदयावर भेगींत शिरलेली पिंपळाची मुळी रामबाणच वाटते. पण हे प्रस्तरमूर्ति ! माझी सुखस्तंभ भामिनी मला अधिक रुचते.' वगैरे काव्य-कल्पना एकामागून एक खरडून नापसंत करून ते फेंकूं लागले. अखेरीस बऱ्याच वेळानें कविराजांनीं येऊन मला हलवून तंद्रींतून जागें केलें. ऊन तिरपें झालें होतें. पोटांत कावळे कोरूं लागले; पण तो नादिष्ट पोर खाण्याचें बारदान ठेऊन जाण्यास विसरला होता. अखेर आम्ही घरची वाट सुधारली. माझें लक्ष मागें दशाननावर खिळलें होतें. मामासाहेब अघाडीवर होते. अर्थात् वाट रुसून आमचा डोळा चुकवून गेली. भलत्याच पाऊलवाटेस लागल्या-मुळें खाणाखुणा पटेनात. संध्याकाळ झाली, दोस्तांच्या घड्याळास लटका-विलेलें होकायंत्र मागतांच त्यांनीं बसकण मारून हुंदके देण्यास सुरवात केली.

ते म्हणाले, "राजसा, हें काव्यदर्शक होकायंत्र—माझ्या पत्नीच्या—तुझ्या वगी वहिनीच्या फोटोचें लॉकीट आहे." तशा काळजीच्या प्रसंगीं माझ्या डोळ्यांत अश्रु (हास्याचे) उभे राहिले. स्वतःचे डोळे रेशमी रुमालानें टिपून तें माझ्या मागून चालूं लागले. गवताचे शेंडे पश्चिमेच्या वाऱ्यानें पूर्वेकडे झुकले होते, त्यावरून दिशा ठरवून कष्टानें झुडुपांतून माग काढीत आम्ही चाललों. सिगारेटच्या झुरक्याच्या प्रकाशांत नकाशा पहात, बंदुकीच्या चापावर बोट ठेवून मागें पुढें पहात जातां जातां नऊ वाजले. भीतीनें हजार वेळां मरून आम्ही जिवंत होत होतों. मध्येंच इकडून तिकडे कांहीं तरी धाड् धाड् धांवत जाई. वर झाडींत पंखांचे गूढ आवाज होत. पायाखालीं सळ् सळ् वाजून पुन्हा स्तब्ध होई. इतक्यांत उजव्या बाजूस बंदुकीचा बार झाला. मी त्यास उत्तर देऊन तेथेंच थांबलों. सुमारें अर्ध्या तासानें कंदील, रानकाढे या सरंजामासह आमच्या शोधार्थ हिंडत असलेले साहेब येऊन पोहोंचले. ठाण्यावर पोहोंचण्यास अकरा झाले. गोंड पोराचें गोरेंमोरें झालेलें तोंड पुन्हा आनंदानें फुललें. तो मामासाहेबांची कावरी बावरी मुद्रा ओळखून म्हणतो, "रावसाब तो वाघाचा बच्चा आज सर्कल साहेबाला दिला. सहा दिसांपूर्वीं बघा घरांत बाईसाब अन् पाळण्यांत धाकटे साब एकटे. अन् दाराला साकळीनं बांधलेला बच्चा सुटला अन् त्यानं गमतीनं धाकट साबाला चाटायला केली सुरवात. ओरखाडा निघून रगताची गोडी लागती तर कसली गंमत राव! पण बाईसाबानं त्याच्या मानेभवतीं घातला दुपट्याचा पिळा आणि धरला घट्ट धरून चुचकारत! तो घेतोय सारखी ओढ. सकाळीं पहाटे आम्ही आलों तेंव्हां बाईसाबांनीं साफ सांगितलं कीं मला नको वाघाचा बच्चा. अन् तो माझ्यावरबी गुरकावी. कां तर म्हणे मी त्याची थोडी सागुती घेतली."

मामासाहेबांना रात्रीं दोन घास जास्तच गेले. असे कोजागिरी रात्रीं बाराच्या सुमारास आम्ही शेकोटीजवळ आरामखुर्च्या टाकून बसलों होतों. पगारासाठीं त्या 'बीट' मधले सर्व रेंजर राखणदार जमले होते. ती मंडळी जवळच दुसऱ्या शेकोटीशीं गप्पागोष्टी करीत होती. साहेब पगाराचे शीट तपासत होते. पोऱ्या शेकोटीस आहुति देत होता. मामा-

साहेब घड्याळाच्या प्रिय लॉकिटाशीं खेळत रवींद्राचें एक काव्य चाळीत होते. शेकोटीच्या जाळाकडे पाहतां पाहतां माझें लक्ष अंतराळांत तरंगत होतें. इतक्यांत दोस्तांनीं एकदम उडी मारली आणि हर्षयुक्त उद्गार काढले, "वाऽवा! शुद्ध प्रेमाश्रु थिजून ताजमहाल बनला अँ! अहाहा! काय काव्य! काय कल्पना! दंवबिंदूंचा स्फटिक व्हावा तसा! जगदीश्वरा! काय तें प्रेम, तें मंदिर आणि हें काव्यचित्र! रम्य–रम्य!"

मी एवढा अरसिक पण माझेंही मन गुंग झालें. मामांच्या उडीसरशी जमलेल्या गोंडांनासुद्धां ही साधी पण नितांत मनोहर कल्पना आवडली. तें मिऱ्याएवढें पोर आपलं चिकणी सुपारीसारखं थापट नाक मुरडून म्हणतें, "मला सकाळीं भाकऱ्याजीनं गाणं शिकविलं. तेंच नामी! आम्हा दोघांना नाहीं तुमचं गाणें आवडत. नाहीं गा भाकऱ्याजी!"

भाकऱ्यानें पोराकडे आनंदानें–अभिमानानें–पाहून पाठ थोपटली आणि आम्हांकडे वळून तो म्हणाला, "पोरा खरं बोलतो. बादशहापेक्षां मंगऱ्याची प्रीत जास्त ही पिरिथवीला माहीत गोष्ट." तो स्तब्ध होऊन पुन्हा शेकोटीकडे खिन्न मुद्रेनें पाहूं लागला.

साहेब म्हणाले, "हा मंगळ्या म्हणजे भाकऱ्याचा पूर्वज. गोंडांना 'ळ' म्हणतां येत नाहीं. भाकऱ्याच्या सदा सर्वदा मागच्या गोष्टी. कैदेंतल्या सिंहासारखा नेहमीं झुरतो. भाकऱ्याजी, तुमची मंगऱ्याची कहाणी यांना सांगा. पाहुण्यांना गोंडवणाची पुष्कळ माहिती आहे. त्यांनीं सत्तावन सालच्या गोंड बंडाचा इतिहास वाचला आहे."

भाकऱ्याचे झिरमिळे हात फुरफुरूं लागले. कपाळावरच्या शिरा जास्त उठल्या. तो म्हणाला, "बंड, आमचाच राजा आणि त्यानें बंड! काय करायचं. उलटा जमाना! पोरा–सकाळचं गाणं म्हण. गा!"

डफासारखें बोटांनीं मांडीवर वाजवीत पोर म्हणूं लागलें,

| | |
|---|---|
| राणी मरून गेल्ही | राजा रडत राहे |
| पाणी थडग्यानं धरला | थिजून महाल बनूला |
| अवो माय् नवल कायला ! | पन् मरून कुठं गेल्हा ? |

राही मरून गेली
मंगऱ्या रडत नाहीं
मंगऱ्या डोऱ्याचं पाणी
आटून ढगांत गेलं
उन उन फुंकार टाकी
रान जरून गेलं !
छाती आगीनें जरली
पडला डोऱ्यांतून
भरदार प्रीतीचं फूल
लाल रगताचा ठेंब
तेचा महाल झाला
पण तो देवांनीं नेला
खऱ्या गोंडाचा बच्चा
मंगऱ्या प्रेमाचा भारी !

गाणें संपल्यावर एक सुस्कारा टाकून भाकऱ्या सांगूं लागला, " साधं वेडंवांकडं गोंडाचं गाणं म्हणून हंसूं नका ! पण मंगऱ्यासारखा माणूस नाहीं झाला ! मंगऱ्या तो मंगऱ्या ! त्याच्या लहान्या भावाची-सुभान्याची नातवापंतवंडाचीं आमी मुलें. मंगऱ्यासारखा बळकट जवान साऱ्या गोंडवणांत झाडींतही नाहीं ! पण मनाचा कसा फूल ! सुभान्याच्या जिवाला तिरकमठ्यापरीस जपायचा ! अवो, इतक्या सुंदर ठेंगण्या बायका पण एक पसंत होईना त्याच्या ! खांद्या खांद्यापर्यंत, गुढग्यावर पितळेचे दागिने भरून, नाकांत हाताहाताच्या नथा घालून, दांतवण लावून, आंगभर गोंदून तालेवारांच्या मुली त्याच्यापुढें नाचत, पण एक मनाला येईना. तो म्हणे 'माझी बाईल माझ्या सवाई होवी'. सुभान्याला चार बायका मिळाल्या. धाकटी लग्नांत दोन छोकऱ्यांची आई होती. अशी रूपवान्- अशी चकचक करे कीं पाण्यानं भरलेला ढगच जणूं. पण तिला राजाच्या भिल्लांनीं पळवून नेली. सुभान्याच्या डोक्याचीं कुऱ्हाडीनं भकलं तुटून पडलीं. मंगऱ्या शिकारीहून आला आणि जेव्हां का पायलं तसा लाल डोळे करून गर्जला, 'सुभान्या, तुझ्या ओंठाला राजाच्या नरडीचा घोट देईन तरच मी भाऊ'. तसंच मुंडकं घेऊन लगबग निघाला. त्या पटांगणांत रावणाची पूजा चालली होती. आतां रावण पडले, पण ते उभे होते. भोंवतीं फेर धरून गोंडणी नाचत गात होत्या. सुभान्याच्या बायकोच्या खांद्यावर हात टाकून राजा उभा होता. इतक्यांत मंगऱ्या जोरानं पाय टाकीत आला. जमिनीच्या हादऱ्यानं रावण सुद्धां कापूं लागला. राजा

लढाईला उभा राहीना. तो म्हणे 'मी राजा, आणि तूं साधा गोंड–तुझ्याशीं कोण लढे'. मंगऱ्याला चेव येऊन त्यानें लाथ मारली आणि एवढा शंभर अन् पन्नास हातांचा रावण उलथून पाडला."

भाकऱ्या आवेशांत होता. बोलण्याच्या भरांत त्यानें उभे राहून शेकोटी-वर लाथ उगारली. पोऱ्या प्रसंगावधानी, त्यानें लाथ पकडली. दोघे बाजूला पडले. नाहींतर शेकांत बिचाऱ्याचा पाय होरपळलाच असता. भाकऱ्या विरमून पुढें सांगूं लागला'.

" मंगऱ्या गर्जून म्हणाला, 'पाहिली माझी शक्ति–उंदरा–म्हणे मा राजा आहे. सशा खोकडाच्या राजा ! तुझ्या बापजाद्याच्या मुडद्यानें रावण केला तो मी उलथून पाडला तो तूं माझ्या हातून सुटतोस व्हय ! माझा भाऊ मेला त्याची बायको माझी झाली. (होय साहेब. तुम्हांला नवल वाटतं पण; असेंच हाय्. जंगलांत बायकांचा कोण संभाळ करणार दुसरं ?) ती बायको, तुझ्या बायकापोरी आणि सगळं राज्य दे; कां घेऊं जीव ?' असं म्हणून गळा पकडून डोक्यावर मांजराच्या पिलावाणी उंच धरला. राजा काय करतो, पण त्यानें कावा केला अन् भोळा मर्द फसला. राजा म्हणे, 'हो, माझ्या वाटचा राजा हो. पण रावणाची नवी मूर्त करून प्रसन्न केल्या-बिगर कसा होणार. नवी मूर्त आण अन् खुशाल रावणाची प्रीत संभाळून राजा हो. तुम्ही बळवान्; आम्ही कोण ?' मंगऱ्या अभिमानानं मानगुट सोडून म्हणाला, 'कसा वठणीवर आणला ठीक ! आजपासून एका सबंध चंद्रांत (महिन्यांत) नवा रावण आणतों नाहीं तर नर्मदेंत प्राण टाकतों' असं म्हणून मंगऱ्या दिसेनासा झाला. राजाची युगत . साधली. सुभान्याची बायको खुशीत आली. गोंडीणी राजाभोंवतीं नाचूं लागल्या."

मामासाहेब जांभई देत, आळोखेपिळोखे देऊन म्हणाले, " संपली कां नाहीं अजून गोष्ट? काय रानटी लांबण चालविली आहे हो !"

पोरानें मध्येंच चुणूक सोडली, "शूराच्या गोष्टी ह्या रावसाब ! आमची चवच वेगळी."

भाकऱ्या पुढें सांगूं लागला, " महिनाभर राजाला अन्न गोड नाहीं.

लुसलुशीत हरिणाचें मांसही आवडेना. सर्व मंडळीला घेऊन राजा रावणापाशीं तसाच बसून राहिला. सगळा चंद्र उगवला. मंगऱ्या हळु-हळू पावलं टाकीत आला. त्याची बढाई फुकट अशी सगळ्यांची खात्री झाली. राजा आनंदानें ओरडणार तों समोर पाहून त्याची दांतखिळीच बसली. जंगलांतलीं झाडं उपटून रस्ता करीत समोरून दहा हत्ती येत होते ( मामासाहेबांनीं चमकून खुर्ची जवळ सरकावली ). त्यांच्या माणून चाळीस हात लांबीचा हा रावण सोंडेंत धरून पन्नास हत्ती हळुहळू येत होते. राजानें भीतीनें बैठक मारली. त्याची मंगऱ्यानें मान पकडली; पण जवळ जाण्याची एकाची छाती नाहीं. मंगऱ्या म्हणाला, "पहा माझी करामत. विंध्य पर्वतांत जाऊन हा रावण फोडून काढला. जंगली हत्तींच्या सोंडा पिरगाळून जेर करून त्यांच्या सोंडेंत रावण दिला. राजा! माझ्या फुलाला–सुभान्याला–इंद्रजिताला मारलास. हत्तीच्या पायाखालीं तुझी कणीक करूं कां या कुंभकर्णाच्या पुतळ्यावर बुक्कीनें ठेचूं, बोल?" अरेरे! भोळा मर्द. राजानें पुन्हा युगत केली आणि मंगऱ्या फसला. सगळे शूर असेच भोळे का झाले! हत्ती, सिंहही भोळे. ह्या दुबळ्या, कावेबाज अकलेच्या माणसांच्या तोंडावर थू!"

भाकऱ्या बराच वेळ स्तब्ध बसला. मी मनांत म्हणालों, "हा अडाणी भाकऱ्या काय लाखाची गोष्ट बोलला! सृष्टीचें सख्य मोडणाऱ्या मनुष्यास नांवें ठेऊन What man has made of man. असें म्हणणाऱ्या वर्ड-स्वर्थची मला आठवण झाली.

भाकऱ्या म्हणाला, 'या युक्तीनें गोंडवण मंगऱ्याला अंतरले'. राजा म्हणाला, 'रावण करणार राजं झालं आणि मी मरणार यांत शंका नाहीं. असं अवघड काम तूं केलंस. पण हें ओबडधोबड काम पाहून लोक तुला नांवें ठेवतील. परवां देवीला बळी देण्यास आणलेला मुसलमान खोंडाच्या हातून आम्हीं सोडविला, तो म्हणे, दिल्लीचा बादशहा मेलेल्या बायकोच्या थडग्यावर सुंदर इमारत उठवतो आहे. मंगऱ्या त्याला तुझा हात लाव. उचल त्याचा महाल आणि हत्ती लावून आण उचलून!' मंगऱ्या खुशींत आला. तो म्हणाला, 'बघ, मी पण त्याच्या सवाई नाजूक महाल स्वतः

बनवितों. पण परत आल्यावर राज माझें'. राजा मनांत म्हणे, 'पाहूं पुढें!' हत्तींनीं पहिला रावण उचलला त्याखालीं जळक्या लंकेचें सोनें पुरलेलें सांपडलें. पण त्यावर हल्लींचा रावण ठेऊन, लोकांना दहशत घालून मंगऱ्या गेला तो गेला!—"

मामासाहेबांच्या तोंडाला पाणी सुटलें. ते साहेबांना इंग्रजींत म्हणतात, 'तुम्ही क्रेन आणून उचलून कां नाहीं पहात? दंतकथेंत 'folk lore' मध्यें तथ्यांश असतो असें अमेरिकेंतल्या Von Voolischचें म्हणणें आहे."

साहेब म्हणाले, "छे! हांवरे आहांत झालें! दंतकथाच पुढें म्हणते कीं, "तें द्रव्य मंगऱ्याच्या वंशालाच मिळायचें, म्हणून तर भाकऱ्या रोज खणत असतो. इतरांनीं हात लावला तर कोळसे होतील. आतां कदाचित् कोळशाची खाण सांपडणें या भागांत अशक्य कोटींतलें नाहीं."

भाकऱ्या पुढें सांगूं लागला,

"तुम्हांला झोंपा आल्या असतील; पण गंमत ती पुढेंच आहे. मंगऱ्याचे हत्ती दिल्लीच्या वाटेस लागले. विंध्यपर्वताचं जंगल संपत आलं होतं. इतक्यांत हत्तींनीं रावण टाकून पळायला सुरवात केली. मंगऱ्याच्या ओरडण्याला ऐकेनात. मंगऱ्या चार बाण पुढं गेला अन् काय पाह्यलं. एका कडेपठारावर दोन सिंह लढत होते. आणि मधून एक सिंहीण फिरत होती. दोघेजण शेपटीचं गोंड आपटत, पाण्याच्या ढगासारखं गडगडत आणि दांत खेंकसून एकमेकांच्या अंगांवर धांवून जात. त्यांची पिंजारलेली आयाळ, रक्तानं माखलेलं आंग आणि लळलळणाऱ्या जिभा पाहून मंगऱ्याला मौज वाटली. बायकोसाठीं भांडणाऱ्या गोंड भावाप्रमाणें भांडताना मंगऱ्याला वाटलं कीं, हे वालीसुग्रीवच जणुं. सिंहीला समजेना कीं कुणाकडे पाहून हंसावं. अखेर लहान चपळ सिंहानं डोक्यावर पंजा मारून मोठ्या सिंहाच्या डोक्यांतला मगज फोडला आणि त्याच्या मुड्यावर पाय ठेऊन तीनदां गर्जला. तशी एक रुपवान् मुलगी आंब्याच्या झाडावर चढलेल्या वेलीवरन् सरसर उतरली आणि पाहरेसारख्या काळ्या तुळतुळीत हातांनीं लहान्या सिंहाच्या गळ्याला विळखा घालून म्हणाली, 'शाबास सरावण्या! तुला ही बायको करून देते'. पण

ती सिंहीण या चमत्कारिक पराक्रमी बाईची भीति वाटून पळून जाऊं लागली; तसा मंगऱ्या हंसत पुढें गेला. त्यानं सिंहीचा कान धरून दोन तोंडांत मारल्या आणि पकडून आणली. तिला झीट येऊन ती मुकाट्यानें सिंहाजवळ उभी राहिली. मंगऱ्या हंसत म्हणाला, 'मला सिंहाला ही सिंही भिणार कां?' राही म्हणाली, 'मला तुम्हावांचून दुसरे सिंहच माहीत नाहींत'. झालं! प्रेमासाठीं लहानपणापासून पाळलेल्या सिंहाला राही विसरली. त्यानं मनांत राग ठेवला. मंगऱ्यानं राहीला खूष करण्यासाठीं सिंहीच्या तोंडांत मारली; पण तीही आपला अपमान विसरली नाहीं. रावसाब! हे सिंह आणि आम्ही एका रक्ताचे. आम्ही मरूं पण सूड घेऊं. गुलाम नाहीं होणार कुणाचे. इमानाचे नोकर होऊं पण! गुलाम-रावणाचं नांव!—"

मला आमच्या बेगडी सुधारणेची लाज वाटूं लागली. खरोखर या अडाणी लोकांत किती स्वत्व आहे! आम्ही गुलाम कशाचे नाहीं! आम्ही पोटाचे गुलाम, दृष्टि सुवर्णरूपाची गुलाम. मन दुर्गुणांचें आणि चोचल्यांचें गुलाम. या गुलामगिरीच्या पायांतली अवजड कडी म्हणजे आमच्या मनोवृत्ति निष्ठुर-तार्किक-विचारी मेंदूच्या गुलाम! भीतीशिवाय, निंदाजनक कुतुहलाशिवाय, कामाशिवाय दुसऱ्या क्षुभित मनोवृत्तिच आम्हांला माहीत नाहींत. आमचा स्वदेशाभिमान, सर्व कांहीं स्वार्थावर नजर ठेऊन! या यांत्रिक पाशवी युगांत, मंगऱ्यासारखे सरळ हृदयी वीर किती सांपडतील? सांपडले तरी कावेबाज यंत्रपटु निर्बल मनुष्यापुढें याचा मागमूसही राहणार नाहीं. भाकऱ्या पुढें सांगूं लागल्यामुळें माझी विचारांची सांखळी तुटली.

तो म्हणाला, "आतां पुढचा दुर्दैवी इतिहास सांगूं तरी काय! माझे आज हातपायच गळून गेले आहेत. उद्यांचा सूर्य मी पहातों कसचा असं वाटतं. या मागच्या गोष्टीनं मला मागचं आठवतं आणि जान नकोसा वाटतो. रावणाची इच्छा! हत्तींच्या तोंडांत रावण देऊन मंगऱ्या व राही दिल्लीला पोहोंचली. बादशहाला आनंद तर झालाच; पण असा उमदा शूर जवान पाहून भीति पण वाटली. पण मंगऱ्या पोहोंचेंपर्यंत ताजमहाल

पुरा होत आला. मंगऱ्यानं नजराणा म्हणून बादशहाला रावण दिला. त्याचे तुकडे करून एकाची सिंहासनाची गादी करून गच्चीवर ठेविली. दुसऱ्याचे दगड हमामखान्यास लावले. मंगऱ्या म्हणाला, 'मी स्वस्थ बसून काय करूं. माझं हत्ती जयपुराहून लाल दगड आणतील आणि मी एक मोठी इमारत बांधतों.' बादशहानं परवानगी दिली. ताजमहालासमोर नदीच्या पल्याड एक लाल दगडाचा चबुत्रा बांधला आणि त्यावर एक लहान इमारत बांधली. साहेब, काय इमारत. काय जाळी! दहा बाण दूर जाऊन इमारत पाहिली कीं असं वाटे, म्हणे कीं कोळ्याचं जाळं असाच कपडा पांघरून एक लुसलुशीत गुलाबी रंगाचा बाईचा पुतळा बसला आहे. वरून दिसायला पुतळा पण आंत इमारत होती हं! साहेब, काय सांगावं! त्या भोळ्या मर्दाला सगळेच फसवे भेटले. नाहीं तर ताजमहालाची काय फुशारकी होती आज! बादशहानं काय केलं! पैसे दिले, दगड आणवल, बिगार धरली, तो मोठा; पण कारागिरांचं नांव माहीत आहे कुणाला? पण मंगऱ्याची प्रीत, कारागिरी स्वतःची! पण दुनियाच खोटी!"

मामासाहेब उतावीळपणें म्हणाले, "एकदां सर्व हकीकत सरळ सांगून टाकाना!"

भाकऱ्या शरमून म्हणाला, "बादशहाच्या पदरीं एक गोरा कारागीर होता. ताजमहालाच्या घुमटांत फट ठेवून थडग्यावर पावसाचं पाणी गळतें ना, ती याच माणसाची सूडाची युगत. बादशहा रोज संध्याकाळीं गच्चीवरून ताजमहाल पाही. त्याला हा लाल पुतळामहाल बघवेना. कारागीर म्हणाला, 'मी मंगऱ्याला मदत करायला जातों अन् कळ करून इमारत कच्ची ठेवतों. रावसाहेब काय सांगूं! आपल्याच लोकांनीं घात–माझ्यानं बोलवत नाहीं साहेब, तुम्हीच सांगा."

"इटालियन कारागिरानें पुतळ्याच्या उजव्या हातांत एक तिरकमटा व डाव्या हातांत जमिनीवर टेकलेला बाण तयार केला. या बाणाचा पिसाचा एकेक केस पाहरीसारखा होता. आश्विनी पौर्णिमेच्या रात्रीं राही बाणाला टेंकून बसली होती. पायांतून चक्राकार वर नेलेल्या जिन्यानें डोळ्याच्या स्थानीं ठेवलेल्या खिडकींत उभा राहून मंगऱ्या सृष्टिसौंदर्य पहात

होता. राहीनें लहानपणापासून पाळलेला सरावण्या काम करी. हत्तींचा करडा मुकादम पायांशीं खिन्न मुद्रेनें बसला होता. राही लहानपणचें प्रेम विसरून मंगऱ्यावर भाळली ही गोष्ट त्याच्या मनांत इतके दिवस डांचत होती. यमुनेच्या पात्रांत पडलेल्या पुतळामहालाच्या प्रतिबिंबांत त्याला मंगऱ्याचा चेहरा दिसला. द्वेषाग्नी भडकून सिंहानें राहीच्या वृक्षस्थलावर पंजा मारला व मेघगर्जना केली. मंगऱ्यानें इतक्या उंचावरून उडी टाकून दोन्ही मांड्यांमध्यें सिंहाचें मानगूट दाबून धरून राहीला सोडविली; पण सिंहाच्या गर्जनेबरोबर सिंहीण धांवत आली. मंगऱ्यानें पूर्वी श्रीमुखांत देऊन केलेला अपमान ती विसरली नव्हती. तिनें राहीच्या प्रेतावर उभे राहून मंगऱ्याचा मगज फोडण्याचा प्रयत्न चालविला. भीतीनें गारठून सर्व हत्ती सभोंतीं चीत्कार करीत आहेत. बाणाचा पहारेसारखा दगडी केस उपटून मंगऱ्यानें सिंहाच्या मस्तकावर मारला. अरेरे, त्या विश्वासघातकी कारागिरानें बनविलेल्या त्या पोकळ केसानें सिंहास उलट चेव चढला, एवढेंच नव्हे, तर तो केस जागचा ढळतांच सर्व पुतळ्याचा तोल जाऊन तें अवाढव्य धूड मंगऱ्याच्या अंगावर झुकूं लागलें. भीमकाय मंगऱ्या, पण दैवापुढें काय करणार! मांड्यांमध्यें रागानें फणफणाऱ्या सिंहाची गर्दन पकडून एका हातानें सिंहीची गळचेपी करून उजव्या हातानें कलणाऱ्या पुतळ्याचा तोल त्याला किती वेळ सावरतां येणार! हळुहळू हात खालीं येऊं लागला. मृतवत् पडलेल्या राहीला पाहून, जगून तरी काय उपयोग असेंच त्याला वाटलें. आपली कृति, प्रेम या विश्वासघातकी जगांत ठेवून तरी काय करायचें! असा विचार करून त्यानें प्रचंड प्रयासानें पुतळ्याचा तोल यमुनेच्या पात्राकडे झुकविला. क्षणार्धांत सिंहाचं जोडपं—राही-मंगऱ्याचं जोडपें—पुतळ्यासह यमुनेंत गडप झालें. यमुना कालस्वरूपी यमाची भगिनी. नश्वर देह पंचमहाभूतांत मिसळले. प्रेम अरसिक जगाला विटून गेलें आणि कृतीची वालुका—शिलेच्या पुतळ्याची पुन्हा वालुका झाली.

आम्ही चित्रासारखे स्तब्ध होऊन ही असंस्कृत पण उदात्त, अद्भूत पण सत्यसृष्टीस लाजविणारी शूराची कहाणी ऐकत होतों. इतक्यांत भाऊऱ्या ताड्दिशी उभा राहून विझत जाणाऱ्या शेकोटींतील पिचणाऱ्या कोळशाकडे

बोट दाखवून ओरडला, " पहा, मंगऱ्याचा डोळा अजून राहीच्या दुःखानं जळतो आहे. दर धुनवेला उगवत्या मावळत्या चंद्रसूर्यांचा डोळा मंगऱ्याच्या दुःखानें जळतो आहे. आणि साहेब, मी पण रोज या छातींत जळतों. तुमचं पुष्कळ सुधारलं पण आम्हांला नको. आम्हांला गोंडवण आणि तसाच मंगऱ्या राजा होवा. नाहींतर मंगऱ्यागत आम्ही पण—सिंहागत आम्ही पण—रानांतच मरूं. पोऱ्या ध्यान ठेव! मंगऱ्या पुन्हा जिवंत होणार—मंगऱ्या आलों. रावण महाराजकी जय!"

भाकऱ्याचा जीर्ण देह एकदम मागें कोसळला तो पडलाच! ही मंगऱ्याची स्वप्नासारखी विसंगत हकीकत आणि त्याचा असा शोकपर्यवसाय! मंगऱ्याच्या स्मृतीस व भाकऱ्याच्या स्वाभिमानी हृदयास निरश्रु अभिवादन करून आम्ही उगवत्या दिवसाबरोबर पूर्वीच्याच जीवनक्रमास प्रारंभ केला. पण ती पंधरा वर्षांपूर्वीची कोजागिरी मी जन्मांत विसरणार नाहीं.

---

# कालिंदी

कालिंदी ही माझ्याबरोबर शिकणारी कॉलेजांतील माझी वर्गभगिनी (!) होती. माझें तिचें नातें-गोतें, ऋणानुबंध नव्हता; एवढेंच काय, पण तिचें गांवही मला माहीत नव्हतें. तिच्या घरांत माणसें कोण आहेत, त्यांची स्थिति, मतें, आचारविचार काय आहेत, यांचा मला गंधही नव्हता. पण माझी व कालिंदीची ओळख मात्र होती.

आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ही ओळख कालिंदीनेंच काढलेली होती. कॉलेजच्या बी. ए.च्या वर्गांत आल्यापासून ती जरा धीटपणानें वावरत असे. 'जरा चढेल व दिमाखी' हींच विशेषणें आम्ही आमच्या कंपूत तिला लावीत असूं. ती कोणाशींही बोलत नसे. अभ्यासासंबंधीं कोणत्याही स्कॉलरला तिनें कधीं प्रश्न सुद्धां केला नाहीं. मग मला

उद्देशून तर ती एक शब्दही बोलणार नाहीं ही खात्री असल्यामुळें मी फत्तरासारखा अगदीं नि:शंक होतों. तोंच एक दिवस ती माझ्याशीं बोलली!

या अपूर्व प्रसंगाचें श्रेय लक्ष्मीपेक्षांही चंचल असणाऱ्या प्रोफेसरांच्या मर्जीलाच दिलें पाहिजे. यांचा तास केव्हां होईल व केव्हां बुडेल याचा कुणालाही अंदाज करतां येत नसे. अगदीं आदल्या दिवशीं कॉलेजांतून परत जातां जातां उद्यांच्या 'अवचित' तासाची खबर लागावी; बऱ्याचशा मुलांना एकमेकांकडून बातमी कळून त्यांनीं पुस्तकें वगैरे आणावींत व आपली मात्र नेहमीं फसगत व्हावी असा कालिंदीस नेहमीं अनुभव येऊं लागला. आणि म्हणूनच तिनें माझ्याशीं मुद्दाम ओळख करून बोलण्यास आरंभ केला असावा.

मी साधारण बावळटच प्राणी असे. कदाचित् म्हणूनच तिनें माझी ओळख करून घेतली असेल. दररोज उद्यांचे तास तिनें विचारावे व मी सांगावे हेंही एक टाइमटेबल ठरून गेलें. हळुहळू आमचें बोलणें वाढून कधीं कधीं अभ्यासाविषयींही ती मला विचारूं लागली. मी जरी हुषार नव्हतों तरी प्रत्येक प्रोफेसराकडे जाऊन अभ्यासाविषयीं सल्ला घेण्याची मला खोडच लागली होती व त्यामुळें प्रत्येक विषयावरील दहा बारा चांगल्या पुस्तकांचीं नांवें तरी मला नेहमीं पाठ असत. एवढ्या पिळाच्या सुतानें मी डिग्रीचा स्वर्ग खास गांठणार अशी माझ्या सोबत्यांची बालंबाल खात्री होती. अर्थात् हा गुण कालिंदीच्या आणि माझ्या मैत्रीस फारच कारणीभूत झाला.

मी जरा बावळट हें जसें मला, तसेंच–किंबहुना जास्तीच–माझ्या मित्रांना माहीत होतें. त्यामुळें कालिंदीचें नांव जेव्हां जेव्हां मी काढी, तेव्हां तेव्हां ते माझी थट्टा करूं लागले. कालिंदी, अन् माझ्याशीं मोकळेपणानें बोलते; हेंच त्यांना कबूल होईना. आतां मात्र बहुतेक बावळटांच्या अंगीं असणाऱ्या चोरट्या दिमाखगिरीनें माझ्या बाबतींत आपलें डोकें वर काढलें. एके दिवशीं मी माझ्या मित्रांना जवळच लपवून ठेवून कालिंदीच्या नेहमींच्या मार्गावर उभा राहिलों. निदान चार वेळां तरी कपडे साफसूफ करून, खांकरून घसा मोकळा करून अगदीं आतुरतेनें मी उभा

होतों. दोनच मिनिटांनीं कालिंदीचीं पावलें वाजूं लागलीं. सगळ्यांशीं –प्रोफेसरांशीं, अगदीं बड्या स्कॉलरांशींसुद्धां न बोलणारी कालिंदी माझ्याशीं बोलणार आणि माझे दडून बसलेले मित्र हें पाहून विरमणार हें दृश्य माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. उद्यांपासून सर्व कॉलेज माझा हेवा करणार असेंही मला क्षणभर वाटलें. कालिंदी आली, पण ती खालीं पहात कसल्यातरी विचारांत मग्न होऊन, Love and Luishamमध्यें तसेंच बोट ठेवून चालली होती. मीं किती तरी डोळे फाडून पाहिलें. पण आज कांहीं तरी झालेंच होतें. ती वरच पाहीना! खाकरावें, शिंकावें, पुस्तक पाडावें, पायबिय वाजवावे, असें हजारदा मनांत आलें. पण कांहींही करतां येईना, इतका मी गांगरून गेलों. सोबत्यांची भावी हेटाळणी मला काल्पनिक वेदना देऊं लागली. इतक्यांत कालिंदीनें वर पाहिलें, ती किंचित् चमकली व माझ्याकडे वळून हंसून–तिच्या गालाला कशी गोड खळी पडली होती हें माझ्या भांबावलेल्या नजरेंतून सुद्धां सुटलें नाहीं–हंसून म्हणाली,–"कोण! लुइस्–आय मीन् मराठे! कां बरं! उद्यां 'अवर' नेहमींचेच आहेत ना? मला उत्तरच देतां येईना. मी वेड्यासारखा स्तब्ध राहिलों, माझ्याकडे प्रथम चकित मुद्रेनें पाहून नंतर किंचित् अस्पष्टच पण मधुर असा आनंदोद्गार काढून ती पुढें चालूं लागली.

या प्रसंगानंतर तर मित्रांनीं माझ्यावर फ़ारच हत्यार धरलें. वास्तविक त्यांना माझें म्हणणें खोटें मानण्याचें काय कारण? तिनें कुणाशींच बोलूं नये असा यांचा काय आग्रह? खरोखर माझ्या सख्या बहिणीशीं मी घरीं बोलत नसे इतका जास्त व उत्सुकतेनें मी कालिंदीशीं व ती माझ्याशीं बोलत असे. मुद्दाम जास्त वाचून तिच्या अभ्यासांतील किती तरी शंका मी निरसन केल्या होत्या. खंडीभर पुस्तकें दिलीं व घेतलीं होतीं. फार काय, ती माझ्याशीं बोलतांना मोकळेपणानें हंसतसुद्धां असे. माझ्या बेंगरूळ टोपीची, पोषाखाची व डुलत चालण्याची थट्टा करण्यासही ती कधीं कधीं कमी करीत नसे. तिनेंच एकदां दर्शविल्यामुळें मी युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअरमध्यें शिरलों होतों व आमचे लेफ्टनंट प्रोफेसर नारिंगे यांनीं परेडचे वेळीं कमरेचा काडतुसाचा पट्टा सरकलेला पाहून 'Who

grit you knight?' असा प्रश्न करून दर्शविलेंही होतें. एवढेंच काय पण आमची मैत्री इतर मुलींनाही माहीत व पसंत होती. एकदां तर तिनें माझें पुस्तक स्वतः परत न करतां शिरक्यांच्या वत्सलेकडूनच तें परत केलें. इतकें असूनही माझ्या मित्रांनीं शंका घ्यावी याचा मला राग आला. मी बेफाम झालों आणि असलेली थोडी अक्कलही मला घाबरून सोडून गेली. कुणाशींही न बोलणारी कालिंदी माझ्याशीं मात्र बोलते, याचा माझ्या मित्रांना मत्सर वाटतो अशी माझी ठाम समजूत झाली. माझ्या अंगांत बरीच गुप्त आकर्षक शक्ति असावी अशी अंधुक शंकाही मला येऊं लागली. म्हणून 'आज मात्र माझ्या मित्रांची खात्री पटविणार' अशी मी एके दिवशीं प्रतिज्ञा केली.

वर्ग सुटतांच देवघेवीचें एक पुस्तक हातांत घट्ट पकडून मी लगबगीनें वर्गाच्या बाहेर पडलों. कालिंदी माझ्यापुढेंच दहा पावलांवर होती. नुकतेंच तिच्या हातांत चिंगू भावेनें दिलेलें पोस्टाचें पाकीट फोडून, वाचून, पत्याचे तुकडे भिरकावून, आंतील पत्राचा मुठींत चोळामोळा करीत ती कांहींतरी निश्चयानें पुटपुटत चालली होती. आज पुस्तक देण्याघेण्याचें कांहींच ठरलेलें नसल्यामुळें ती झपाझप चालली होती. मी धावत्या चालीनें काळकामवेगाचें उदाहरण प्रत्यक्ष सोडवीत चाललों होतों. माझी मित्रमंडळी माझ्या ध्यानाकडे पाहून फिदफिदत होती. त्या अपमानानें माझें मन पिसाळलें. 'म्हणे सुधारक! हे कसले बाप!' हें तिच्या तोंडांतून पडलेले कांपरे अस्पष्ट शब्द मला ऐकूं आले; पण मी माझ्याच गुर्मींत तर्र होतों. मी बेफामपणानें जरा जोरानें, कापऱ्या स्वरांत, मसाल्या आवाजांत हांक मारली, "कालिंदीबाई!" तिनें चमकून मागें पाहिलें, तों मी धापा टाकीत येत होतों. मुलें खदखदा हंसत होतीं. एक चमत्कारिक तिरस्काराची छाया तिच्या तोंडावर उगवली व मावळली. सर्वांकडे दुर्लक्ष करून ती मला हंसत हलक्या स्वरांत म्हणाली, "ओहो मराठे! शंभर वर्षें आयुष्य तुम्हांला! काय पाहिजे तुम्हांला बोला!" मी स्वतःचा पार्ट विसरून गोंधळून तिचाच पार्ट केला व विचारलें, "उद्यां तास कुणाकुणाचे आहेत?" ती चकीत होऊन जरा मोठ्यानेंच—इतकें कीं सर्वांना तेवढेंच ऐकूं आलें—

म्हणाली, " म्हणजे ! रा० ब० सरवस्यांच्याबद्दल उद्यां सुट्टी नाहीं का ? तुम्हींच ना मला सांगितलंत ? आहे ना बोर्डावर नोटीस ?" या प्रश्नांच्या सरबत्तीनें मी अगदींच गांगरून गेलों. "काल नाटक झालं–तीन वाजेपर्यंत चाललं. झोंपही मिळाली नाहीं–कपाळ दुखतंय." मी कांहींतरी बरळत सुटलों. या वेळेस तिची मुद्रा माझ्या सोबत्यांना दिसत नव्हती. आज बुधवार असून काल नाटक नव्हतें हें माहीत असूनही तिनें कांहींच आश्चर्य दाखविलें नाहीं. "खरंच ! मग तुम्ही असे बाहेर वाऱ्यांत हिंडू नका ! मन शांत ठेवा ! माझी गांठ घ्यावयाला इतक्या घाईनें कशाला बरं आलांत ! कपाळाला बाम लावून पडून रहा स्वस्थ ! नीट काळजी घ्या बरं का ?" असें मधुर स्वरानें म्हणून ती आपल्या खोलीकडे गेली. जातां जातां "कांहींतरी आज झालंय बिचाऱ्यांना ! ते सोटभैरव कसली यांची काळजी घेणार कपाळ !" असेंही ती पुटपुटलेली मी ऐकलें.

परत आल्यावर मग माझ्या मित्रांनीं केलेली फजीति वर्णन न करणेंच बरें. कालिंदी एकाद्या निरोप्याप्रमाणें माझा उपयोग करून घेऊन मला नाचवीत आहे, अशी माझी समजूत ते घालूं लागले. माझ्या मित्रांना मी व ती अगदीं मोकळ्या मनानें बोलतांना कधीं तरी खास दाखविणार असा माझा निर्धार झाला. क्षुल्लक गोष्ट पण परिणामाकडे, कशाकडेच लक्ष्य न देतां मी इरेस पेटलों. कारण मोठमोठ्या स्कॉलरांकडे ढुंकूनही न पाहणारी कालिंदी–कोण जाणे कां–पण माझ्याशीं फार बोलत असे. आणि मीसुद्धां या बोलण्यावरच दिवस मोजीत असे. अलीकडे केव्हांही कालिंदीच्या रस्त्याकडे जातांना मी मित्रमंडळी बरोबर घेऊन जाऊं लागलों. त्यांच्यांत कांहीं आचरट लोक होते, ते वाटेल ते शब्द तिला ऐकूं जातील अशा तऱ्हेनें–मला आवडत नाहीं हें ओळखूनही–बोलत. जातां जातां मी कालिंदीला कांहींना कांहीं विचारत असे. मुद्दाम प्रोफेसरांच्या घरचीं चांगलीं चांगलीं पुस्तकें आणून मी तिला देत असें. पण हें सर्व माझ्या मित्रमंडळीच्या समोर होई. तिनें मुद्रेनें कित्येकदा या गोष्टीसंबंधीं नापसंती दर्शविली. पण मला या नापसंतीचा विचार करायला वेळ कुठें होता ! माझ्या मित्रांची पहिली समजूत आतां

पार पालटली व त्यांनीं माझी खरोखरच थट्टा करण्यास प्रारंभ केला. कालिंदीची व माझी सलगी त्यांना सोसत नव्हती हें मी जाणून होतों. कारण आजपर्यंत ही गोष्ट कोणालाच साधली नव्हती व साधणें शक्यही नव्हतें. अशा मैत्रीस विद्वत्तेची, बुद्धिमत्तेची, शारीरिक बलाची फार काय पोषाकाची व श्रीमंतीचीही जरूर नसते. ही मैत्री अनादिकालापासून भिन्न स्वरूपांत व्यक्त होत आली आहे हें मी स्वतःच्या उदाहरणानें जगाला दाखवीत होतों. पण सर्कशींतील सिंहाशीं काम करणाऱ्या माणसाप्रमाणें माझी स्थिति झाली होती. लोकांना डुरकावणीसरशीं निजवणारा सिंह माझ्याशीं कोकराप्रमाणें वागतो, हा जसा त्याला अभिमान वाटतो, तसाच अभिमान मला कालिंदीच्या बाबतींत वाटूं लागला. 'अंतरः कोऽपि हेतु' आहे कीं काय इकडे दृष्टि न वळतां, हळुहळू मी तिला सर्कशींतील सिंहाप्रमाणें मानूं लागलों. स्वतःची कालिंदीविषयीं मैत्री बाजूस राहून, स्वतःचा दिमाख दाखविण्याच्या बुद्धीनें मी वागूं लागलों. सहामाही परीक्षा जवळ आली असल्यामुळें कालिंदी निमुटपणें हा अपमान सोसूनही पुस्तकें वगैरे घेत असे. ती अलीकडे मजकडे पाहून एकदां सुद्धां हंसली नव्हती. पण मला त्याची किंमत नव्हती. तिच्या हास्यानें जो आनंदाचा स्रोत माझ्या अंतःकरणांत पूर्वी शिरत असे त्यापेक्षांही जास्त उल्हास माझ्या मित्रांच्या मत्सरी चेहऱ्यांमुळें मला आतां वाटत असे. आतांशा तिच्या मैत्रिणींसमोरही तिच्याशीं मी मुद्दाम बोलूं लागलों. कोण जाणे कां तें ! पण इतर मुलीही माझ्याशीं निर्भयपणें व मोकळ्या मनानें बोलूं लागल्या होत्या. कधींकधीं तर हायस्कुलांतील भेटण्यास आलेल्या मुली मला तिकडे येतांना पाहण्यासाठीं फाटकांत खोळंबून रहात. सुशीला पिंगेशीं लग्न ठरलेला फेलो दातेसुद्धां मला रस्त्यांत हल्लीं नमस्कार करीत असे. कालिंदी इतर कोणाशीं न बोलतां माझ्याशींच बोलते, हें मी कुणाकुणाला व कसें कसें दाखवूं असें मात्र मला झालें होतें. एकदां तर मी दुर्गा राव व इंदु वाघ (हिच्या सोनसळी लुगड्यामुळें हिला आम्ही सोनसळी म्हणत असूं) यांच्या हातींच तिला वर्गांतील अवरविषयीं निरोप पाठविला. मी आतांशीं तिच्याशीं फारच

मोठ्यानें बोलत असे. सारांश, कोणाशींही न बोलणारी कालिंदी माझ्याशीं बोलते हें माझ्या मित्रांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न हरतऱ्हेनें मी करीत होतों.

पण या सर्व खटपटीचा परिणाम मात्र भलताच झाला. कालिंदी हळुहळू माझा मार्ग टाळूं लागली. कधीं भेटल्यास ती मला न पाहिल्यासारखें करी. एकदां तर तिनें माझ्याकडे चमत्कारिक तऱ्हेनें पाहिलें. तिचा चेहरा लालबुंद झाला असून डोळे पाण्यानें भरून आले आहेत, रागानें ती थरथरत आहे असेंही मला वाटलें. माझ्या मनांत फार यातना होऊं लागल्या. आपलें कृत्य त्याला आवडत नसून निराळ्या मार्गानें चालण्यासाठीं ती मला सुचविते कां खरोखरच माझा तिटकारा करते, कांहीं कळेना. माझ्या सर्कशींतील सिंहानें माझें नरडेंच धरल्यासारखें झालें. मित्र जवळ असले म्हणजे कालिंदी मला टाळते म्हणून मी एकटाच तिच्या मार्गावर जाऊन लपून उभा राही. मैत्रिणींत मिळून ती चालली असतांना तिच्याकडे मुळींच न पाहतां सभ्यपणानें व बेतानें मी जवळून जाई. प्रत्येक प्रसंगीं तिनें माझ्याशीं बोलावें अशी माझी वागणूक होऊं लागली. मला तिच्या बोलण्याचा अगदीं ध्यास लागला. कारण माझ्याकडे चूक आहे हें मला जाणवत होतें. पण एकदां कालिंदीचा धागा तुटला तो कांहीं जुळेना. गोगलगाय पुन्हा शंखांतून बाहेर येईना. मग मात्र माझ्या मनानें उलट खाल्ली. बरेच दिवस परिश्रम करून काढलेलें चित्र अखेर नीट उमटत नाहीं असें पाहून चित्रकार रंगाचे कुंचले मारून तें चित्र विद्रुप करतो किंवा पत्त्याचा बंगला बांधण्यांत अनेक प्रयत्न करून चिडलेलें मूल पत्त्याच्या चिंध्या करतें तशी माझी स्थिति झाली. एकदां मी वर्गाकडे जात असतांना कालिंदी वर्गांतून बाहेर पडून माझ्या पुढून जवळून जात होती. मी सरळ व थेट तिला विचारलें, "आत्तांचा आवर नाहीं का?" दचकल्यामुळें खालीं पडलेला रुमाल उचलण्याच्या मिषानें खालीं तोंड लपवून अगदीं निर्विकार मनानें तिनें जवळजवळ फत्तरासारखें उत्तर दिलें, "अंहं. माझ्याशीं असं रस्त्यांत बोलत जाऊं नका." असें म्हणून ती तडक निघून गेली.

आतां माझा पक्का ग्रह बनला कीं, कालिंदी दिमाखी आहे ! तिचा जास्त जास्तच तिटकारा मला येऊं लागला. मी आपणांस 'माणसाचें मनोगत जाणणारा चाणाक्ष' म्हणवीत असें. Psycologyचीं गूढ तत्त्वें मला आपोआप कळत असा माझा विश्वास होता. पण कालिंदीच्या बाबतींत आपण कसें चकलों. ती दिमाखी आहे, हें तिच्या हालचालीवरून पूर्वींच मला कळावयास हवें होतें. आतां ती चूक सुधारण्याचा मी निश्चय केला. वर्गांत एकादे वेळीं ती उत्तर देतांना चुकली व मुलें हंसलीं तर मला पूर्वी राग येत असे; पण आतां मीही त्यांच्याबरोबर हंसूं लागलों. कालिंदी याच वेळीं बरोबर माझ्याकडे नेमकी गोंधळल्याप्रमाणें पहात असे. पण मला त्याचें काय होय ! मी आतां पुरताच तिचा शत्रु बनलों होतों. तिनें माझ्याशीं बोलावें म्हणून मीं केलेले सारे प्रयत्न फसले. तेव्हां प्रत्येक अपयशाबरोबर माझ्या अंतःकरणांत तिरस्काराचें व शत्रुत्वाचें एकेक पूट चढत गेलें व आश्चर्य हें कीं, माझे मित्र दिवसेंदिवस माझा बावळट-पणा विसरून मला शहाणा म्हणूं लागले. शत्रु या नात्यानें मी प्रत्येक तऱ्हेनें कालिंदीचा पाणउतारा करीत असे. एकदां तर मी एका वात्रट मित्राबरोबर असतां पुढें एकट्याच चाललेल्या कालिंदीची आम्ही मोठ्यानें थट्टा केली.

अशा प्रकारांत सीनिअरची सहामाही होऊनही गेली. परीक्षा जवळ येत चालली तर कालिंदीला पुस्तकें देणारा, सर्व तऱ्हेनें मदत करणारा मी तिचा शत्रू बनलों. मी तिचें तोंडही पहात नसें. फेलो दाते मुद्दाम माझ्या खोलींत येऊन तिजसंबंधीं गोष्टी काढी; पण मी ती गोष्ट वरकरणीं हंसून उडवून लावी. हल्लीं कांहीं मुली माझ्याकडे पाहून मिस्कीलपणें हंसतही असत. एक दिवस तर मी जवळून जातों हें माहीत नाहीं असा बहाणा करून कृष्णी सुळे येसू टिपणीसला म्हणते, "काय पण, हा दाखवितो कीं आपण त्या गांवचेच नव्हेत. ती म्हणे आधीं परीक्षा ! जसं कांहीं आम्ही कुकुली बाळंच !" मी असल्या गटार बातम्यांकडे दुर्लक्ष्यच केलें. आतां तिची अगदीं अडचण होत असेल, म्हणून मी खूप आनंदांत होतों.

एक दिवस कालिंदी गोंद्या गद्यार्शी बोलतांना व त्याच्याकडून एक पुस्तक घेतांना मला दिसली. माझ्या अंगाचा तिळपापडच झाला. यापुढें कधींही गद्या भेटला तर एकादा दुसरा टोमणा कांहींना कांहीं निमित्तानें मी मारीत असें. पण कालिंदीच्यासंबंधांत मात्र मीं कधींही त्याची थट्टा केली नाहीं. एके काळीं माझ्याशींच बोलणारी कालिंदी आतां त्याच्या-पाशींही बोलते हें मला ठाऊक असल्याचें मी त्यालाच काय, पण कुणालाही कधींच दर्शविलें नाहीं. कारण थट्टेंतसुद्धां मला त्यांची मैत्री दुःसह वाटूं लागली. यासंबंधीं थट्टा कोणीं केलीच तरी मीं मात्र कधींही थट्टेच्या विषयापुरतेंच महत्त्व या गोष्टीस देणें शक्य नव्हतें.

आतां परीक्षा अगदीं म्हणजे अगदींच जवळ आली होती. मी आपल्या खोलींत बसलों होतों. इतक्यांत वासू कोल्हटकर आला आणि म्हणाला, "लेका मराठ्या, तुझी कालिंदी आज गोंद्या गद्यार्शी गुलगुल गोष्टी करतांना मीं स्वतः पाहिली! हट् लेका!" ती दुलदुल गोंद्याशीं गुलगुल गोष्टी करील हें मला शक्यही वाटलें नाहीं. कारण त्याच्याशीं बोलतांना ती संकोचानें बोलते, केवळ पुस्तकापुरतेंच, हें मीं समक्ष पाहिलें होतें. हो! गोंद्या तरी लेकाचा माझ्याच जातीचा कीं नाहीं! पण एकंदरींत या शिळ्या बातमीनेंसुद्धां मला फारच मत्सर वाटला. 'तुझी कालिंदी' हे शब्द माझ्या मनांत खोंचून भरले. माझा सिंह दुसऱ्या खेळाडूशींही काम करतो. मग माझी काय मातब्बरी उरली? पण उपयोग काय? जळत्या अंतःकरणांतील प्रखरता आंतच कोंडून मीं वेडावून म्हटलें, "अरे जाव! कुणाशीं कां बोलेना ती! अशीं काय मोतीं पडताहेत तिच्या तोंडून?" पण वासू कसला छट! तो म्हणाला, "द्राक्षं मिळालीं नाहींत म्हणजे आंबटच! मोठा धूर्त कोल्हा आहेस रे!" "अरे, न मिळायला काय झालें? हं! बोल, काय करूं मी या बाबतींत?" मी कांहींही विचार न करितां विचारलें. मला वाटलें, वासू यावर निमूटपणें जाईल व तो तसा गेलाही. पण जातांना मला एवढेंच म्हणाला, "अरे! तोंड पहा तुझं करणाराचं! इतकं जर असतं तर मग कां अशी गमावली असतीस हातची, अंऽ!" तर्कांच्या कमिशनच्या वेळेस सकाळीं तीन तास आमचा हाच वाद! गंगाधर म्हणाला,

"या हरी गोविंद मराठ्याला म्हणावं 'रमा' ठेव. म्हणजे आम्हांला 'कालिंदी तटपुलिंद' म्हणायला बरें!" मीं पैजेनें सांगितलें. लोकांनीं नांवें ठेवूं नये; सब झूट! या लेकांत दम नाहीं. हे विसाव्या शतकांतले डेळपट हीरो! बरं झालं बाबा! नाहीं तर तो प्रोफेसर बसला होता तुम्हां दोघांना दम द्यायला. आतां त्या गद्याला म्हणावं संभाळ."

पूर्वीं हाच वासू मीं तिच्याशीं बोलतों म्हणून मत्सरानें जळत होता. पण आतां त्या निरुपद्रवी बिचाऱ्या गोविंदावर मत्सराचे बाण सुटत होते!

आतां मात्र मी वेड लागण्याच्या मार्गाला लागलों.कालिंदीनें पुन्हा एकदां माझ्याशीं बोलावें म्हणून मी जंग जंग पछाडलें; पण ती आतांशा माझ्या नजरेसच पडेना. वर्गातून बाहेर पडतांना तिला भेटण्याचें मला आतां धैर्य नव्हतें. मी अलीकडे सर्वांच्या मागून वर्गातून बाहेर येत असें. तिचा माझ्यासंबंधीं तिटकारा उगीच वाढेल असें मला वाटत होतें. मी म्हणजे तिच्या तिटकाऱ्याची विशेष फिकीर करीत होतों असें मुळींच नाहीं. अगदीं तिरस्कारानें रागावून, एकीकडे किंवा सर्वांदेखतही ती मला टाकून बोलली तरी मला आज चाललें असतें. पण एकदां माझ्याशींच बोलणारी कालिंदी पुन्हा माझ्याशीं बोलेल तरी कां अशी चातकी उत्कंठा मला लागून राहिली. पण अलीकडे इतर वेळेला ती बाहेर पडतच नसे. माझी हळुहळू फारच निराशा होऊं लागली! अगदीं मनाचा हिय्या करून मीं तिच्या राहण्याच्या ठिकाणीं जाऊन अगदीं सभ्यपणानें नाका-समोर पहात तपास केला, 'मिस् गोगटे आहेत कां' म्हणून. पण टर्म भरल्यामुळें ती अभ्यासाकरितां नुकतीच घरीं गेली होती. अगदीं अली-कडे अलीकडे तिची वृत्ति माझ्याविषयीं कमी तिरस्काराची होती. ती मला मुद्दाम टाळून कधींही गेली नाहीं. माझ्या केविलवाण्या मुद्रेकडेही तिनें कित्येक वेळां पाहिलें होतें. माझा पहिला उद्दामपणा ओसरलेला पाहून तिला आश्चर्यच वाटलें असेल. आतां कदाचित् ती माझ्याशीं बोललीसुद्धां असती. माझ्याशीं तिला कांहीं महत्त्वाच्या विषयावर बोला-वयाचें आहे, कांहीं पुढील गोष्टी ठरवावयाच्या आहेत, असासुद्धां एक दोन वेळां भास झाला. टर्म संपण्यापूर्वीं चार पांच वेळां क्लासांत नोट-

बुकाच्या मार्जिनवर कांहीं तरी लिहून फाडून त्याची घडी नीट व्यवस्थेनें पोलक्याच्या खिशांत ठेवून प्रोफेसराकडे हलकेंच नजर फेंकलेली माझ्या बारीक दृष्टींतून चुकली नाहीं, पण मी किंकर्तव्यमूढ झालों होतों. पश्चात्तापानें माझें हृदय पिचत होतें. झालें, आतां काय उपयोग? आतां परीक्षेस ती पुण्याला तर मी मुंबईला आणि ते दिवस संपतात तोंच दोघे दोन दिशेस पसार! मग कसली पुन्हा जन्मांत गांठ पडते? ही कॉलेजांतील मैत्री म्हणजे विजेच्या चकाकीसारखी! एकदम शरीराला धक्का बसून डोळे दिपून जायचे व पुन्हा पाहण्यासाठीं उघडावे तों वीज व बघणारा यांच्यामध्यें सगळें ब्रह्मांड उभें.

या बातमीनें मी खरोखरच वेडा बनलों. अभ्यास कसा तरी नांवालाच करीत होतों. कांहीं तरी काल्पनिक मजकुराचीं किती तरी पत्रें मीं कालिंदीला लिहावीं. पण पत्ता? कधीं केविलवाणीं, कधीं आडदांडपणाचीं, कधीं धमकीचीं! पत्र हातांत घेऊन पोस्टांत खांबाजवळ मी तास तास खोळंबून राही. कोणी तरी जातां जातां कालिंदीचें गांव सहज बोलून जाईल असें मला वाटे. प्रोफेसर, कारकून यांना विचारण्यापेक्षां मृत्यु बरा असें वाटलें. पुन्हा फाडावीं पुन्हा लिहावीं. कोटांत दिवस दिवस ठेवावींत. या उद्योगांत वेड्याप्रमाणें चिंध्या नसल्या तरी कागद मात्र मीं पुष्कळच फाडले.

परीक्षेचे पेपर कल्पनेबाहेर चांगले गेले. घरीं जाण्याचें जिवावर आलें. आणखी कांहीं दिवस पायाची दमछाक करून डोक्यांतील थैमान कमी करावें हा बेत ठाम करून पूर्वीं एकदां पाहिलेला वसईजवळचा आर्नाळ-चा जंजिरा पुन्हा पहावा आणि मग मुंबईहून वाट फुटेल तसें भटकून निकालाच्या अगोदर दहा दिवस घरीं जाऊन पुढील नीरस आयुष्यास सुरवात करावी असें ठरवून मी निघालों. आय. टी. एफ्. पोषाखापैकीं पिशवी व वाटर बॉटल एवढें सामान बरोबर घेतलें होतें.

× × ×

अशा तऱ्हेचें कालिंदीचें व माझें रहस्य होतें. मी आरनाळें गांवाला आलों तो फक्त या फिरस्तेगिरीसाठीं. गांवांत शिरतांच जवळची

पाण्याची पिशवी वाजवून पाहिली तों तींत पाणी नव्हतें. कुठल्या तरी घरांतून घेऊं असा विचार करून पुढें चाललों. अगदीं प्रथम घरींच पाणी मागून आपला नवखेपणा सगळ्या गांवांतून मिरवण्यापेक्षां माहीतगारा-प्रमाणें बिनदिक्कत गांवांतून जाऊन शेवटच्या घरचा पाहुणा होण्याचा मीं निश्चय केला. हळुहळू नारळीचें आवरण व घरांच्या रांगा संपून, बंदर-चा मनोरा, पलीकडे समुद्र व अलीकडे वाळत असलेले मासे असा देखावा दिसूं लागला. आजूबाजूस पाहून नारळांच्या झाडांच्या गर्द सावलींत असलेल्या एका व्यवस्थित व टुमदार अशा बंगलींत मी शिरलों. दारांतच विहीर होती. मी तडक आंत जाऊन दारापुढें उभा राहिलों. ओटीवरच्या खोलींतून एक पोक्तसे गृहस्थ आले व त्यांनीं "काय पाहिजे?" म्हणून विचारलें. "विहिरीचें पाणी काढायचें आहे, जरा घागर वगैरे कांहीं तरी द्या." अशी मीं एकदमच मागणी केली. प्रवासानें दमलेल्या माझ्या चेहऱ्याकडे पाहून मधुर हंसत ते म्हणाले, "तुमची हरकत नसेल तर घरांत-लेंच देतों." हरकत कसली होती म्हणा. हळुहळू इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत मी ओटीवरच्या खोलींत—दिवाणखान्यांत गेलों. गळ्यांतील पिशवी व वाहणा बाजूस ठेवल्या व गादीच्या कोचऱ्यावर त्यांच्याजवळ बसलों. ते म्हणाले, "तुम्ही तरुण रक्ताचीं माणसें फार तापट असतां म्हणून कांहीं विचारावयाची आम्हांला भीतिच वाटते. बरीच संध्याकाळ झाली आहे. यापुढें तुम्ही होडी गांठून किल्ल्यावर जाणार, रात्र होईल. त्यापरते जेवा, रात्रीं रहा आणि सकाळीं उठून जा!" मला त्या प्रेमळ गृहस्थाची भीड मोडवेना. पण आपला वरचष्मा असावा म्हणून मीं म्हटलें, "बरें आहे, राहतों. पण मी जेवणार नाहीं. मी दमलों आहें. आतां निजलों कीं सकाळपर्यंत ताजातवाना होईन. आपला आग्रहच असेल तर थोडें दूध घेईन." गृहस्थांनीं माजघराकडे तोंड करून जरा चढत्या आवाजांत सांगितलें, "सांवळ्या! पाहुण्यांसाठीं एक तांब्याभर पाणी आणि कपभर दूध आण पाहूं!" मी मुकाट्यानें चूळ भरून सांवळ्यानें आणलेलें दूध घोटासरशीं उडवलें, आणि मागें लोडाला कलंडलों. मी वाचण्यासाठीं बरोबर घेतलेलें 'मर्क्युरी' मासिक सांवळ्यानें घरांत पळविलें आणि "ताई,

यांत चित्रें नाहींत न् कांहीं नाहीं !" असें त्याला आंत पुटपुटतांना मीं ऐकलें. गृहस्थ डोक्याला रुमाल गुंडाळून आगरांत गेले एवढें मला अंधुक स्मरतें.

एकदम दचकून मी जागा झालों. फटफटीत उजाडलें होतें. मी ताडकन् उठून बसलों. शेजारच्या कळशींतून थोडें पाणी घेऊन चूळ भरली. इतक्यांत ते गृहस्थ चहाचे दोन कप घेऊन आले. तोंडानें त्यांच्या प्रश्नांना औपचारिक उत्तरें देत मी उरलेलें पाणी पिशवींत भरूं लागलों. पिशवी अर्धीच भरली हें पाहून ते ओरडून म्हणाले, "कालिंदी, एक तांब्याभर पाणी आण पाहूं." परिचित नांवानें माझी उत्सुकता जागृत झाली. एकादी परकर नेसलेली आठ-दहा वर्षांची कालिंदी बुजत बुजत पाणी आणणार ही माझी खात्री होती. पण नुसत्या नांवानेंही मला धक्का बसला. इतक्यांत खरोखर माझीच कालिंदी पाणी घेऊन आली. मला पाहतांच तीही दचकली व पाण्याचा तांब्या तिच्या हातांतून निसटून तिच्या लुगड्यावर सांडला. बाहेर अंगणांत उभे राहून ती लुगडें पिळूं लागली. व तिच्याकडे त्रासानें पाहून वडील पाणी आणण्याकरितां स्वतःच आंत गेले. माझी फत्तरावस्था संपून मी एकदम जागा झालों. खिशांतून एक पत्र काढून त्यावर एक ओळ खरडून निखाऱ्यासारखे डोळे करीत मीं तें तिच्याकडे फेंकलें. तिनें तें उचललें, इतक्यांत वडील पाणी घेऊन आले. पाणी भरून घेऊन मीही तडक निघालों. परत बघण्याचेंही कारण नव्हतें. कारण फटफटीत तोंड करून कालिंदी पूर्वींच घरांत गेली होती.

समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मी एक होडी ठरविली. सुमारें तासा-दीड तासानें कोळ्यानें होडीचा नांगर उचलला. आर्नाळें गांव व आर्नाळचा जंजिरा यांच्या मधील खाडींतून आमची होडी चालली होती. स्वतः मी व दोन कोळी यांच्याशिवाय होडींत कोणीही नव्हतें. वेळ भरतीची असल्यामुळें व वाराही पडलेला असल्यामुळें किल्ल्याकडे जावयास अत्यंत त्रास होत होता. अवघ्या दोन तासांच्या अवधींत आर्नाळच्या किल्ल्याकडे किती निराळ्या नजरेनें मी पहावयास लागलों होतों ! प्रवासांतील एक रमणीय स्थान असेंच या किल्ल्याचें वर्णन माझ्या मनानें पूर्वीं केलें होतें.

साधारण धड तटबंदीच्या ह्या किल्ल्यावरून पुन्हा एकदां सृष्टिशोभा निरीक्षण करावी, चार दोन तास मौजेनें एकांतांत घालवावेत याच उद्देशानें मी प्रथम येथें येण्यास निघालों. पण मध्यंतरीं तास दोन तासांनीं या उद्देशांत किती फरक पडला. जी माझी नजर किल्ल्याकडे भूतकालच्या ऐतिहासिक बुद्धीनें पहात होती तीच आतां वर्तमानकालाच्या व्यक्ति-महात्म्यानें भारून गेली! शत्रूच्या जरबेनें न डरतां निधड्या छातीनें लढणाऱ्या समुद्रकांठच्या माझ्या पूर्वजांची कर्मभूमि हें वर्णन जाऊन माझ्याशीं ताठरपणें वागणाऱ्या कालिंदीची शरणचिठ्ठी मिळणार असल्या-मुळें स्वतःच्या पराक्रमाची दिमाखभूमि हेंच वर्णन माझें मन या किल्ल्याशीं चिकटवूं लागलें.

होडींत झोके खात असतां समुद्राचा देखावा, सूर्यप्रकाशांत लकाक-णाऱ्या लाटा वगैरे सृष्टिशोभा पाहण्याच्या मनस्थितींत मी नव्हतों. आजच्या पत्रानें कालिंदी आलीच पाहिजे. आज माझा सिंह माझ्या कोरड्याखालीं नरमणार खास! आज कालिंदी मुद्दाम आर्नाळच्या किल्ल्यावर येऊन माझ्याशीं बोलेल एवढेंच नाहीं, पण म्हटलेंच तर माझ्याशीं लग्न लावायलाही निमुटपणें तयार होईल असेंच माझें पत्र होतें. मी तिच्याशीं लग्न करणार नाहीं म्हणा; पण पत्रच इतक्या जरबेचें होतें. तिच्यासारख्या चढेल मुलीवर प्रेम करायला कांहीं मी पूर्वींसारखा बावळटच राहिलों नव्हतों. पण माझ्या पराक्रमाची आज पराकाष्ठा होती. एकाद्या बाहुलीप्रमाणें मी नाचवीन तसें नाचणें तिला भाग होतें........या विचारांत होडी खडकावर गेलेलीही माला समजली नाहीं. एकदम वल्हीं बंद करून काठीनें होडी किनाऱ्यावर लावण्यांत आली व मी बेटावर इतस्ततः हिंडूं लागलों. तास दोन तास चैत्रांतील चढत्या उन्हांत वाळूंतून मी हिंडलों. समोर समुद्र होता याचेंही मला भान नव्हतें. मनांत कांहीं तरी चमत्कारिक कालवाकालव होत होती. समुद्राच्या अफाट सान्निध्यामुळें मनांत शुकशुकाट झाला होता. आंतून मला असें वाटूं लागलें, कीं आपण कालिंदीचा उगीच अंत पाहिला. प्रेम असें ओढून कां येत असतें? पण तिचें प्रेम हवें होतें कोणाला? पण ती येथें येऊन खरी

हकीकत सांगून तिला वचनमुक्त करीपर्यंत तरी तिच्या मनाला असेंच वाटत राहणार नाहीं कां ? खरोखरींच तिला काय यातना होतील ?... कदाचित् ती वाटेंत होडींतून उडी सुद्धां मारील....या विचारानें सुद्धां मी दचकलों. धांवत धांवत जाऊन, होडी आली का, त्यांत माणसें कोण कोण आहेत हें किल्ल्यावरून पहावें असें वाटून मी निघालों. किल्ल्याच्या दरवाजांतून किंबहुना किनाऱ्यावरून कोठूनही ही खाडी सबंध दिसत असल्यामुळें होडीवर नजर ठेवतां येईल हें माझ्या लक्षांतच आलें नाहीं. मागें वळूनही न पाहतां धांपा टाकीत धांवत मी किल्ल्याच्या तटावर चढलों. पण कोणतीच होडी खाडींतून येत नव्हती. मग कालिंदीवर सोडलेला बाण हुकला कीं काय ! मी घड्याळ काढून पाहिलें; आणखी पांचच मिनिटांनीं आमची भेटण्याची ठरलेली वेळ ठेपणार. मी संकेत-स्थलाकडे झपाट्यानें चाललों. दरवाजाच्या बरोबर समोर मागील तटाचा जो बुरूज आहे, तें आमचें संकेतस्थान ! तेथून पाहतों तों कालिंदी व तिच्याबरोबरच्या दोन कोळ्यांच्या बाया दरवाजांत शिरून बोलत होत्या. कांहीं वेळानें कालिंदीनें हाताच्या फटकाऱ्यानें त्यांना जाण्यास सांगितलें. खालीं मान घालून हातांतील छत्री जमिनींत टोंचत ती माझ्याकडे येऊं लागली. किती तरी भेसुरता तिच्या चेहऱ्यावर होती ! तिचें रसरस-लेलें तोंड सुकट व आघाड्याच्या पानाच्या पाठीप्रमाणें राखट दिसत होतें. मूर्तिमंत खिन्नताच तिच्या तोंडावर वावरत होती. अत्यंत मानी, कधींही न डगमगणारी कालिंदी फांसावर जाणाऱ्या कैद्याप्रमाणें नशिबावर हवाला ठेवून, निमूटपणें माझ्या मांडीवर मान ठेवण्यास येत होती. पूर्वीं कधींही कालिंदीकडे पाहिलें तर, कपाळावर अस्पष्ट आठ्या, तर कधीं प्रसन्न विशालता; ओंठ जरा आंवळून चढविलेले, तर कधीं हंसतांना उमललेले; डोळ्यांत धिक्काराचें पाणी, तर कधीं मोकळा खेळाडूपणा भरलेला; असाच देखावा पाहावयास मिळाला असता. पण आज गोगलगाय बनून ती माझ्याकडे येत होती. सर्कशींत चाबकाच्या फटकाऱ्याखालीं हत्तीसारखा उमदा प्राणी असहायपणें रडूं लागला कीं माझे डोळे नेहमीं ओले होत. त्याच कोंवळ्या मनोवृत्तीनें

आतां माझा धिक्कार सुरू केला. अडचणींत गांठून लुबाडणाऱ्या चोरापेक्षांही मी नीच आहें, असें माझें मन मला सांगूं लागलें. आतां मात्र माझा ठाव सुटला. जसजशी कालिंदी जवळ येत चालली तसतसें माझ्या अंगांत कांपरें भरलें. वर पाहण्याचा मला धीर होईना. खालीं मान घालून मी स्तब्ध उभा राहिलों. 'मी तुझ्या वचनांतून तुला मुक्त करतों' असें कालिंदीस सांगून तिची क्षमा मागावयाची असें मी ठरविलें. माझ्या मनांतील यातना वर्णन करणें कठीण आहे. 'माझी' कालिंदी माझ्या ताब्यांत येऊनही सोडण्याची वेळ आली म्हणून वेदना होत होत्या. पण त्याच वेळीं अशा तऱ्हेनें सांपडलेली कालिंदी खरीखुरी 'माझी' कशी हा प्रश्न मनांत डोकावून गेला. इतक्यांत जमिनीवर कालिंदीची सावली दिसली. मी वर न पाहतां फिरलों, व आम्ही दोघेही जिना चढून वर बुरजाकडे चाललों. आम्ही एकमेकांशीं चकार शब्दही बोललों नाहीं. माझ्या अंगांतील कांपरें जास्तच वाढलें. व पायऱ्या चढतांना दोन्ही बाजूंस माझा तोल जाऊं लागला. डोकें भणाणूं लागून कानशिलांत व आंखांवर जोरानें ठोके वाजूं लागले. इतक्यांत माझा कालिंदीकडे झोंक जाऊन, माझ्या कोपराचा तिच्या अंगाला स्पर्श झाला. तिनें झटकन् वळून तिरस्कारानें मजकडे पाहिलें. तिच्या डोळ्यांत डवचलेला नागिणीचा चेव दिसत होता. माझ्या डोळ्यांत खळकन् पाणी आलें, व मी तिच्याबरोबर न चढतां एक पायरी मागून चढूं लागलों. खालून दिसणाऱ्या, आकाशावर उमटलेल्या तिच्या आकृतींत थोडा कंप झाल्याचा मला भास झाला. ती रागानें बहुधा थरथरत असावी. पुन्हा स्तब्धपणें आम्ही वर चढलों. वर जातांच कालिंदी एकदम मागें वळून निश्चयानें मला तोंड देण्यासाठीं उभी राहिली. अशा प्रसंगीं वास्तविक माझा दिमाख वर यावयाचा; पण तो कोठच्या कोठेंच पळाला. शेवटची पायरी चढून बुरुजावर पाय ठेवण्याचें मला धैर्यच होईना. मी ओक्साबोक्शी रडण्याच्या बेतांत आलों. हातांत तोंड दडपून मी शेवटीं वर चढलों, व कालिंदीकडे पाठ करून तटावर डोकें ठेवून डोक्यांतील तुंबलेल्या अश्रूंस व विकारास मोकळी वाट करून दिली. मला परत पाहण्याचें जमेलसें वाटलें नाहीं.

'वचनमुक्त करतों' असें तिला सांगण्याचा हिय्या मला सोडून गेला. केळीच्या पानाप्रमाणें मी थरथर कांपूं लागलों. इतक्यांत कालिंदीचा स्वर ऐकूं आला. "झाली एकदां सगळ्या जन्माची इतिकर्तव्यता!" तिच्या डोळ्यांतून रागाच्या व तिरस्काराच्या ठिणग्या पडत असाव्यात, असें मला पक्कें वाटलें. आतां मात्र तिची क्षमा मागण्याचें लांबविण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून मी वळलों; तों काय? कालिंदी रागानें थरथरत नसून, आनंदानें फुलली आहे असें मला दिसलें. सिंहाच्या तीक्ष्ण नखानें होणाऱ्या वेदना सोसण्याकरितां मन दगडासारखें घट्ट करून बसलेल्या दिलीपाच्या मस्तकाला 'विद्याधर हस्तमुक्त' पुष्पवृष्टीचा स्पर्श जितका हर्षोत्पादक वाटला असेल तितकीच स्तिमितता माझ्या दृष्टीला या देखाव्यानें आली. क्षणभर मला तें खरेंच वाटेना. माझा थोडासा विरसही झाला असें मला वाटलें. पण खरोखरच कालिंदीची वृत्ति उमलेली होती. तोंडावरील राखट रंग जाऊन पुन्हा गरम रक्ताची आरुणी त्यावर पसरली होती. डोळे हंसऱ्या आनंदानें चमकत होते. सर्व शरीरावर लज्जेचा नाजुक थर पसरला होता. अंग किंचित् कंप पावत होतें, पण मी आपलें कर्तव्य म्हणून खालच्या मानेनें म्हणालों, "तुम्हांला इथें अशा तऱ्हेनें आणण्यांत मी भयंकर चूक केली. मी आपली क्षमा कोणत्या तोंडानें मागूं, हेंच मला कळत नाहीं. मी तुम्हांला पुन्हा जन्मांतही तोंड दाखविणार नाहीं. तुम्ही मात्र मला उदार मनानें क्षमा करा." जरा धीर करून मी वर पाहिलें तों कालिंदी आश्चर्यानें म्हणाली, "म्हणजे, ही फसवेगिरी कशाला?" मी तिला पश्चात्तापदग्ध मनानें सांगितलें, "पण तुम्हांला जबरदस्तीनें आपल्याजवळ ठेवून घेण्याइतकी नीच भावना आतां माझ्यांत उरली नाहीं." "जबरदस्तीनें मी तरी तुमच्याजवळ थोडीच आलें असतें. मी खुषीनें आपली झालेली नाहीं कां चालणार?" मी वर पाहिलें तों कालिंदी खालीं पहात होती! अरेच्या! कालिंदीचें पहिल्यापासून माझ्यावर प्रेम होतें तर—आणि माझें—आतां माझेंही होतें असेंच म्हटलें पाहिजे. मी दोन पावलें पुढें सरून स्थिर नजरेनें तिच्या लाजऱ्या चेहऱ्याकडे पाहिलें व म्हटलें, "मग तूं मघाशीं इतकी उदास कां होतीस?" "आपण उद्दाम होतां

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ......

म्हणून मी उदास होतें. आपलें पत्र पाहून मला त्यांतील विचारांचा, ते मांडण्याच्या रीतीचा उद्दाम अरेरावीपणा आवडला. पण खरंच सांगूं कां, जबरदस्तीनें अगदीं कुणाच्याही स्वाधीन होणं मला स्वप्नांतही खपलं नसतं. मी तुमच्या धमकावणीला लाथेनें उडवून देतें, असें तुम्हांला बजावून वेळ पडल्यास बुरुजावरून उडीही टाकण्याच्या निश्चयी बाण्यानें मी इथं आलें होतें. पत्र देते वेळची तुमची मुद्रा खरोखरीच अगदीं राक्षसी होती!–पण मला काय माहीत हीं सोंगं सारीं!" हीं सोंगें नसून वस्तुस्थितिच होती व मी खरोखरीच एका सैतानी बाण्यानें आतांपर्यंत वाघून तिला येथपर्यंत बोलावली हें सांगण्याच्या मी भानगडींतच पडलों नाहीं. मी म्हणालों, "पण असं मी पत्रांत लिहिलं तरी काय होतें." "माझ्या तोंडूनच वदविण्यांत काय बरं अर्थ आहे?" कालिंदी माझ्याकडे प्रेमानें भारलेली नजर लावून म्हणाली. "माझी अरेरावी मर्जी असली तर!" मीं हंसत म्हटलें. "मग तर मी मुळींच सांगणार नाहीं. धमकावणीला मी कधींही भ्यालें नाहीं." कालिंदी उसन्या आवेशानें ओरडली.

कांहीं वेळानें आम्ही होडींतून परत चाललों होतों व मी न विचारतांच कालिंदी 'पत्रांतला मजकूर सांगू कां' असें हंसत मला विचारत होती. वृद्ध गृहस्थांना सर्व गोष्टी सांगून भरतवाक्य कसें म्हणवावें या मी विचारांत होतों. होडीला चांगला वारा लागून ती जोरानें पाणी कांपीत चालली होती. एका बाजूला वांकून समुद्राचें पाणी हाताच्या फणीनें विंचरीत मीं उत्तर दिलें, "वडिलांना काय सांगू तें सांगावें राणीसरकारची –लेडी ऑफ दी लेकची–मर्जी असेल तर!" चटकन् कोळ्याकडे पाहून, मजकडे दटावणारा कटाक्ष टाकून, कालिंदी सांगू लागली, तों—

× × ×

तों काय–होडी उलटली! नाहीं! नाहीं! होडी उलटली असती आणि बुडून मेलेला जीव जागा न होतां मेलेलाच राहता तर जग कांहीं बुडालें नसतें. अरेरे! मी स्वप्नांतून फार लवकर जागा झालों. पुन्हा निजून पाहिलें पण तें स्वप्न चालू होईना व पुढें काय करावें तें उमगेना. माझ्या अंगावर कोणीतरी रात्रीं घातलेली शालजोडी दूर पायगती फेंकून

मी ताडकन् उठून बसलों आणि दोन्ही हातांत डोकें घट्ट पकडलें. काय हें चमत्कारिक स्वप्न! कालिंदीचें पूर्वीपासून माझ्यावर प्रेम आहे आणि माझ्या बेफिकीर, उर्मट मानीपणाच्या राखेखालीं प्रेमाचा ज्वालामुखी धुमसत आहे असें सांगणारें स्वप्न अपुरें कां राहिलें ? दुसऱ्याच्या मनोभावनेकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या पूर्वग्रहाप्रमाणें, दुसऱ्याच्या कृतीची मीमांसा करणाऱ्या, मनकवडा म्हणून शेखी मिरविणाऱ्या, मला दैवानें हें शासनच केलें. सोन्याची संधि गेल्यावर मी जागा झालों. मंगळ व शुक्र यांचा युतियोग दवडून मग एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहाकडे धांव घेण्यास सज्ज झालों. माझ्या सुषुप्तींतल्या मनानें हें मला अगोदरच सुचविलें असतें तर! आतां मागून शोक करून काय उपयोग! जन्मभर नीरस, भग्न मनोरथाचें आयुष्य कंठण्यास तयार झालें पाहिजे. आतां पुन्हा अर्नाळा किल्ला पाहण्याची आपली छाती नाहीं. या घरांत काल्पनिक उभी केलेली कालिंदी तेथें पुन्हा प्रगट व्हावयाची. गृहस्थ उठण्याच्या आंत आपलें प्रातःकृत्य उरकून नमस्कार ठोकून चालावयास लागावें, आतां तडक घरीं जावें असा ठाम निश्चय करून मी उठलों. अंगणांत एक पाट, परीट घडीचा टावेल व स्वच्छ घासून नुकतेच ठेवलेले दोन तांबे होते. मी पिशवी हालवून पाहिली तों ती नुकतीच भरलेली असल्यामुळें बाहेरून किंचित् ओली होती. मर्क्युरी मासिक माझ्या पिशवींत विराजमान झालें होतें. आश्चर्य हें कीं, माझ्या वहाणांवरची धूळ सुद्धां, कुत्र्यानें चाटल्यासारखी नाहींशी झाली होती. मी मनांत म्हणालों, 'हा सांवळ्या मोठा चलाख पोर दिसतो. आपलें रिव्हार्सिंग स्टेशन येऊन प्रवासानें उलट दिशा खाल्ली; बरोबरचे बदाम खारका जर्दाळू बेट्याला मग खाऊ म्हणून द्यावा.

मी कपडे अंगावर चढविले आणि उतावीळपणानें गृहस्थांची वाट पहात बसलों. इतक्यांत ते तोंड पुशीतच आले. ते म्हणाले, "मराठे, झोंप झाली कां? चहा पिऊन मग जरा बाहेर भटकून येऊं. कालचे उपाशीं आणि त्यांत आज सण. जेवण झाल्याशिवाय तुम्हांला जाऊंच द्यावयाचें नाहीं असा घरांतला आग्रह आहे! वा राव! जे एकदां कलंडलांत ते

झोपलांतच ! एकदां वाटलें कीं जेवायला उठवावं पण म्हटलं निजूं दे ! मुलांना पांघरूण घालायला सांगितलें ! पण तुम्ही आमची फार करमणूक केलीत बोआ रात्रीं ! अहो, आमचीं दोन्ही मुलें आणि ती सारखी तोंडाला पदर लावून हंसत होतीं. झोंपेंत सुद्धां फार अस्खलित बोलतां बोआ !" मी आश्चर्यानें थक्क झालों. काय बोललों झोपेंत आणि काय नाहीं ! मला या नसत्या गोष्टींत लुडबुड करणाऱ्या थेरड्याचा रागच आला. मी जरा कठोर स्वरानें म्हणालों, "मी आतां जातोंच. क्षमा करा ! चहा पिऊन मी जाणारच ! गृहस्थ मानेवरून हात चोळीत म्हणाले, 'कठीण बोवा या तरुणांचें—बरं ! कालिंदी लवकर चहा आण पाहूं."

कालिंदी ! पुन्हा कालिंदी ! हें पुन्हा स्वप्न कीं काय ? छे ! पाण्याच्या पिशवीच्या झांकणाची काढघाल करीत खांबापाशीं मी उभा होतों. पिशवी हातांतून पडली. मी पटकन् खालीं जोत्यावर बसलों. हृदयाच्या ठोक्यांतले एक दोन ठोके पडणें चुकलें असें मला वाटलें. पुन्हा स्वप्नाची पुनरावृत्ति होणार कीं काय ?—कालिंदी, माझी कालिंदी ! आणि ती या खेडेगांवांत ! कां असू नये ! सर्वत्र शिकणाऱ्या मुलींचे आईबाप शहरांत थोडेच रहातात. हाच तो 'अंतरः कोऽपि हेतु'. यानेंच मला आनाळ-ला खेंचून आणलें. तरीच बापलेकींच्या मधुर हास्यांत साम्याचा भास झाला. माझ्या कालिंदीनें माझ्यावर मायेची शाल घातली. माझी सर्व व्यवस्था केली आणि आपल्या हातचें गोड जेवण जेवावें असा हट्ट धरला. लबाड कुठली. थांब, आणखी थोडा वेळ ताणून धरतों. झोंपेंतल्या बरळ-ण्यांत आमचं सर्व बिंग फुटलं वाटतं. बरं झालं. मामांची निराळी समजूत बालवयास नको ! आणि तें पत्र ! कोटाच्या खिशांतून एक जुनें पत्र काढून त्याच्या चिंध्या करून टाकल्या.

आंतून सांवळ्या ओरडला, "ताई ! मी चुकून स्टोव्ह विझवला ! दूध तापवायचं राहिलं ना ! थांब जरा !" वृद्ध गृहस्थ म्हणाले, "किती चेंगट-पणा करतेस ग कालिंदी ?"

कालिंदी ! माझी कालिंदी ? आशावादी मना ! अजून तूं आपल्याच दृष्टीनें जगाकडे पहातोस ? काल रात्रीचा अनुभव काय सांगतो ! कालिंदीचें

चें तुझ्यावर प्रेम होतें हें कशाच्या आधारावर मीं म्हणावें. असें प्रत्येक मुलाला वाटूं लागल्यावर मुलींनीं तरी कसें वागावें आणि प्रेम असलें तरी हल्लींच्या काळांत तें कॉलेजाच्या बाहेरच्या आयुष्यक्रमापर्यंत टिकेल, जग टिकवूं देईल याची काय ग्वाही ! आणि टिकणार असलें तरी माझ्या उतावीळ मनानें माझी कालिंदी याच घरीं आहे असें मीं कोणत्या आधारावर म्हणावें. नांवासारखीं नांवें नसतात काय ? आदरातिथ्याच्या ह्या तऱ्हाच आहेत. पण कालच्या त्या स्वप्नांनं माझें मन दुर्बल झालं. एकदां वाटलें, कीं माझीच कालिंदी येणार. पण एकदां वाटलें, ह्या खेडेगांवास शोभणारी, लोकांच्या झोंपेंतल्या बरळण्यास हंसणारी, गांवढळ, मराठी तीन चार बुकं शिकणारी अशिक्षित इतर पांचशें कालिंदींपैकीं एक माझला येऊन माझ्यापुढें चहा ठेवून माझ्या प्रेमांध नजरेंत झणझणीत अंजन घालणार...हजारों विचार एका क्षणांत येऊन गेले.

अखेरीस दोन हातांत पेल्यांचें ताट घेऊन खालीं मान घालून हळुहळू कालिंदी आली—

पण ही कोणती कालिंदी ? माझी, कां— ! ! !

# विठ्ठलराव घाटे

## स्त्री आणि पुरुष

मध्यरात्र! जिकडे तिकडे सामसूम झाली होती. रजनीदेवीनें आपल्या विस्तीर्ण काळ्याभोर केशकलापांत सर्व विश्वास झांकून टाकिलें होतें. दिवसभर कावाडकष्ट करणाऱ्या, पापपुण्य करणाऱ्या, प्रेमद्वेष करणाऱ्या मनुष्याचा ध्वनि विराम पावला होता. ध्वनि उमटत होता फक्त एकच! व तो रात्रीं इतस्ततः भिर भिर फिरणाऱ्या वाऱ्याचा. क्षुद्र प्राणी, क्षुद्र मानव निद्राधीन झाले असें पाहून विश्वस्त मनानें तो शाश्वतजीवि आपल्या मनांतलें खोल गूढ, दिवसां झांकून ठेवलेली व्यथा--अनंतामध्यें व्यक्त करीत सृष्टीभर वावरत होता. त्याला समानधर्मा कोण मिळणार?

बिछान्यावर, आरोग्य व व्यायाम यांची पूर्ण कृपा असलेल्या माणसांनाच येणाऱ्या गाढ निद्रेचा अनुभव घेत तो निजला होता. त्याचा श्वासोच्छ्वास नियमानें चालला होता. अर्धस्फुट ओंठांचा बाक त्याचें आत्मसंयमन व करारी निश्चय व्यक्त करीत होता. अन् ती? ती तळहातावर डोकें ठेवून, यदृच्छेनें ज्याच्या जीवनौघांत तिचें जीवन मिळालें होतें, ज्याच्या जीवनप्रवाहावरोवर तिला आयुष्याच्या दऱ्याखोऱ्यांतून भटकायाचें होतें, त्या आपल्या सहचराच्या निद्रासुखाकडे पाहत होती. त्या शांत व सुस वर्तमानाच्या आधारानें ती आपल्या भूतभविष्यांची सांखळी जुळवीत होती.

तिला झोंप कोठून येणार! तिच्या डोळ्यांसमोरून भूतकाळचीं चित्रें सरसर चाललीं होतीं. शेलीच्या स्कायलार्कबरोबर आकाशांत मारलेल्या भराऱ्या, बालकवीच्या फूलराणीबरोबर गोड निळ्या वातावरणांत केलेला मनमुराद विहार, आज तिला परत आठवला. शेलीची तरलता, कीट्स्‌ची तळमळ, वर्डस्वर्थचें सरळ गांभीर्य, टेनिसनची कलाकुसरीची भावव्यक्ति, भवभूतीचें कारुण्य अन् कालिदासाचा सुभग शृंगार--ही अनेकविध सामुग्री एकत्र करून लग्नापूर्वी तिनें आपल्या भावी प्रियकराची

तयार केलेली कल्पनामय मूर्ति आज भंग पावली होती; वस्तुस्थितीच्या प्रखर तापानें वितळूं लागली होती.

तिला गुदमरल्यासारखें वाटूं लागलें. डोकें भ्रमूं लागलें. तिनें त्याच्या प्रशांत चेहऱ्याकडे पाहिलें. चेहऱ्यावर आतां निर्व्याज हास्य खेळत होतें, कृतार्थता व सार्थकता दिसत होती. तिनें बराच वेळ पाहिलें. हळुहळू तिच्या मनांत विचार आले, "पण ते किती प्रेमळ आहेत? मघां सभेला जातांना लगबगीनें पण किती जिव्हाळ्यानें त्यांनीं गालगुच्चा घेतला. हो, अन् त्यांची ऐट, जिना कसा पण बेगुमानपणें उतरून गेले. सहज लीलेनें खांद्यावर टाकलेला ओव्हरकोट, टोपीच्या खालीं विशाल भालप्रदेशावर डोकावणारे केस, सायकलवर सहजपणें बसण्याची ती ढब! सारेंच कांहीं किती अकृत्रिम पण किती रुबाबदार! क्लबांत स्नेह्यांशीं खेळतांना, गप्पागोष्टी करितांना ते मला विसरले असतील—हो, असतीलच. पण—पण किती झालें तरी ते पुरुष आहेत. मला वेडीला आपलं वाटलं हवा छान होती, संध्याकाळीं त्यांनीं बाहेर जाऊं नये. दोघांनीं खिडकीजवळ खुर्च्या टाकाव्या अन् माझा आवडता शेलि वाचावा. पण ते गेले. जाऊं नये, पण गेले. त्यांना मित्र आहेत, समाजांत दर्जा आहे, पुढारीपण आहे, व्यवसाय आहेत. त्यांचें आयुष्य विविध आहे, व्यापक आहे. माझ्या या लहानशा खोलीच्या चार भिंतींच्या आंत ते कसे कोंडले जावेत? अन् त्यांनीं स्वतःला कां कोंडून घ्यावें? मी तरी कां कोंडावें? माझं जीवन सरल, एक मार्गी. माझं ध्येय एकच. माझा व्यवसाय एकच. माझ्या एकतारींतून एकच सूर निघणार! त्यांच्या बहुविध जीवनगीतास सदान्कदा माझ्या एकतारीची साथ कशी जमणार? पण त्यांनीं माझ्या एकतारीवरच कां गाऊं नये? मी त्यांच्याशीं समरस झालें, एकजीव झालें; त्यांनीं तसें कां होऊं नये? एका प्रेमाच्या आधारावर कां राहतां येऊं नये? लौकिक, सत्ता, अन् कर्तव्य; कशाला यांचा तो जुलूम? पण ते तरी काय करतील? विश्वव्यापी चिरंतन असे जे नियम आहेत, ते त्यांना पाळले पाहिजेत—मलाही पाळले पाहिजेत; त्यांना त्यांचें कर्तव्य बजावलें पाहिजे, मला माझें प्रेम केलें

पाहिजे. शिवाय त्यांचें माझ्यावर प्रेम कमी आहे थोडेंच ? त्यांच्याजवळ इतकें-इतकें प्रेम आहे कीं तें मला भरपूर देऊन जगासाठीं उरतें. मघां सभेंतून परत आली तेव्हां काय पण स्वारी खुलली होती. मला काय सांगूं नू काय नको असें अगदीं झालें होतें. टोपीसुद्धां काढायची विसरले. मी ठेवली ती खुंटीवर. सभेंत त्यांना विजय मिळाला, त्यांचाच ठराव पास झाला, हें ऐकून मी डोळे भरून पाहिलें मात्र! स्वारीला जसें कांहीं मूठभर मांस चढलें! मीच खुळी. उगीच त्यांच्यावर रागावलें. सभेला जर जायचें, तर मग खिडकीशीं खुर्ची टाकून कसें बरें बसतां येईल ? उगीच —उगीच मी मनाला लावून घेतलें. झोंप कशी पण गाढ आली आहे. दिवसभर पडतातच श्रम तसे. पण कधीं कुरकुर ? नेहमीं आपलें हंसतमुख, मी रागावलें तरी सुद्धां ! तें मघाचें हास्य अजून ओंठावर शिल्लक आहेच. खालचा ओंठ मघाची अर्धी गोष्ट जणुं काय आतां पुरी करीन म्हणतोय. पण तो हात कां उशाला ? काय तरी बाई संवय! उशा, गिर्द्या काय कमी आहेत ? हाताला रगबिग लागायची."

तिनें हळूच त्याच्या केंसांवरून हात फिरविला. त्याच्या खालच्या ओंठावर आपला तळहात ठेवला. हळूच त्याच्या डोक्याखालचा हात काढला. त्या चिरपरिचित पण चिरनूतन स्पर्शानें तिचें अंग थरारलें. ऊन ऊन श्वास बाहेर पडूं लागले. डोळ्यांवर धुंद अशी ग्लानि आली. तिचें स्त्री-हृदय व स्त्री-शरीर आंदोलन पावूं लागलें. तिनें आपलें डोकें त्याच्या डोक्याशेजारीं नेलें.

तो जागा झाला. तिची ती कावरीबावरी मुद्रा, ते उष्ण श्वास पाहून तो आश्चर्यानें म्हणाला, "अंः! लाडके, काय झालें? मला कां उठवलंस ?"

"कांहीं नाहीं, उगीच !" असें म्हणून तिनें त्याच्या कुशींत आपलें डोकें लपविलें.

वर चंद्र प्रकाशला होता. खालीं वारा आपलें गूढ प्रेमगीत गात चालला होता.

---

## एक कारकून

बोलून चालून कारकून तो! त्याच्या चरित्रांत तें विशेष काय असणार? अंधाऱ्या रात्रीं भयाण अरण्यांत मुसळधार पावसांत भरधांव घोडा फेंकायाला तो रजपूत राजपुत्र थोडाच होता? सुंदर युवतीची एखाद्या खलापासून ऐन प्रसंगीं सुटका करायला तो काय कादंबरीनायक होता? तो जगाचा मार्ग सरळ नाकासमोर दिसणाऱ्या वाटेनें चालणारा फक्त एक कारकून होता.

त्याला कोणी नव्हतें. मुगभाटांतल्या एका आडवळणी चाळींत तळमजल्यावरील एका असूर्यपश्या खोलींत त्यानें आपला संसार थाटला होता. खोलीच्या मध्यभागीं जुनी ठिकठिकाणीं भोकें पडलेली बारा आणेवाली एक चटई होती. तिच्यावर कापूस बाहेर डोकावीत असलेल्या गादीची वळकटी भिंतीला लागून होती. गादीच्या त्या स्थितीला कदाचित् वळकटी असें म्हणतां आलें नसतें. कारण सकाळीं उठल्यावर पंत एका लाथेनें बिछाना भिंतीकडे झुगारीत. तेव्हां यदृच्छेनें त्याचा जो आकार होईल तो खरा. रात्रीं भिंतीच्या बाजूनें एक लाथ पाठींत बसली म्हणजे ती गादी चटईवर उताणी होई. गादीवर जुन्या धोतराची चादर व जुन्या ॲननडेलच्या डिक्सनरीची उशी होती. चटईच्या आवतीभोंवतीं विड्यांचे तुकडे व जळक्या काड्या पसरल्या होत्या. कोपऱ्यांत टीनची एक ट्रंक उघडीच पडलेली होती. खुंटीवर एकुलता एक कोट व त्याच्यावर मेणचटलेली टोपी होती. समोर भिंतीला एक जस्ती दिवा शोभत होता. एका कोपऱ्यांत वादली व कधीं न हात फिरला गेलेला तांब्या व दुसऱ्या कोपऱ्यांत एक टमरेल व फाटका दक्षिणी जोडा होता.

पंत गेल्या वीस वर्षें या ऐश्वर्याचा उपभोग घेत होते. या वीस वर्षांत त्यांच्या खोलींत गृहलक्ष्मीच्या कांकणाचा किंवा लहानग्या बाळाच्या रडण्याचा आवाज कोणी ऐकला नव्हता. या वीस वर्षांत कोणी शेजाऱ्यानें पंतांचा उंबरा ओलांडला नव्हता. चाळींतलीं व्रात्य पोरें पंतांच्या खोलीपर्यंत धिंगामस्ती करीत धांवत येत, पण खोलीजवळ येतांच गुपचूप खालीं

मान घालून पुढें जात. पंत चाळीजवळ येतांच नळावरील बायकांचीं भांडणें थांबत व त्या एकमेकींकडे पाहत. पंत मात्र त्या घाबरलेल्या मुलांकडे किंवा गोंधळलेल्या बायांकडे मान वळवून पहात नसत.

रोज नियमानें खोलींत येणाऱ्या मांजराप्रमाणें पंतांचें आयुष्य नियमबद्ध झालें होतें. त्यांचा दिनक्रम अगदीं रेखिव, ठरलेला असे. सकाळीं उठल्यावर तोटीखालीं स्नान आटोपल्यावर बरोबर सात वाजतां पंत समोरच्या इराण्याच्या हॉटेलांत शिरत. नेहमींच्या एका कोपऱ्यांत छत्री ठेवून स्वारी खुर्चीवर बसे. खुर्चीचें तोंड नेहमींप्रमाणें भिंतीकडे नसल्यास आधीं ते तसें करीत. एका कपाच्यावर पंतांनीं दुसरा कप कधीं मागितला नाहीं. काकूंच्या खाणावळींत साडेनवाच्या पहिल्या पंक्तीला पंत आपल्या नेहमींच्या पाटावर बसत. जेवण संपेपर्यंत त्यांची मान वर कधीं होत नसे. त्यांनीं कधींही दह्याची एक्स्ट्रा वाटी किंवा श्रीखंडाची प्लेट मागविली नाहीं.

पंतांची कचेरी कोटांत कुठेंसेशी होती. कचेरींत जाण्याचा रस्ता व रस्त्याची बाजू एकच. धोबीतलावाजवळच्या एका आंधळ्या भिकाऱ्याच्या हातावर नियमानें ते एक दिडकी ठेवीत असत. कचेरींत आपण बरें कीं आपलें काम बरें. तपकिरीची चिमटी घ्यायला पंत कधीं जागेवरचे उठले नाहींत. अकरा ते पांचपर्यंत पंतांचा टाक चुरुचुरू चालून त्यांतून तिरपीं कारकुनी बाण्याचीं अक्षरें निघत.

कचेरी सुटल्यावर चौपाटीवर एका ठराविक बेंचवर समोरच्या चिवडेवाल्याकडे पहात पंत बसत. पाठ नेहमीं समुद्राकडे. हातांत नेहमीं पांढऱ्या रंगाची छत्री असावयाची, पण तिचा उपयोग ते काठीसारखा करीत. उन्हांत किंवा पावसांत छत्री उघडण्याचें स्मरण पंतांना क्वचितच होई. चालणें नेहमीं खालीं पाहून. चालतांना ओठ मधून मधून हालत; कधीं मधीं एखादा सुस्कारा बाहेर पडे. पण तो ऐकणार कोण ? संध्याकाळीं जेवण झाल्यावर पंत तडक बिऱ्हाडीं जात. दिवा लावण्याचा प्रसंग क्वचितच येई. एका लाथेसरशीं बिछाना घालून ते त्यावर पडून अंधारांतच वरच्या तुळईकडे पहात तासच्या तास घालवीत. अशींच आणखी वीस वर्षें गेलीं. पंतांचा दिनक्रम पूर्वींप्रमाणेंच चालला

होता. जुन्या इराण्याचें दिवाळें निघाल्यामुळें व काकूस कैलासवास घडल्यामुळें जो बदल करावा लागला असेल तेवढाच. तेंच चाळीस वर्षांपूर्वीचें टमरेल कोपऱ्यांत पडलेलें होतें. अन् पंत ! त्याच खोलींत राहत होते, त्याच कचेरींत काम करीत होते, त्याच रस्त्यानें जात व परत येत. रेकले जाऊन विक्टोरिया आल्या; ट्रम झाल्या; त्यांचे घोडे जाऊन त्या तशाच धावूं लागल्या; दुसऱ्या बिनघोड्याच्या गाड्या दिसूं लागल्या; पंत तेच पूर्वीचे पुराणपुरुष होते. पण आतां शरीर थकलें होतें. दम्याचा विकार जडला होता. रात्रभर खोकत बसावें लागे. परंतु पंतांनीं वैद्य डॉक्टर पाहिला नाहीं, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा सल्ला विचारला नाहीं. आतां चालतांना पाय कांपत व खांबांचा आश्रय घ्यावा लागे. कचेरींत आतां पूर्वीसारखें वळणदार अक्षर निघत नसे. हात कांपे, चुका होत. हेडक्लार्क खेंकसून म्हणे, "पंत, तुम्हांला आतां म्हातारचळ झालाय. काय हें अक्षर! परत ड्राफ्ट करा. त्या बेरजा पण चुकल्यात. बेअक्कल कुठचे !" पंत नाकाच्या टोंकावर असलेल्या चष्म्यांतून निर्विकारपणें हेडक्लार्कसाहेबांकडे पहात व त्यांचें भाषण संपल्यावर शांतपणें कागद घेऊन आपल्या जागीं जात.


आजकाल लहान मुलांनीं आपल्या खोलींत यावें असें पंतांना वाटूं लागलें होतें. पण त्यांना कशी हांक मारावी, त्यांच्याशीं काय बोलावें हें माहीत नसल्यानें तें जमलें नाहीं. तरी पण अलीकडे एक उनाड शेंबडें पोर पंतांच्या खोलींत कधीं कधीं दिसे. पंत त्याच्याशीं न बोलतां पाठीवरून हात फिरवीत व त्याला दोन पेपरमिंटच्या वड्या देत. शेजारच्या एक आजीबाईही पंतांना दम्याची उबळ आली म्हणजे खोलींत येत. पंतांची पिकदाणी आजकाल कोणीतरी घेऊन जाऊन साफ करून आणून ठेवी. पंतांना हें कांहीं दिवसांनीं कळलें पण त्यांनीं चौकशी केली नाहीं.

असेच दिवस चालले. दमा बळावला. रात्रीच्या रात्री जागरणें पडूं लागलीं. खोलीस थुंकीनें गटाराचें रूप येऊं लागलें. आतां तोटीवर जातांना भिंतीचा आश्रय घ्यावा लागे. तें शेंबडें पोर चहाचा कप आणून देई. आजीबाई घरगुती औषध देऊं लागल्या व पंत न बोलतां घेऊं

लागले. कचेरीस जाणें बंद झालें. पंतांच्या खुर्चीवर नवा कारकून बसला व काम पुढें चाललें.

एक दिवस उजाडला. शेजाऱ्यांना पंतांच्या खोकण्याचा आवाज ऐकूं आला नाहीं. आजीबाई बघण्यासाठीं आंत गेल्या. त्या चाळीस वर्षांच्या जुन्या गादीवर पंतांचें प्रेत पडलें होतें. जवळ बादली, टमरेल व ट्रंक होती. आजपर्यंत साथ दिलेल्या त्या मूक मित्रांचा पंतांनीं शेवटचा निरोप घेतला होता. आजीबाईनीं लगबगीनें पुरुषमंडळीस बोलाविलें. पुढची तयारी चालली. पोलिस लोक आले. माल सरकारजमा झाला. पंतांचें प्रेत गादीवरून काढल्यावर उशाची डिक्स्‌नरी बाहेर पडली. एकजणानें ती उघडून सहज चाळली. तिच्यांत एक तरुण सुंदर स्त्रीचा फोटो होता! फोटोला येत असलेला मधुर वास त्या घाणेरड्या खोलींत पसरला.

पंत कचेरीच्या रस्त्यानेंच सोनापुरास गेले. रस्त्यानें ट्रॅमगाड्या, मोटारी चालल्या होत्या; दुकानदार दुकानांत बसले होते; भय्येलोक दूध देऊन परतले होते; चाळींतील बाया भांडत होत्या व पोरें धिंगामस्ती करीत होतीं. अन् पंतांच्या ऐवजीं लागलेला नवा कारकून कचेरींत जाण्याची तयारी करीत होता.



# शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३२ | ७ | भंगलेच्या | भंगलेल्या |
| ३९ | १४ | लेकरिंनीं | लकेरिंनीं |
| ४५ | २३ | दवा | दावी |
| ५७ | १४ | वेणीचे | वेलींचे |
| ६४ | ८ | मा | मी |
| ७४ | १२ | पुटटघुलेली | पुटपुटलेली |
| ८३ | २१ | माला | मला |

REFBK-0002818

# वीणामंडळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| यशवंती | ( यशवंत ) | ... ८१० |
| इंदुकला | ( ,, ) | ... ८३ |
| मित्रप्रेमरहस्य | ( ,, ) | ... ८४ |
| वीणाझंकार | ( यशवंत-गिरीश ) | ... ८८ |
| अभागी कमल | ( गिरीश ) | ... १८४ |
| दत्तांची कविता | | ... १८८ |
| काळाच्या दाढेंतून | ( श्रीधर रानडे ) | ... ८४ |
| विष्णु कृष्ण चिपळुणकर | (ग. त्र्यं. माडखोलकर) | ८१० |
| धुनिक कविपंचक | ( ,, ) | ... १८४ |
| ...रण | ( रविकिरणमंडळ ) | ... ८४ |
| काव्यविचार | ( ,, ) | ... १ |
| सुधा | ( ,, ) | ... ८१२ |
| मधुमाधव | ( ,, ) | ... ८१२ |
| शलाका | ( ,, ) | ... ८१२ |

'वीणामंडळ',

४६१ शनवार पेठ, पुणें शहर